म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. ८०२

मनोहर ग्रंथमाला, प्रकाशन १८ वें

# कागदी विमानें

( लघुनिबंधसंग्रह )

लेखक

रघुनाथ गोविंद सरदेसाई

आश्विन, शके १८६२

ता. ३०-१०-४०

प्रकाशक
मनोहर महादेव केळकर,
मनोहर ग्रंथमाला,
टिळक रोड, पुणें नं. २.

पुनरावृत्तीचे, उतारे घेण्याचे, अनुवादाचे वगैरे
सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन.

किंमत १। रु.

मुद्रक
श्रीपाद रघुनाथ राजगुरु,
'राजगुरु प्रेस', कॉमनवेल्थ कॉलनी,
४०५ नारायण पेठ, पुणें नं. २.

## रघुनाथ गोविंद सरदेसाई यांचे
## गाजलेले कथासंग्रह

# स्वाति

सरदेसाई यांच्या लिखाणांत जिव्हाळा, तळमळ या गोष्टी प्रामुख्यानें दिसून येतात. मनुष्यस्वभावाचें सूक्ष्म नि मार्मिक अवलोकन करून त्याच्या छटा आपल्या कथांतून उतरविण्याचें कौशल्य श्री. सरदेसाई यांना सुरेख साधलें आहे.

— **केसरी**

स्वातींत खरीं कथामौक्तिकें आहेत.

— **किर्लोस्कर**

हा कथासंग्रह मौलिक तेजाचा मुक्ताहार आहे.

— **ज्ञानप्रकाश**

# चित्रा

सरदेसाई यांच्या कथांतील एक वैशिष्ट्य म्हणजे ते आपल्या लघुकथांची सुरुवात अत्यंत आकर्षकपणें करतात हें होय. त्याचप्रमाणें शेवटाबद्दलहि ते तितकीच काळजी दाखवीत असतात.

— **नवयुग**

**कॉन्टिनेंटल् बुक-सर्व्हिस, टिळक रोड, पुणें नं. २**

# श्री. रघुनाथ गोविंद सरदेसाई

## यांचें वाङ्मय

### प्रकाशित

स्वाति ( कथासंग्रह )

चित्रा ( कथासंग्रह )

कागदी विमानें ( लघुनिबंधसंग्रह )

### आगामी

**कथासंग्रह**

पुनर्वसु

पऱ्हेरीं

नवदल

तुसार

**लघुनिबंध-संग्रह**

वामकुक्षींतील विचार

रजाचा गज

**विनोदी लेख-संग्रह :**

सुरसुरी

माझे लेखकमित्र

श्री. दत्त रघुनाथ कवठेकर

यांस

★

कागदी विमानें

# बिन्दुमात्र

'विविधवृत्त' साप्ताहिकांत ता. २५ फेब्रुवारीपासून ऑगस्टअखेरच्या सहामाहींत " बिन्दोःसिन्धुः " या मथळ्याखालीं लिहिलेल्या प्रासंगिक लघु-निबंधांपैकीं कांहीं लेख या पुस्तकांत संग्रहित केले आहेत. फक्त एक लेख नवा घातला आहे. वर्तमानपत्रांतील लेख पुस्तकांत छापतांना कांहीं तात्कालिक उल्लेख गाळण्यापलीकडे लेखांत फारसा फेरबदल केलेला नाहीं.

त्या त्या आठवड्यांत वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेली एखादी लहानशी बातमी किंवा घटना घेऊन तीवरून सुचलेले विचार मनोरंजक पद्धतीनें मांडण्याचा प्रयत्न या लेखमालेंत करण्याचा मूळ उद्देश असल्यानें "बिन्दोः-सिन्धुः" हें नांव मुळांत योजिलें होतें. परंतु पुस्तकाला तें संस्कृत नांव देण्यापेक्षां मराठी नांव देणेंच अधिक युक्त वाटल्यावरून प्रस्तुत " कागदी विमानें " हें नांव मुक्रर केलें. त्याची अन्वर्थकता पुस्तक वाचून ध्यानीं येईलच.

'विविधवृत्तां'तील लेख पुस्तकरूपानें छापण्यास अनुज्ञा दिल्याबद्दल संपादक श्री. रा. का. तटणीस यांचा मी आभारी आहें.

मुंबई,
ता. ३०-१०-४०

— र. गो. सरदेसाई

# कागदी विमानें

वृत्तपत्र नसलेला देश!
राजकारणाची मुकी चर्चा
माणसासारखीं माणसें
अबला कीं प्रबला?
मॅट्रिकची परीक्षा
शाळामास्तर
सिनेमा नट
शेजारी
शिरस्त्राण
प्रसिद्धीसाठीं धडपड!
खोटीं नाणीं
ओझें आणि हमाली
क्रिकेट आणि लढाई
लाल फीत
सेफ्टी रेझर
गवत खा, गवत!
परक्यांची भाषा

मनोहर ग्रंथमाला, टिळक रोड, पुणें नं. २.

क्र. ५८

# वृत्तपत्र नसलेला देश !

काहीं दिवसांपूर्वीं मीं वर्तमानपत्रांत एक फार चमत्कारिक बातमी वाचली. तिबेटचे माजी मुख्य प्रधान श्री. सारंगशेप हे आपल्या पत्नीच्या औषधोपचारासाठीं म्हणून कलकत्त्यास एक महिनाभर येऊन राहिले होते. परत स्वदेशीं जातांना त्यांनीं ॲसोशिएटेड् प्रेसच्या एका बातमीदाराला सांगितलें कीं—

"जेथें एकही वर्तमानपत्र चालविण्यांत येत नाहीं असा जगाच्या पाठीवर एकच देश आहे आणि तो म्हणजे तिबेट होय."

वर्तमानपत्रांत पुष्कळ मजेदार व कित्येकदां अविश्वसनीय वाटणाऱ्या बातम्या देखील प्रसिद्ध झालेल्या मीं वाचल्या आहेत. पण वरील बातमी वाचून मला जितकें आश्चर्य वाटलें तितकें आश्चर्य पूर्वीं क्वचितच वाटलें असेल !

आणि आश्चर्य वाटण्यासारखीच ही गोष्ट नाहीं काय ? विसाव्या शतकांत वर्तमानपत्र नसलेला एखादा देश पृथ्वीच्या पाठीवर असूं शकेल या बातमी-

वर चटकन् विश्वासच बसत नाहीं. सुधारलेल्या जगांत वर्तमानपत्र ही इतकी आवश्यक आणि अपरिहार्य बाब होऊन बसलेली आहे कीं, श्वासोच्छ्‌वासाइतकीच वर्तमानपत्राची माणसाला जरुरी आहे असें गृहीत धरण्यापर्यंत आपल्या मनानें दूरची भरारी न कळतच मारली आहे! मोठमोठ्या देशांची व राष्ट्रांची गोष्ट तर सोडाच, पण मोठमोठ्या शहरांत वर्तमानपत्र नसेल, तर तें शहर आपण शुद्ध रानटी समजूं. देशाच्या राजधानीच्या व औद्योगिक आणि व्यापारी महत्त्वाच्या शहरीं तर वर्तमानपत्रें दिवसांतून कित्येक वेळां प्रसिद्ध होत असतात. सकाळसंध्याकाळचीं वृत्तपत्रें आपल्या अंगवळणीं पडलींच आहेत व वर्तमानपत्रांची आपली सवय आतां इतकी अनावर झालेली आहे कीं, एखादें तरी पत्र वाचावयास न मिळालें, तर दिवस कसा चुकल्याचुकल्यासारखा वाटतो.

शहरोशहरींच काय, पण जिल्ह्याच्या व तालुक्याच्या गांवींही मोडकें तोडकें का होईना, पण एखाद-दुसरें वर्तमानपत्र संसार थाटून बसलेलें आढळतें. सौभाग्यवतीला कुंकुमतिलकावांचून चारुता नाहीं तशी गांवाला वर्तमानपत्रावांचून शोभा नाहीं, अशी समजूत होण्याइतकी जगांत वर्तमानपत्राची प्रगति झाली असतां, एक गांव नव्हे तर सबंध एक देशच्या देश असा आहे कीं, जेथें एकही वर्तमानपत्र निघत नाहीं ही केवढी आश्चर्याची गोष्ट!

आणि तो देशही कांहीं लहानसहान नव्हे. चार लक्ष त्रेसष्ट हजार चौरस मैल लांबी-रुंदीचा तिबेट देश आहे. तीस लाखांवर त्याची लोकसंख्या आहे. एवढ्या मोठ्या विस्तीर्ण देशांत एकही वर्तमानपत्र नाहीं म्हणे! धन्य, धन्य, त्या तिबेटची!!

आकारमानानेंच पाहिलें तर तिबेट हा देश फ्रान्स, जर्मनी, इटली किंवा इंग्लंड या पाश्चात्य राष्ट्रांहूनही मोठा आहे. हिंदुस्थानच्या एकचतुर्थांशाहून तिबेट थोडा लहान आहे. एवढ्या अफाट देशांत कसलेंच वृत्तपत्र जगूं नये म्हणजे काय? तेथल्या लोकांचें वर्तमानपत्र वाचल्यावांचून चालतें तरी कसें?

ही बातमी वाचल्यापासून मीं आपलें मनाशीं ठरवून टाकलें आहे कीं, त्या महाभयंकर देशाच्या वाटेला आपण स्वप्नांत सुद्धां जायचें नाहीं! वर्तमानपत्राच्या सहवासावांचून मला एक दिवस नाहीं चैन पडायचें! एक दिवस सूर्यनारायण सकाळीं उगवण्याचें विसरून गेला तरी माझें नाहीं तितकेंसें अडणार, (उलट रात्र अजून संपलीच नाहीं, असें समजून मी खुशाल मऊमऊ दुलईंत डोकें खुपसून मजेंत राहीन) पण सकाळचें वर्तमानपत्र जर माझ्या खोलींत पडलें नाहीं, तर आपलें घोडें अडलेंच दिवसभर! माझ्या आयुष्यांत सकाळीं मला साखरझोपेंतून उठविण्याचें कार्य सूर्याच्या सहस्रकरांना देखील कधीं साधलेलें मला आठवत नाहीं. लहानपणीं मला जागृति येई ती आईचा प्रेमळ हात पाठींत 'प्रसाद'पूर्वक फिरूं लागल्यानें आणि मोठेपणीं मला झोपेंतून जागें करण्याचें कार्य माझ्या खोलींत पडलेल्या वर्तमानपत्राच्या आवाजानेंच केलें आहे.

मलाच काय, पण लोकांनाही 'जागृत' करण्याचें कार्य वर्तमानपत्राइतकें दुसऱ्या कोणास साधत असेल असें मला तरी वाटत नाहीं. निद्रेंतून असो कीं, अज्ञानांतून असो, लोकांना जागे करण्यांत वर्तमानपत्रांचा हातखंडा आहे. माझे डोळे कितीही निद्राजड झालेले असोत, समोर ताजें वर्तमानपत्र दिसलें कीं, उडालीच डोळ्यांवरची ती झापड! चर्मचक्षूंप्रमाणेंच माणसाच्या मनश्चक्षूंनासुद्धां जाग आणण्यांत वर्तमानपत्रें सर्वदा आणि सर्वत्र यशस्वीच ठरलेलीं आहेत. असा देश, प्रांत किंवा गांव क्वचितच दाखवितां येईल कीं, जेथें वर्तमानपत्र निघत असूनही लोक अज्ञानांत घोरत पडले आहेत. झोपीं गेलेल्यांनाच काय, पण झोपेचें सोंग आणणारांना देखील वर्तमानपत्र तात्बडतोब जागें करून हात-पाय हालविण्यास भाग पाडतें.

तिबेटमधील दलाईलामाच्या प्रजाजनांना कोणत्याच प्रकारच्या जागृतीचीं किरणें दिसत नसलीं, तर त्यांत नवल वाटायला नको. वर्तमानपत्रच ज्या देशांत नाहीं तेथें कसलें जीवन आणि कसली जागृति? वर्तमानपत्र

हेंच सर्व चळवळीचें व चैतन्याचें अधिष्ठान आहे. वर्तमानपत्रांच्या आजच्या प्रभावी जमान्यांत श्रीसमर्थ रामदासस्वामी झाले असते, तर त्यांनीं आपल्या "सज्जनगड समाचार" पत्रांत लिहिलें असतें कीं—

सामर्थ्य आहे चळवळीचें
जो जो करील तयाचें।
परंतु तेथें वर्तमानपत्राचें
अधिष्ठान पाहिजे ॥

भगवंताची जागा विसाव्या शतकांत वर्तमानपत्रानें घेतली आहे. 'स्थिरचर व्यापुनि दशांगुळें' उरणाऱ्या भगवंताचें तें 'रेकॉर्ड' वर्तमानपत्रांनीं कधींच मोडलें आहे ! उलट जेथें भगवंतसुद्धां जाऊं शकणार नाहींत अशा ठिकाणींही प्रवेश करण्यास वर्तमानपत्रांना दिक्कत वाटत नाहीं. सर्व व्यक्तींच्या पापपुण्याचा जमाखर्च लिहिणाऱ्या चित्रगुप्ताच्या कार्याचें महत्त्व व त्यांतील अचाट अद्भुतरम्यता वर्तमानपत्रें निघाल्यापासून पार नाहींशी झालेली आहे. भगवंताचें विश्वव्यापित्व आणि चित्रगुप्ताचें सर्वदर्शित्व यांच्या जोडीला वर्तमानपत्रांच्या अंगीं नारदाचा कळलावेपणाचा गुणही दिसून येतो ! मनुष्य हा माकडापासून उत्क्रांत झाला असल्यामुळें केव्हां केव्हां तो मर्कटचेष्टा करून आपल्या पूर्वजांचा लागाबांधा जपून ठेवण्याचा प्रयत्न करतांना दिसतो, तद्वत् पुराणकाळच्या नारद या संस्थेचेंच सर्व-संचारी उत्क्रांत स्वरूप म्हणजे आजचीं वर्तमानपत्रें होत असा शोध कांहीं विद्वानांना 'झालेला' आहे, त्याचा खरेपणा पटविण्यापुरतेंच वर्तमानपत्रांनीं नारदाच्या कळलावेपणाशीं नातें जोडलेलें असावें असा माझा तर्क आहे.

वर्तमानपत्रांचें वाचन हें एक न सुटणारें व्यसन आहे. चहा, विडी, दारू हीं व्यसनें करूनही माणूस थोड्याफार मनोनिग्रहानें त्यांचा त्याग करूं शकेल; पण वर्तमानपत्र वाचण्याचें व्यसन एकदां माणसाला जडलें कीं, त्या वेडापासून त्याची सुटका नाहीं. आणि गंमत ही कीं, या 'वेडा'पासून

सुटका व्हावी अशी कोणाही 'शहाण्या'ची कधीं इच्छा नसते ! या व्यसनाची एक गंमत आहे कीं, उपभोगानें त्याची तहान वाढतच जाते, इतर व्यसनांप्रमाणें वीट येत नाहीं. अधाशासारखें मिळेल तें वर्तमानपत्र वाचणारे लोक मीं पाहिले आहेत.

नित्य नवा नखरा हा वर्तमानपत्रांचा प्राण असतो व त्यामुळेंच त्याला अवीटपणा प्राप्त झाला आहे. नवा खेळ, नवा पोषाक, नवी सीनसीनरी नाटक कंपन्या वर्ष-सहा महिन्यांनींच बाहेर काढतात. वर्तमानपत्रें रोजच नव्या बातम्या, नवे 'चूपविषय', ( शीघ्रसाहित्यादर्शकर्ते श्री. भावे य... Feature Article याला हा मराठी प्रतिशब्द सुचविला आहे, हें येथें कृतज्ञतापूर्वक नमूद करणें अवश्य आहे. ) नवीन चित्रें यांची सजावट करीत असतात. कांहीं वर्तमानपत्रें तर नावीन्याच्या इतकीं आहारीं गेलेलीं असतात कीं, स्त्रियांच्या शृंगाराप्रमाणें मतांचा रोज नवा थेर करणें, म्हणजेच नवमतवादाचा बेंडबाजा वाजविणें, अशी त्यांची कल्पना झालेली दिसते !

वर्तमानपत्रें हीं एका दृष्टीनें पाहिलें, 'तर घरचें खाऊन लष्कराच्या भाकरी भाजणारीं वाटतात. जगांत कोठें कांहीं घडो, त्यावर आपली यांची मल्लीनाथी आहेच ! जगांतल्या कोठल्या कानाकोपऱ्यांत घडलेल्या गोष्टीशीं तसें पाहिलें, तर माझा काय संबंध पोंचतो ? पण, या वर्तमानपत्रांनीं सर्व जगांतल्या घडामोडी छापून वाचकवर्गांत एक प्रकारचें विश्वबंधुत्वाचें नवें नातें निर्माण केलें आहे. आपल्या शेजारच्या घरांत कोण राहतो, तो काय करतो, या प्रश्नांबाबत पूर्ण उदासीन राहणारा वर्तमानपत्रांचा वाचक पेटसामो, व्हिपुरी आणि हेलिगोलँड येथील परिस्थितीनें विव्हळ होतो; मि. सम्नर वेल्स यांच्या दौऱ्याच्या फलश्रुतीबद्दल उत्सुकता दाखवितो, सिंध मंत्रिमंडळाच्या भवितव्याबद्दल चिंता वाळगतो, याचें सकृद्दर्शनीं नवल वाटतें. हजारों मैल लांब असलेले देश ज्याप्रमाणें नकाशा

समोर ठेवला म्हणजे एकमेकांच्या जवळ आल्याचा डोळ्यांना भास होतो, तद्वत् वर्तमानपत्र समोर धरलें कीं, वाचक आपलें व्यक्तित्व विसरून जातो व क्षणकाल विश्वबंधुत्वाच्या वरच्या पायरीवर जाऊन सर्व घडामोडींचा आत्मौपम्यबुद्धीनें विचार करूं लागतो.

माणसाच्या आयुष्याला गोडी व लज्जत आणण्याचें काम वर्तमानपत्रा-इतकें दुसऱ्या कोणास साधत असेल कीं काय, याची मला शंका आहे. तिबेटमधील लोकांचें जीवन या दृष्टीनें खरोखरीच कींव करण्यासारखें वाटतें—मला तरी! जागतिक घडामोडींशीं या लोकांचा बातम्या वाचण्या-पुरता देखील संबंध येत नसेल तेथें त्याबाबत स्वतःचें मत व्यक्त करणें तर दूरच! किती अभागी लोक तिबेटचे! वर्तमानपत्र नसल्यानें तेथील पुढाऱ्यांचे फोटो आणि मुलाखती कोण छापत असेल? कुठल्याही लहान-मोठ्या घडामोडीवर सकाळ-संध्याकाळ लांबलचक 'पत्रकें' प्रसिद्ध करण्या-चें भाग्य तिबेटच्या एकाही पुढाऱ्याच्या नशिबीं नसावें, ही केवढी खेदाची गोष्ट आहे! पत्रकें काढण्याचा दुर्धर रोग जडलेले वीर नरिमन किंवा पं. नेहरूंसारखे कोणीच पुढारी तिबेटमध्यें नाहींत काय? व्याख्यानबाजी करून वर्तमानपत्रांचे रकाने भरण्यास बहुमोल साहाय्य करणाऱ्या सत्यमूर्तीं-चीही तिबेटमध्यें लागवड होत नसेल!

वर्तमानपत्र नसलेला देश म्हणजे चैतन्यहीन कुडी. वर्तमानपत्रें नसतील तर देशांत चळवळी नाहींत, पुढारी नाहींत, 'प्रामाणिक' मतभेद नाहींत व त्या गोजिरवाण्या बुरख्याआडून चालणारें गालिप्रदानही नाहीं! वर्तमान-पत्रें नाहींत म्हणजे 'सत्या'चे अभिनव प्रयोग नाहींत, बुवाबाजीच्या जाहिराती नाहींत, अब्रुनुकसानीचे खटले नाहींत! वर्तमानपत्र नाहीं म्हणजे त्यांत येणारें मूर्खपणानें भरलेलें 'बायकांचें पान' नाहीं, कीं पाश्चात्य वर्तमानपत्रांतील उत्तान शृंगाराचीं चित्रें व लेख यांची उष्टी प्रतिकृति नाहीं. वर्तमानपत्र नाहीं म्हणजे जीवनांत राम नाहीं. विस्तीर्ण व स्वतंत्र देश

असून हिंदुस्थानांतील एखाद्या संस्थानाहूनही तिबेट मागासलेला देश आहे याचें कारण तेथें वर्तमानपत्राचा अभाव आहे हेंच असलें पाहिजे.

वर्तमानपत्र नसल्यामुळें तिबेटी लोक करमणुकीच्या एका अव्वल दर्जाच्या साधनास मुकले आहेत यांत मला तरी संशय वाटत नाहीं. मार्क ट्वेन या विख्यात अमेरिकन विनोदी लेखकाची एक गोष्ट कुठें तरी वाचल्याचें मला आठवतें. मार्क ट्वेन हा प्रसिद्ध पुरुष झाल्यावर त्याच्या 'हालचाली' वर्तमानपत्रांत छापून येऊं लागल्या व ठिकठिकाणीं त्याच्या मुलाखती घेण्यासाठीं स्थानिक वार्ताहरांच्या झुंडीच्या झुंडी येऊं लागल्या. आपण 'दिलेल्या' आणि 'छापून आलेल्या' मुलाखतींत पडणारें विलक्षण अंतर पाहून मार्क ट्वेन इतका कंटाळून गेला कीं, पुढें कोणालाच मुलाखत न देण्याचें त्यानें ठरविलें.

त्यानंतर एकदां तो स्वतःच्या जन्मगांवीं गेला असतां तेथील पत्राचा एक वार्ताहर सकाळींच त्याच्या मुलाखतीसाठीं आला. मार्क ट्वेन त्या वेळीं बिछान्यांत लोळत पडला होता. त्यानें प्रथम नकारच दिला; परंतु जन्म-गांवच्या पत्राची निराशा न करण्याबद्दल त्या वार्ताहरानें विनाविल्यावरून बेदा टाळण्यासाठीं मार्क ट्वेनें त्याला 'विचार काय हवं तें' असें सांगितलें. वार्ताहरानें विचारलें, "तुमच्या आयुष्यांतील सर्वांत आनंददायक प्रसंग कोणता?"

"अब्राहाम लिंकनची स्मशानयात्रा!" मार्क ट्वेननें पूर्ण बेफिकीरीनें उत्तर केलें.

त्यावर तो वार्ताहर चकित होऊन म्हणाला—

"पण तेव्हां तर तुमचा जन्मसुद्धां झाला नव्हता कीं!"

हें ऐकतांच मार्क ट्वेननें चटकन् अंथरुणांतून उडी मारून त्या वार्ता-हराशीं हस्तांदोलन करून म्हटलें—"शाबास, मजकूर वर्तमानपत्रांत छापून

येण्यापूर्वींच त्यांतील चूक शोधून काढणारा तूं पहिलाच वार्ताहर मला आढळलास!"

अशीच आणखी एक मनोरंजक गोष्ट देऊन हा लांबलेला लेख पुरा करतों. मार्च महिन्याच्या आरंभीं ही गोष्ट मि. पेटरब्रूम यांनीं कलकत्ता रेडिओ स्टेशनवरील एका व्याख्यानांत सांगितली—

"जागतिक वार्ताहर-परिषद संपवून कांहीं वार्ताहर स्वदेशीं परत जात होते. बोटीनें दोन दिवस प्रवास केल्यावर त्या वार्ताहरांपैकीं एकजण वाटेंत मृत्यु पावला. बोटीवर प्रेत असणें हें खलाशी लोक अशुभ मानतात हें प्रसिद्धच आहे. म्हणून बोटीच्या कप्तानानें बोटीवरील सुताराला सांगितलें कीं, रात्रीं ४७ नंबरच्या केबिनमध्यें जा व तेथलें प्रेत शिडाच्या कापडांत गुंडाळून समुद्रांत सोड.

दुसरे दिवशीं सकाळीं सुतारानें कप्तानाला वर्दी दिली कीं, सांगितल्याप्रमाणें ९७ नंबरच्या केबिनमध्यें जाऊन प्रेताची विल्हेवाट लावली. हें ऐकून कप्तान स्तंभितच झाला व म्हणाला, 'मीं तुला ४७ नंबरची केबिन सांगितली असतां तूं भलत्याच केबिनमध्यें जाऊन काय घोटाळा केलास हा?' तेव्हां सुतारानें उत्तर केलें– 'मोठाच चमत्कार म्हणायचा! तो प्राणी सारखा ओरडत होता कीं, आपण जिवंत आहोंत म्हणून. पण साहेब, हीं वर्तमानपत्रांतलीं माणसं; यांच्या बोलण्यांतील एका अक्षरावर देखील कुणी विश्वास ठेवूं नये!'"

# राजकारणाची मुकी चर्चा

बहिऱ्या-मुक्यांची भाषा हा शब्दप्रयोग सकृद्दर्शनींच थोडासा विचित्र वाटतो खरा. त्यांतही बहिऱ्यांना भाषा वापरतां येईल. पण मुक्यांना वाचाच नसल्यानें भाषेचा उपयोग चारचौघांसारखा कसा करतां येईल? तरीही मुके हे मानवी प्राणीच असल्यानें आपल्या भावना आणि विचार व्यक्त करण्याचें कांहीं ना कांहीं साधन शोधून काढल्यावांचून ते राहत नाहींत. मुक्या प्राण्यांना देखील भाषा असते असें म्हणतात. फार काय, पण वनस्पतिसृष्टीला देखील स्वतःची म्हणून एक "भाषा" असल्याचें शास्त्रज्ञ सांगतात. तेव्हां माणसासारखा माणूस, मग तो मुका असो कीं बहिरा असो— स्वतःच्या भावना-विचारांना प्रकट स्वरूप देण्याचा मार्ग तो काढल्यावांचून कसा राहील?

परवांच मीं वर्तमानपत्रांत एक कुतूहलजनक वातमी वाचली कीं--

पेशावरमधील एका दारूच्या दुकानांत दररोज सायंकाळीं सुमारें बारा मुके व बहिरे दिलजान दोस्त एकत्र जमतात व चालू 'आंतरराष्ट्रीय राजकारणा'वर चर्चा करतात! बोलण्यासाठीं या मंडळींच्या कांहीं सांकेतिक खुणा ठरल्या आहेत. हिटलर किंवा जर्मनी म्हणजे मिशा किंवा स्वस्तिक, छत्री म्हणजे ब्रिटन— विशेषतः चेंबर्लेन, अशा खुणा त्यांच्या ठरलेल्या आहेत. जर्मनीची आर्थिक नाकेबंदी करण्यांत आल्याचें वृत्त प्रथम पोटाला स्पर्श करून व नंतर तें पोकळ असल्याचा आविर्भाव दर्शवून स्वस्तिक किंवा मिशा दाखवून प्रकट करण्यांत येतें. अशाच कांहीं ठराविक खुणांनीं जहाजें, बोटी, विमानें बुडल्याची किंवा पाडल्याची वातमी ते एकमेकांना सांगतात,

सुनावितात आणि ती मुकी भाषा त्यांना समजतेही, अशा आशया-ची तार सिमल्याहून कांहीं दिवसांपूर्वी ॲसोशिएटेड् प्रेसमार्फत प्रसिद्ध झाली आहे.

ही बातमी मनोरंजक व उद्बोधकही आहे. पेशावरच्या एका दारूच्या गुत्यांत जमणाऱ्या मुक्या व बहिऱ्या व्यक्तींना देखील 'आंतरराष्ट्रीय राजकारणा'चें इतकें वेड लागलें आहे हें पाहून, पं. जवाहरलाल नेहरूंना आपल्या कर्तबगारीला धन्यवाद द्यावासा वाटेल! प्रस्तुत युद्धाबाबत झालेली सार्वत्रिक जागृति वरच्या गोष्टीवरून दिसून येत असल्यामुळें लोक भावी 'लढ्या'ला किती उत्सुक आहेत पाहा, असें श्री. सुभाषचंद्र बोस या बातमी-कडे बोट करून म्हणतील! तर देशांतील बहिरे लोक देखील हिटलरच्या रणगर्जनेकडे कान देऊन बसले असतांना सत्याग्रहाच्या आपल्या हाकेकडे कान तरी कोण देणार, असें म्हणून चळवळ तहकूब करण्याला या बातमीनें गांधींना एक कारण मिळेल. माझें लक्ष मात्र या बातमीकडे विशेष वेधलें तें तींतील लोकविलक्षण घटनेमुळें.

मुक्या-बहिऱ्यांची 'राजकारणा'वर चर्चा ही बातमी विचित्र नव्हे तर काय? राजकारणाची चर्चा खडाजंगीवांचून होऊं शकते यावर माझा विश्वास नाहीं. कॉंग्रेसवाल्यांत शिरा ताणताणून चालणारी राजकारणाची चर्चा किंवा बोडक्या भाईंच्या कर्कश किंचाळण्याच्या रूपानें लोकांच्या कानठळ्या बसविणारी राजकीय बातचीत ज्यानें कधीं ऐकली असेल, त्याला मुक्या-बहिऱ्यांची राजकीय चर्चा ही सशाच्या शिंगाप्रमाणेंच वाटेल!

राजकीय चर्चा म्हणजे, सैल जिभेचा मारा अशी ज्यांची कल्पना असेल, त्यांनीं वरील मुक्या-बहिऱ्यांची बातमी ध्यानीं घेण्यासारखी आहे. उर-स्फोड किंवा घसाफोड न करतां 'आंतरराष्ट्रीय राजकारणा'ची देखील कशी चर्चा करतां येते, हें पेशावरच्या दारूच्या गुत्त्यांतील या राजकारणानें कळून

येईल. हें मुक्याचें व्रत आमच्या राजकीय पुढाऱ्यांनीं स्वीकारलें, तर आजच्या पक्षभेदांपैकीं व मतभेदांपैकीं बहुतेकांचा निरास होईल, अशी माझी श्रद्धा आहे. मुक्यांनीं न बोलण्याचें आणि बहिऱ्यांनीं न ऐकण्याचें ठरविल्यास मतभेद कुठले होणार आणि तज्जन्य मारामाऱ्या व कारवाया तरी कशा जन्म पावणार? शब्दानें शब्द वाढून क्षुल्लक गोष्टीचें शेवटीं भयंकर पर्यवसान होतें, तसा प्रकार पेशावरी गुत्त्यांतील चर्चेचा होण्याचा सुतराम् संभव नाहीं. आणि मला वाटतें, राजकारणाची रोज चर्चा—आणि तीही दारूच्या गुत्त्यांत— करीत राहूनही या मुक्या-बहिऱ्यांची मैत्री अद्याप कायम राहूं शकली, याचें कारण तरी हेंच. एरवीं, वाचाळ राजकारण करणाऱ्या कुठल्या दोन इसमांची मैत्री कायम टिकली आहे?

राजकारणाच्या मूक-चर्चेंत गैरसमजाला वाव नसतो हा मोठाच फायदा आहे. 'मौनम् सर्वार्थ साधनम्' हें वचन प्रसिद्ध आहे. अनें खुणेनें काय सांगितलें व बनें त्याचा काय अर्थ केला हें दोघांनाहि कळण्याला मार्ग नसतो; त्यामुळें दोघेही आपापल्या ठिकाणीं पूर्ण समाधानी. मागें दोघां बहिऱ्यांचा एक चुटका मीं वाचला होता—

एक बहिरा—काय पंत! कुठं निघालांत? सिनेमाला का?

दुसरा बहिरा—छे, हो. आपलं असंच जातों सिनेमाला झालं!

पहिला बहिरा—हो का? मला वाटलं आपलं सिनेमाला जाताहांत म्हणून!

या चुटक्यांत वर्णिलेल्या प्रकारची चर्चा चालल्यास मतभेद होऊन नऊ भय्ये व दहा चुली अशी बजबजपुरी माजण्याचें कारण नाहीं. Silence is golden कां म्हणतात तें पेशावरच्या मूक-चर्चेवरून कळून येईल.

सूक्ष्म दृष्टीनें विचार केला, तर जगांतील निम्या-अधिक अनर्थांची जननी माणसाची जीभच असल्याचें आढळून येईल. माणसां-माणसांत वैर उत्पन्न होण्याला कारण वाचा, तशी राष्ट्राराष्ट्रांत युद्ध होण्याला कारणही वाचेचाच एक प्रकार- प्रचार—अर्थात् प्रोपॅगंडा! हा प्रॉपॅगँडा करणाऱ्या

जिभा आणि ते ऐकणारे कान एकत्र झाले कीं, त्या घर्षणांतून वैराची ठिणगी निर्माण होते. आजच्या युद्धांतहीं प्रचारकार्यानें केलेला प्रक्षोभ थोडा नाहीं. मुत्सद्द्यांच्या जिभा, वर्तमानपत्रांच्या लेखण्या, पुढाऱ्यांचीं व्याख्यानें आणि प्रचारकांची टकळी यांच्या आघात-प्रत्याघातांनीं मतभेद, पक्षभेद, गैरसमज, दुजाभाव आणि वैर या परंपरेनें परिस्थिति चिघळत जाते व शेवटीं 'नरेंच केला हीन किती नर' हे उद्गार सार्थ ठरूं पाहतात.

डॉ. गोबेल्ससारखे लोक प्रचारकार्य करूं लागले कीं, युद्धाचा वणवा पेटण्याला उशीर लागत नाहीं. राजकारणाची चर्चा चालू झाली कीं, चांगले चांगले लोकही थापा मारण्याचें व्रत पत्करतात आणि साध्या गोष्टीला हेंगाडें रूप आणून देतात. मुक्या-बहिऱ्यांच्या राजकीय चर्चेंत असल्या वातारामांना बेलगाम जीभ सैल सोडण्याला अवसर नसल्यानें त्या जिभेनें दंश करण्याची शक्यता नसते. देशांतील पुढारी लोक एकमेकांवर अर्धसत्यें आणि असत्यें यांनीं खचून भरलेल्या पत्रकांचा वर्षाव करण्याची तसदी घेण्यापूर्वी पेशावरच्या त्या दारूच्या गुत्त्यांत जाऊन येतील, तर राज-कारणाचा डाव आतांसारखा कुजलेला राहणार नाहीं, असें मला वाटतें. बोलण्याची इच्छा झाली तरी बोलूं नये आणि कानांवर पडलें तरी ऐकूं नये, हा निश्चय पुढारी करतील, तर त्यांच्यांत व पर्यायानें देशांत ऐक्य नांदेल.

पेशावरी मुक्या-बहिऱ्यांना राजकारणाची मूक-चर्चा करण्याला ईश्वरानें भाग पाडलें आहे. परंतु कांहीं वेळां मनुष्य स्वतः होऊनच आपल्या तोंडाच्या मुसक्या बांधून घेतो, कानांत कापसाचे बोळे कोंबतांना दिसतो. विशेषतः सुलतानशाही राजवटींत जनतेला हें मुक्या-बहिऱ्यांचें सोंग आणणें आवश्यक होऊन बसतें. जर्मनींत डॉ. गोबेल्सखेरीज दुसऱ्या कोणालाही हवें तसें तोंड वेंगाडणें अशक्य आहे. आजच्या जर्मनीची प्रार्थना अशी आहे कीं—

वाचा मम नष्ट करी पूर्ण ईश्वरा ।
मग चुकेल स्थानबद्ध वंदि-भोंवरा ॥
बहिरेपण फार बरें, देइ सत्वरीं ।
विश्वासिन मग खुशाल हिटलरावरी ॥
अंध, मुका, बहिरा मज करि दयानिधे ।
तरिच नाझि-राजवटिंत नांदणें घडे ! ॥

अशा परिस्थितींत जर्मन जनतेंत चालणारी राजकारणी चर्चा मुकी असल्यास नवल नाहीं. हिंदुस्थानांतील संस्थानी प्रजेलाही राजकारणाची चर्चा करावी लागते. 'शिस्त'भंगाचें हत्यार निघाल्यापासून खुद्द कॉंग्रेसमध्यें राहणारांना साऱ्या जगाच्या राजकारणाची उठाठेव करण्यास मुभा असली, तरी गांधींच्या राजकारणाबाबत मात्र पेशावरी गुत्त्यांतील चर्चेचा मार्ग अवलंबावा लागतो !

मात्र असल्या सक्तीच्या मूक-चर्चेंत चर्चिकांचें मन असंतोषाच्या धगीनें आंतून पेटलेलें असतें. त्यामुळें वरून शांत दिसणाऱ्या ज्वालामुखीप्रमाणें असली मूक-चर्चा केव्हां पेट घेईल याचा नेम नसतो. त्यामुळें पेशावरी गुत्त्यांतील मुक्या-बहिऱ्यांप्रमाणें सक्तीनें मुसक्या बांधलेल्या मंडळींत सहभाव निर्माण होऊं शकत नाहीं. तोंडसुख घेण्याचा आपला हक्क व सामर्थ्य असतांना हें मुक्यांचें व्रत स्वीकारावें लागलें, या जाणिवेनें जळणाऱ्यांची मूक-चर्चा बोलक्या टीकेहूनही वाईट.

पेशावरी मुक्या-बहिऱ्यांच्या कथेचा लाक्षणिक अर्थ घेऊन श्लेपात्मक बोलायचें झालें तर मात्र मी असें म्हणूं शकेन कीं, समाजांतील बहुसंख्य लोकांत चालणारी राजकारणी बडबड आणि वरच्या बातमींतील मुक्या-बहिऱ्यांची मूक-चर्चा यांत फार थोडी तफावत आहे. सदरील मुक्या-बहिऱ्यांना जशीं कोणत्याही बाबतींत स्वतःचीं मतें व्यक्त करतां येत नाहींत, तद्वत् सर्वसामान्य जनतेलाही कधीं स्वतःचीं मतें व्यक्त करतां येत

नाहींत. कोणत्या तरी पक्षाचीं किंवा पत्राचीं मतें आपलीं समजून पोपट-पंची थाटानें बोलून दाखविणारांचीच गर्दी समाजांत फार असते. ग्रामोफोन प्लेटसारखी या लोकांच्या राजकीय मतांची तबकडी कोणा तरी अदृश्य व्यक्तीचा 'आवाज' उमटवीत असते. स्वतःचा आवाज बोलण्याच्या दृष्टीनें पेशावरी गुत्त्यांतील मुके आणि सामान्य बोलके यांची प्रत एकच खरी; पण ग्रामोफोनच्या तबकडीप्रमाणें वारंवार कटकट करून शेजाऱ्यां-पाजाऱ्यांचीं डोकीं उठविण्याचें जें कार्य राजकीय बडबडे लोक करतात, तसला अत्याचार मुक्या-बहिऱ्यांच्या चर्चेमुळें होण्याचा संभव नसतो.

समाजांतील राजकारण बडबडणाऱ्या लोकांची ऐट पाहावी तर अशी कीं, जणूं हे लोक स्वतःचीं मानाचीं वस्त्रें अंगाखांद्यावर वापरीत आहेत. हे बडबडे दुसऱ्यांचे राजकीय विचार बेधडक आपलेच म्हणून मिरवीत सुटतात तेव्हां मला हसूं येतें. नाटकांतील भाषणें पाठ म्हणणाऱ्या नटानें त्या भाषणांचें जनकत्वही स्वतःकडे घेऊं पाहावें, तसाच हा प्रकार ! बिचाऱ्या पेशावरी मुक्या-बहिऱ्यांच्या हातून असलें 'विचारचौर्य' होण्याचा संभव नाहीं.

या दृष्टीनें पाहिलें, तर सर्वसाधारण जनतेंतही राजकारणाच्या मूक-चर्चेचें हें पेशावरी वारें संचरेल तर किती तरी कल्याणप्रद होईल. राजकीय पुढारी मूकचर्चा करतील, तर मतभेद माजण्याचें टळेल आणि त्यांचे अनुयायी राजकारणाची पोपटपंची करण्याचें सोडून देतील, तर आजच्यासारखें पक्ष-द्वेषाचें वातावरण देशांत फोफावणार नाहीं. पेशावरच्या एका दारूच्या गुत्त्यांत जमणाऱ्या बारा मुक्या-बहिऱ्यांच्या उदाहरणापासून अशा किती तरी गोष्टी शिकतां येण्यासारख्या आहेत.

पण, त्या बारभाईंची मूक-चर्चा ऐकतो कोण ?

---

# माणसासारखीं माणसें

ॲडॉल्फ हिटलरवर योगायोगानें विचित्र रीतीनें मात केल्याची एक मजेदार हकीगत हल्लींच प्रसिद्ध झालेली माझ्या वाचकांच्या वाचनांत आलीच असेल. पोलंड जिंकल्यानंतर जर्मनी व रशिया यांजमधील नव्या सरहद्दीचा नकाशा उभयतांच्या विचारें ठरविण्यांत आला. स्टॅलिननें इस्थोनिया, लिथुआनिया आणि लाटव्हिया या तीन बाल्टिक राष्ट्रांवर कांहीं अटी लादून तेथें आपलीं ठाणीं ठेवलीं. तेव्हां या प्रांतांत जे जर्मन लोक होते त्यांना परत जर्मनीमध्यें येण्याचा हिटलरनें हुकूम केला. त्याचा प्रत्युपकार म्हणून हिटलरनें आपल्या प्रांतांतील ज्यू लोकांना लाटव्हियामध्यें हाकून देण्याचें ठरविलें. पण, ज्यूंच्या या ठोकबंद हद्दपारीला एका ज्यू इसमाचा अपवाद करणें हिटलरच्या हस्तकांना भाग पडलें. या म्हाताऱ्या ज्यूचें नांव ॲडॉल्फ हिटलर असल्यामुळें त्याला लाटव्हियांत पाठविल्यास त्या नांवाची थट्टा होण्याची भीति वाटल्यामुळेंच जर्मन अधिकाऱ्यांनीं त्याला जर्मन हद्दींतच ठेवून घेतलें!

ज्या ज्यू लोकांचा हिटलर व त्याची नाझी भुतावळ इतक्या तीव्रतेनें द्वेष करते आणि ज्यांचा अनन्वित छळ हिटलरनें जाणूनबुजून केला आहे, त्या ज्यूंपैकींच एकाचें नांव ॲडॉल्फ हिटलर असल्याचें निघावें व नाझींना खालीं मान घालण्याचा प्रसंग यावा, हा योगायोगानें उगवून घेतलेला सूडच नव्हे तर काय? हिटलरनें आपल्या कारकीर्दीत तीन वर्षांपूर्वीं असें एक फर्मान काढलें होतें कीं, ज्यू लोकांनीं आपल्या मुलाबाळांचीं नांवें ठेवतांना फक्त ज्यू नांवांचाच उपयोग करावा, ख्रिश्चन नांवें ज्यूंनीं घेऊं नयेत. पण, हिटलरला ही अक्कल उशिरां सुचली, असें म्हटलें पाहिजे. त्याचेंच दांत त्याच्या घशांत घालण्याचें काम त्यापूर्वींच ईश्वरानें करूनही ठेवलें होतें!

ॲडॉल्फ हिटलर हें नांव असलेल्या ज्यूला सक्तीनें स्वतःचें नांव इतक्या म्हातारपणीं बदलायला लावून हिटलरला सध्यांच्या पेचप्रसंगांतून आपली सुटका करून घेतां येईल, नाहीं असें नाहीं. आणि तसेंच पाहिलें, तर एक प्रकारची ती फिटंफाटही म्हणतां येईल. कारण हिटलरवर ही जी 'नामापत्ति' कोसळली आहे ती तरी नामांतराचेंच प्रत्यक्ष फळ नव्हे काय! हिटलरच्या बापानें आपलें मूळ नांव शिकलग्रुबर होतें तें बदलून हिटलर हें नवें नांव धारण केलें नसतें, तर आजचा घोटाळा झाला नसता. तेव्हां स्वतःच्या नामांतरामुळें आलेली आपत्ति दुसऱ्याच्या नामांतरानें तूर्तास निवारण होऊं शकण्यासारखी आहे.

पण, अशा सक्तीच्या सोप्या उपायानेंही निवारण न होऊं शकणारी एक अडचण निसर्गानें हिटलरच्या कुचेष्टेसाठींच जणूं इंग्लंडमध्यें निर्माण करून ठेवल्याची बातमीही अलीकडेच माझ्या वाचनांत आली. वेस्ट केन्सिग्टन-मध्यें फ्रेड इमेट या नांवाचा एक इसम आहे, तो हुबेहुब हिटलरसारखा दिसतो म्हणे! तीच विखुरलेल्या केसांची झुकती ठेवण, तोच चेहरा, तशाच ढेकूणछाप मिशा; इतकेंच काय पण वय, वजन आणि उंची देखील एकच; इतकें नैसर्गिक साम्य हिटलर व इमेट यांजमध्यें आहे. सारे गांवकरी फ्रेड इमेटला चेष्टेनें 'ॲडॉल्फ' अशी हाक मारतात व तो दिसला कीं, मुद्दाम नाझी पद्धतीचा सलाम करून "हेल ॲडॉल्फ" असें म्हणतात! लढाईला सुरुवात होईपर्यंत या गोष्टी थट्टामस्करींत खपून जात; पण लढाई-मुळें 'हिटलर आणि तत्सम' मंडळींवर लोकांचा राग झालेला असल्यानें फ्रेड इमेटला त्या रागाची झळ लागते केव्हां केव्हां! गेल्या महायुद्धांत ओठावर झालेली जखम झाकण्यासाठीं इमेटनें मिशा राखल्या त्याचा परिणाम या महायुद्धांत त्याला अशा विचित्र रीतीनें भोगावा लागत आहे!

हिटलर व इमेट यांच्या बाबतींत केवळ योगायोगानेंच इतकें विलक्षण

साम्य जमून आलें. अशीं माणसासारखीं माणसें वारंवार भेटत नाहींत. कांहीं वेळेला दोन माणसांच्या चेहऱ्यांत पुष्कळसें साम्य दिसून येतें खरें, पण त्यांच्यांत इतर बाबतींत बराच फरक आढळून येतो. सख्ख्या भावांचें किंवा बहिणींचे चेहरे पुष्कळशः एकसारखे असतात. रक्ताच्या लागा-बांध्याचा तो परिणाम असूं शकेल. आईबाप किंवा जवळचे नातलग यांच्या चेहऱ्यांत साम्य दिसून आलें तर तें साहजिक वाटून कौतुकास्पद ठरतें; परंतु परस्परसंबंध नसलेल्या दोघां व्यक्तींत चेहरेपट्टीचें असें बंधुतुल्य साम्य दिसून आल्यास आपल्याला निसर्गकृतीचें आश्चर्य वाटल्यावांचून राहत नाहीं.

माणसासारखीं माणसें विरळा आढळतात म्हणून असें आश्चर्य वाटतें कीं, माणसासारखीं माणसें असूं नयेत असा आपल्या मनाचा ठाम ग्रह असल्यामुळें, त्याला धक्का बसलेला पाहून आपण नवल करतों हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. लहान मूल जन्माला आल्याबरोबर तें घरांतल्या कोणा वडील माणसासारखें दिसतें हा प्रश्न प्रथम चर्चिला जातो हें आपल्या परिचयाचें आहेच. मातृमुखी मूल भाग्यवान् असतें हाही समज आपल्या समाजांत रूढ आहे. सख्ख्या भावांच्या रंगरूपांत जर विरोध दिसेल तर आपण त्याबद्दल आश्चर्यही प्रगट करतों. या साऱ्या गोष्टी विचारांत घेतां माणसासारखीं माणसें समाजांत असणें म्हणजे गाईला वशिंडाच्या ठिकाणीं पाय फुटण्याइतकें कांहीं अनैसर्गिक वाटण्याचें कारण नाहीं असें मला वाटतें.

चेहरेपट्टींतील साम्याचें आपणास नवल वाटतें तें आप्तसंबंधीयांच्या बाबतींत नव्हे तर दोन परक्या व्यक्तींच्या बाबतींत. वर उल्लेखलेला फ्रेड इमेट हा हेर हिटलरचा सख्खा भाऊ असता तर त्या दोघांच्या सध्यांच्या चेहरेपट्टींतील साम्याचें आश्चर्य न वाटतां उलट कौतुकही झालें नसतें काय?

कदाचित् हिटलरनें त्या साम्याचा उपयोग आपल्या राजकारणाकडेही करून घेण्याची धडपड करून पाहण्यास कमी केलें नसतें. कोणी सांगावें? परंतु परस्परांनीं एकमेकांचें तोंडही कधीं पाहिलेलें नाहीं अशा व्यक्तींच्या चेहऱ्यांत साम्य दिसून येतें तेव्हां कौतुकाची भावना ओसरून आश्चर्याचा जन्म होतो. आप्तसंबंधीयांतील चेहऱ्याच्या साम्याचें, रक्ताचे लागेबांधे म्हणून समर्थन करण्यास कारण मिळतें. पण परक्यांचें मुखसाम्य पाहून तशी कांहीं कारणमीमांसा लावतां येत नसल्यानें आपण नवलांत पडतों.

निसर्गाच्या लहरीचे कांहीं चमत्कार केव्हां केव्हां दृष्टीस पडतात त्यांपैकींच हा एक असेल कदाचित्. सख्ख्या भावंडांच्या चेहऱ्यांत विलक्षण तफावत आणि परक्या मानवांच्या चेहऱ्यांत विचित्र साम्य हीं दोन्ही परस्परविरोधी टोकें त्या लहरींचींच मानावीं लागतात. वास्तविक प्राणिसृष्टीकडे पाहिलें तर तेथें विरोधापेक्षां साम्याकडेच निसर्गाचा ओढा जास्त असल्याचें दिसून येत नाहीं काय? प्राणिसृष्टींतील एकाच जातीचे प्राणि घेतले, तर त्यांच्या रूपांच्या किंवा चेहऱ्यांच्या बाबतींत मनुष्याप्रमाणें 'व्यक्ति तितक्या प्रकृति' असा प्रकार दिसत नाहीं. पोपट, कावळा, घोडा, ससा अशा प्राण्यांत चेहऱ्यांतील साम्यविरोधाच्या आधारानें भेद पाडणें कठीण जाईल. निदान मनुष्याच्या चेहऱ्याप्रमाणें प्राण्यांच्या चेहऱ्यांत 'नऊ भय्ये आणि दहा चुली' असा प्रकार आढळत नाहीं.

डार्विनच्या उत्क्रांति-तत्त्वाप्रमाणें सर्व प्राणिसृष्टि जन्मास घालून नंतर ईश्वरानें मनुष्यप्राणी तयार केला असल्यामुळें, मला वाटतें, एका जातीचे, एकसांची प्राणी निर्माण करण्यांत आपल्या हातून होत असलेल्या सौंदर्याच्या व वैचित्र्याच्या हानीची जाणीव परमेश्वराला झाली असावी आणि म्हणूनच त्यानें मानवाला शाप (कीं वर?) दिला असावा कीं, इतर प्राणिसृष्टी-प्रमाणें मानवांत साम्याला प्राधान्य न मिळतां वेगळेपणाला मिळेल. म्हणून सामान्य मनुष्यदेहाची परंपरा सर्वत्र एकच असली, तरी अगदीं एकासारखा

एक चेहरा आढळणें मुष्कील. नाटकी रंगभूमीवर सुद्धां गंधर्वासारखा 'डिट्टो गंधर्व' विरळा, तेथें जगाच्या रंगभूमीवर एकमेकांची प्रतिकृति असणारे मानवी नट कितीसे जन्माला येणार ?

त्यामुळें माणसासारखीं माणसें दिसतांच आपल्याला नवल वाटतें. स्वतःची दगडमातीची, प्लॅस्टरची किंवा सीमेंटची प्रतिकृति पाहून किंवा छायाचित्र अथवा रेखाचित्र पाहून आपल्याला आनंद होतो; त्या मानवी कलाकृतीचें आपण मनापासून कौतुक करतों. पण तशीच आपली प्रतिकृति निसर्गानें केलेली आपण पाहिली, ऐकली तर मात्र आपणांस अस्वस्थता वाटावी याचें कारण काय ? तुकाराम बोलपटांत विठोबाच्या देवळांत तुकारामाचें कीर्तन ऐकण्यांत दंग झालेल्या शिवाजीला पकडण्यासाठीं मुसलमान येतात, तेव्हां जिकडेतिकडे शिवाजीच शिवाजी दृष्टीस पडून जो चमत्कार होतो त्याचें तुम्हीं टाळ्या वाजवून कौतुक केलें असेल. पण समजा उद्यां कांहीं चमत्कारिक योगायोगानें तुमच्या स्वतःच्या बाबतींत असाच प्रकार घडला तर तो तुम्हांला मनापासून आवडेल काय ?

मेट्रो सिनेमासारख्या थिएटरांत एकजात, एकसांची खुर्च्यांच्या ज्या लांबच लांब रांगा दिसतात त्या डोळ्यांना आकर्षक वाटतात. कवायती-साठीं एक गणवेष घालून शेंकडों लोक एका चालीनें चालतांना पाहूनही आपण त्या शिस्तीची वाखाणणी करतों, सर्कशीमध्यें एकजात पांढरे शुभ्र घोडे परेड करतात तेव्हां कौतुक वाटतें, पण एकाच ठरीव चेहऱ्याच्या माणसांची एक फलटण तुमच्यापुढें उभी राहिली तर ती तुम्हांला चांगली वाटेल का ?

याचा अर्थच असा, कीं समाजांत माणसासारखीं माणसें असावींत ही कल्पना आपणाला मनोमन किळसवाणी वाटते. निसर्गाच्या लहरीनें क्वचित् दिसणारें चेहऱ्यांतील साम्य निराळें आणि विटाळ्यांत घालून बाहेर काढल्याप्रमाणें सर्वांचेच चेहरे एकसांची असणें निराळें. प्रत्येक माणसाच्या

चेहऱ्यांत ठेवणीचें कांहीं तरी वैशिष्ट्य असतें; आणि आपली ठेव जशी दुसऱ्याच्या हातीं जाऊं नये म्हणून प्रत्येकजण जपत असतो, तद्वत् ह्या आपल्या 'ठेवणी'चें अपहरण किंवा अनुकरण होऊं नये अशी आपली मनापासूनची इच्छा असते.

ॲडॉल्फ हिटलर हें नांव धारण करणाऱ्या त्या ज्यूची किंवा हिटलरी चेहऱ्याच्या त्या फ्रेड इमेटची हकीकत वाचून खुद्द हिटलरला काय वाटलें असेल याची कल्पना करणें मनोरंजक आहे. इतरेजनांना कदाचित् या योगायोगाची 'गंमत' वाटेल. या गमतीचें कारण अर्थातच तिच्या दुर्मिळतेंत आहे. चेहरेपट्टींतील साम्याचीं आणखीं कांहीं उदाहरणेंही प्रसिद्ध आहेत. डॉ. मुकुंदराव जयकर आणि सिनॉर मुसोलिनी यांच्या चेहऱ्यांत कांहीं प्रमाणांत साम्य दर्शनींच दिसून येण्यासारखें आहे. कराचीच्या एका व्यापाऱ्याचें तर मुसोलिनीशीं पुष्कळच साम्य असल्यानें मजेदार घोटाळ्याची बातमी कांहीं महिन्यांपूर्वीं वर्तमानपत्रांतून आलेली पुष्कळांच्या स्मरणांत असेल. मी जेव्हां जेव्हां मेट्रो-गोल्डविन-मेयर कंपनीचा सुप्रसिद्ध नट वॉलेस बीरी याचा चित्रपट पाहतों तेव्हां तेव्हां त्याच्या व श्री. नरसोपंत केळकर यांच्या चेहऱ्यांतील साम्याची मला तीव्रतेनें जाणीव होते. माझ्या दोनतीन लेखकमित्रांच्या चेहरेपट्टीचें 'चौर्य' करणारे दोनतीन नट हॉलीवुडमध्यें आहेत. बालगंधर्वासारखी दिसणारी एक गुजराथी स्त्री माझ्या फिरायला जाण्याच्या मार्गावर मला वारंवार भेटते. अशीं उदाहरणें पाहिलीं म्हणजे निसर्ग देखील केव्हां केव्हां 'वाङ्मय-चौर्य' करतो कीं काय अशी शंका मला चाटून जाते !

वाङ्मय-चौर्यावरून आठवण झाली. वाङ्मयांत चेहरेपट्टीचें साम्य कांहीं लेखकांनीं उपयोगिलें आहे. कै. श्री. कृ. कोल्हटकरांच्या प्रेमशोधनांत कंदन आणि नंदन सारख्या चेहऱ्याचे दाखविले आहेत. चार्ल्स डिकिन्सच्या 'ए टेल ऑफ टू सिटीज्'मध्यें सिडने कार्टनच्या अलौकिक बलिदानाचा

पाथा नायकाच्या चेहरेपट्टीशीं असलेल्या त्याच्या साम्यांतच नाहीं काय? श्री. खाडिलकरांच्या सवाई माधवरावांचा मृत्यु या अमर वाङ्मयकृतींत सवाई माधवराव आणि त्यांची बायको यशोदाबाई यांची चेहरेपट्टी नाना फडणविसाशीं हुबेहुब जुळत असल्याचा फायदा घेऊन केशवशास्त्र्यानें आपला डाव कसा साधला तें पाहण्यासारखें आहे. मुखसाम्यावर आधारलेल्या वाङ्मयकृति थोड्या असल्या तरी रहस्यपूर्ण असतात याचेंही कारण दुर्मिळ साम्यांतच सापडण्यासारखें आहे.

वर दाखविलीं या अर्थानें नसलीं तरी दुसऱ्या एका अर्थानें वाङ्मयांत माणसासारखीं माणसें बरींच आढळतात. एखाद्या लेखकाच्या निरनिराळ्या ललितकृति घेतल्या तर त्यांतील त्याच्या मानसपुत्रांत किंवा मानसकन्यकांत पुष्कळदां चेहरेपट्टीचें विलक्षण साम्य दिसतें. प्रो. फडक्यांसारख्या अव्वल दर्जाच्या कादंबरीकाराच्या कादंबऱ्यांतही एकसांची नायक-नायिका आढळत नाहींत काय? माणसासारखीं माणसें निर्माण करीत राहण्याच्या लेखकांच्या असल्या सवयीचें मात्र फारसें कौतुक होऊं शकत नाहीं.

माणसासारखीं माणसें समाजांत आढळल्यास कांहीं वेळां कसा मजेदार प्रसंग ओढवतो याच्या दोन नमुनेदार गोष्टी येथें देतों.

रोमच्या एका जुन्या बादशहाची (बहुधा त्याचें नांव ऑगस्टस असावें) ही गोष्ट आहे. तो एकदां रस्त्यानें जात असतां, त्याचा अगदीं सख्खा भाऊ शोभेल इतकें दोघांच्या चेहऱ्यांत साम्य असलेला असा एक परगांवचा इसम त्याला रोम शहरीं भेटला. आपलें तें प्रतिबिंब पाहून बादशहाला गंमत वाटली व त्यानें त्या माणसाची विचारपूस केली. पण चेहरेपट्टींतील त्या विलक्षण साम्याची कांहीं तरी संगति लावल्यावांचून बादशहाला स्वस्थ बसवेना. म्हणून त्यानें त्या परस्थास विचारलें—

"काय रे, तुझी आई कधीं रोमला आली होती काय?"

या प्रश्नाचा रोख असा होता कीं, त्याची आई रोमला आल्यावर आपल्या

बापाच्या दृष्टीस पडली असेल व मग जें व्हायचें तें होऊन तो परस्थ हा बादशहाचा अनौरस भाऊ बनला असता आणि चेहऱ्यावरील साम्याचाही उलगडा झाला असता !

बादशहाच्या प्रश्नांतील खोंच ध्यानीं येऊन त्या परस्थानें उत्तर दिलें—

" माझी आई कधींच रोमला आली नाहीं; परंतु माझा बाप मात्र आला होता खरा ! "

या मार्मिक व खवचट उत्तरानें बादशहाचे दात त्याच्याच घशांत गेले !

दुसरी गोष्ट अशी कीं, दोघां जुळ्या भावांमध्यें इतकें साम्य होतें कीं, त्यांपैकीं कोण कोणता भाऊ हें ओळखणें मुष्कील पडे. त्यांपैकीं एक भाऊ मेल्याचें एका गांवकराला कळलें; त्यानंतर दुसरा भाऊ जेव्हां त्या गांवकराला रस्त्यांत भेटला तेव्हां त्यानें विचारलें—

" काय रे, तुमच्यापैकीं मेला तो कोण ? तूं का तुझा भाऊ ? "

असल्या चमत्कारिक प्रश्नांचा मारा तुम्हांआम्हांवर होऊं शकत नाहीं याचें कारण माणसासारखीं माणसें समाजांत विरळा असतात हेंच नव्हे काय ?

# अबला कीं प्रबला ?

गेल्या महिन्यांत ( फेब्रुवारी ) मुंबईंत बॉंबे प्रेसिडेन्सी विमेन्स कौन्सिलची एक बैठक झाली. त्यांत झालेल्या स्त्रियांच्या भाषणांची आणि परिषदेंत पास झालेल्या ठरावांची हकीकत वर्तमानपत्रांत वाचून माझी बरीच करमणूक झाली. कांहीं इंग्रजी वृत्तपत्रांनीं या परिषदेसंबंधीं लिहिलेल्या संपादकीय लेखांतील उपरोधिक स्वरानें त्या करमणुकीला चांगली जिल्हई आणली. बायकांच्या सभेंत साधारणपणें कोणते विषय चर्चिले जातात आणि काय मतें प्रगट केलीं जातात, याची सर्वसामान्य कल्पना, मला वाटतें, बायकांशीं अल्प परिचय असलेल्या कोणाही पुरुषाला येणें विशेष कठीण पडणार नाहीं. वर उल्लेखिलेली मुंबई इलाख्यांतील स्त्रियांची परिषद् घ्या, किंवा तत्पूर्वीं भरलेली अलाहाबाद येथील अखिल भारतीय महिला-परिषद् घ्या, किंवा कल्याणला कांहीं दिवसांपूर्वीं भरलेली ठाणें जिल्हा महिला-परिषद् घ्या, या तीनही बायकी परिषदांतील भाषणांचा आणि ठरावांचा तोंडवळा सख्ख्या बहिणींप्रमाणें एकमेकांशीं बहुतेक बाबतींत जुळण्यासारखाच आहे.

पुरुषांनीं स्त्रियांना सर्व प्रकारच्या बंधनांत, हरेक प्रकारच्या अज्ञानांत शतकानु शतकें डांबून ठेवलें आहे; कायदेकानू व रीतिरिवाज यांची घडण करणें सर्वस्वीं पुरुषांच्याच हातीं राहिल्यामुळें बायकांना त्यांनीं सर्वत्र दुय्यम दर्जा दिला आहे; स्त्रिया याच पुरुषापेक्षां जास्त कर्तव्यदक्ष असून-देखील त्यांच्यावर लादण्यांत आलेल्या दुबळेपणामुळें, त्यांना बदलत्या परिस्थितीप्रमाणें आपली सोय लावून घेतां येत नाहीं, वगैरे अर्थाचा सूर स्त्रियांच्या परिषदांतील भाषणांतून निघतो.

या बायकी तक्रारींत नवीन असें कांहींच नाहीं. घरोघरीं आढळणाऱ्या मातीच्या चुलींप्रमाणेंच पुरुषी अन्याय व जुलमजबरदस्ती यांच्या-संबंधींची बायकी ओरडही घरोघरीं ऐकूं येते. फक्त फरक असेल तर हा 'चार्जशीट' पुरुषांच्या तोंडावर फेकून मारण्याच्या प्रत्येक स्त्रीच्या घरगुती पद्धतींतच असेल. एखादी स्त्री विजेप्रमाणें गर्जून कडकडाटानें पुरुषी अन्यायाचा बाजा जोरानें वाजवील, तर दुसरी मेघांप्रमाणें डोळ्यांतून पाणी काढून त्या अन्यायाचे पाट वाहायला लावील. एखादी गृहिणी पुरुषी अन्याय स्वयंपाकघरांतील भांड्यांखालीं आपटून गाडण्याचा प्रयोग करील, तर आणखी एखादी प्रतिकारवादी स्त्री स्वयंपाकांतून अन्याय करणाऱ्या पुरुषाला अक्षरशः 'खडे' चारील! परंतु आरोहअवरोह कायम आहेत तोंवर, केवळ चीज बदल्यानें जशी रागांत तफावत पडण्याचा संभव नसतो, तद्वत् पुरुषी अन्यायांबद्दलची ओरड कायम आहे तोंवर, ती व्यक्त करण्याच्या पद्धति बदलल्यानें मूळ परिस्थितींत फारसा बदल होण्यासारखा नाहीं.

वर उल्लेखिलेल्या परिषदांतील भाषणें व ठराव म्हणजे तत्त्वतः पाहतां घरोघरीं स्वयंपाकघरांतून ऐकूं येणाऱ्या लहान लहान आवाजांची सामुदायिक गर्जनाच म्हणतां येईल! छोटे छोटे ओहोळ मिळूनच नदीचें विशाल पात्र तयार होतें ना? पण तसें असलें तरी, छोट्या ओहोळांची सामान्यतः उपेक्षा होते व नदीच्या गंभीर पात्राचें कौतुक होतें. घरोघरीं स्वयंपाकघरांतून चाललेल्या बायकी कुरकुरीमुळें पुरुषाची जी झोपमोड होऊं शकत नाहीं, ती, तीच कुरकूर परिषदेच्या व्यासपीठरूपी लाउड-स्पीकरमधून कानांवर आदळूं लागली कीं, पुरुषाला डोळे चोळून काय प्रकार आहे हें पाहण्याची बुद्धि होऊं लागले. ठिकठिकाणच्या महिला परिषदांचा उद्देश हाच असावा अशी माझी समजूत आहे.

पुरुषांच्या निद्रिस्त न्यायबुद्धीला टोचून जागृत करणें हाच ठिकठिकाणच्या महिला परिषदांचा उद्देश असेल तर तो पुरुषांच्याच हिताचा आहे! परंतु त्या उद्देशाप्रमाणें पुरुषांना आलेली जागृति स्त्रियांना कितपत

फायदेशीर ठरेल याची मला शंका आहे. स्त्रियांना पुरुषांनीं शतकानुशतकें दुबळा दुय्यम दर्जा दिला आहे या वायकी आक्षेपांत तथ्य आहे असें मानलें तरी त्या दुबळेपणाचें संरक्षण करण्याची जबाबदारी पुरुषानें स्वतःवर घेतलेली व आजपर्यंत यशस्वीपणें पार पाडलेली नाहीं काय? आरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टींत, एका सुंदर राजकन्येला एका काचेच्या पेटींत जपून ठेवणाऱ्या राक्षसाप्रमाणें पुरुषाचें चित्र रेखाटण्याची महिला परिषदेंतील अनेक व्याख्यात्यांची प्रवृत्ति दिसून येते. पण त्यांच्या हें ध्यानीं येत नाहीं कीं, समुद्रांतील अनेक क्रूर व हिंस्र प्राण्यांपासून त्या सुंदर राजकन्येचें संरक्षण होत होतें तें केवळ राक्षसाच्या त्या युक्तीमुळेंच!

मागें कांहीं वर्षांपूर्वीं अमेरिकेंत भरलेल्या एका महिला-परिषदेला पुरुषसमाजाच्या वतीनें त्या वेळच्या अमेरिकेच्या प्रेसिडेंटनें दिलेल्या अत्यंत मार्मिक संदेशाची मला येथें आठवण होते. समोर बसलेल्या शेंकडों रमणींना उद्देशून स्त्रीपुरुषांच्या परस्परसंबंधांचें वर्णन करतांना प्रेसिडेंटमजकूर म्हणाले होते कीं—

"Man's arms are woman's protection, and woman's arms are man's reward."

या वर्णनांत केवळ आलंकारिक अतिशयोक्ति नाहीं हें इतिहासाच्या वाचकांना तरी सांगणें नकोच. जगांत पूर्वीं झालेल्या अनेक लढायांचें मूळ स्त्रीचें संरक्षण करण्याच्या पुरुषाच्या जबाबदारींतच आहे. रामरावण-युद्धाचें कारण सीता ही स्त्रीच नव्हती काय? या दृष्टीनें विचार केला तर स्त्रीला दुबळा दुय्यम दर्जा देऊन तिच्या संरक्षणाची नसती जबाबदारी शिरावर घेऊन डोक्यावर लटकती तरवार टांगून ठेवण्यांत पुरुषाची स्वार्थबुद्धि होती असें म्हणणें क्वचितच न्यायाचें होईल!

परंतु गंमत ही कीं, बाहेरच्या रणांगणांत स्वतःचा प्राण पणाला लावूनही स्त्रीचें रक्षण करणाऱ्या पुरुषाची घरीं कशी 'शोभा' केली जाते याची माझ्या विवाहित वाचकांना तरी कल्पना करून देण्याचें कारण नाहीं!

यामुळेंच बहुधा बाहेर वाघासारखे गुरगुरणारे पुरुष घरांत 'अजागळा'-सारखे वागतांना दिसतात. आणि त्यांतही विशेष म्हणजे 'घरच्या पुरुषां'ना वागविण्याच्या बायकांच्या पद्धतींत 'डावं-उजवं' असा पक्षपात नसतो. राघोबादादासारखा रणशूर सेनानी असो, कीं तुकारामासारखा सर्वांभूतीं प्रेम करणारा संत असो, बायकांच्या हिशेबीं सारेच पुरुष तरवारीच्या धारेवर धरण्याच्या योग्यतेचे असतात! ऑफिसांत बडा अंमलदार साहेब आणि त्याचा पट्टेवाला यांच्यांत केवढेंही सामाजिक अंतर दिसून येवो, त्यांच्या त्यांच्या 'घरीं' दोघांचीही कणिक सारखीच तिंबली जाईल याची खात्री बाळगावी!

समाजाच्या पठारांत दुबळ्या गणल्या जाणाऱ्या स्त्रियांनीं स्वयंपाक-घराच्या बालेकिल्ल्याभोंवतीं जी अजिंक्य तटबंदी करून ठेवली आहे, तिच्या भक्कमपणापुढें मॅजिनो लाइनचा खंबीरपणासुद्धां रद्दच ठरेल. या तटबंदीच्या आंत राहून शत्रूची परिणामकारक नाकेबंदी कशी करावी या कलेंतील स्त्रियांचें 'अशिक्षितपटुत्व' कोणत्याही पुरुषी युद्धमंडळाला साधायचें नाहीं. मला वाटतें एका हिंदी प्रोफेसरानें एकदां एका पाश्चात्य महिला-परिषदेंत 'पुरुषांपेक्षां स्त्री श्रेष्ठ मानतों आम्ही' म्हणून सांगितलें तें याच अर्थानें असावें. पाश्चात्य महिलांची ही परिषद् स्त्री ही पुरुषाच्या बरोबरीची आहे असा अभिप्राय व्यक्त करण्यासाठीं भरली होती. निरनिराळ्या राष्ट्रांतील महिलांनीं स्त्री व पुरुष यांचा दर्जा समान आहे असें जोराजोरानें प्रतिपादन केल्यावर हिंदी स्त्रीचा दर्जा हिंदु लोक काय मानतात यावर चार शब्द सांगण्याविषयीं, परिषदेला चुकून हजर असलेल्या एका हिंदी प्रोफेसरांना विनंति करण्यांत आली. त्यांनीं सांगितलें कीं, 'हिंदुस्थानांत स्त्रीला कोणी पुरुषाच्या बरोबरीची मानीत नाहीं.' प्रोफेसर-साहेबांचे हे उद्गार ऐकतांच सर्व गोऱ्या बायकांनीं 'शेम-शेम'चा गलका केला. तेव्हां प्रोफेसर चटकन् म्हणाले, 'तर आम्ही स्त्रीला पुरुषापेक्षां वरचढ मानतों!'

स्त्रीला डोक्यावर चढवून ठेवण्याची प्रथा स्मशानवासी शंकरानें पाडली व बहुतेक पुरुषांनीं ती पाळली आहे. पण या पद्धतीनें पुरुषाचा फायद्यापेक्षां तोटाच जास्त झाला आहे. पाट्याऐवजीं डोक्यावर मिरे वाटण्याची सवय बायकांना त्यामुळेंच जडली असावी असा माझा तर्क आहे. शिवाय या प्रथेमुळेंच पुरुषाची शेंडी व त्याचें डोकेंही बायकोच्या ताब्यांत गेलें. पुरुषांच्या बाईलवेडाचें मूळही या प्रथेंतच सापडण्यासारखें आहे. स्त्री– त्यांतून तरुण आणि देखणी स्त्री– पाहिली कीं, पुरुषाची बुद्धि काम करीनाशी होते, त्याचें डोकें जड होतें. पुरुषाला भलतेंच वचन देऊन नंतर त्या वचनपूर्तीपायीं गोत्यांत आलेल्या हरिश्चंद्रासारखें उदाहरण कांहीं घरोघरीं आढळत नाहीं. शिवाय भलतेंच आश्वासन देण्याची चूक हरिश्चंद्रानें स्वप्नांत केली. पण जागृतावस्थेंत पुरुष भलतींच वचनें देतो आणि नंतर गोत्यांत येतो तो फक्त स्त्रीमुळेंच.

घरोघरीं पाहिलें तर दुबळ्या स्त्रीनें प्रबळ पुरुषावर निर्विवाद प्रभुत्व चालविलेलें दिसून येतें. पुरुषानें कमवावें आणि बायकोनें गमवावें ही पद्धत तर आतां अंगवळणींच पडली आहे. पुरुषांच्या संपत्तींत कायदेशीर वाटा मागण्याची अलीकडे महिला-परिषदांतून फॅशनच पडत चालली आहे. परंतु, पुरुषानें कष्टानें कमावलेला पैसा, निरर्थक जिनसा विकत घेण्यांत व स्वतःच्या देहशृंगारापायीं उधळून टाकण्याचा बायकांचा सोस सुटल्याखेरीज वाटप करायला मुळीं इस्टेटच राहणार नाहीं, तेथें कायदेशीर वाटा मिळून तरी काय उपयोग होणार, हें मला कळत नाहीं. स्त्रियांची जीभ आणि हात यांत अधिक सैल अवयव कोणता हें सांगणें कठीण आहे. शब्दसंपत्ति आणि द्रव्यसंपत्ति यांची उधळपट्टी करण्यांत जगभर स्त्रियांना पहिला मान मिळाला आहे !

मात्र या दोन्ही संपत्तींची उधळणूक करण्याच्या स्त्रियांच्या पद्धतींत एक महत्त्वाचा भेद असतो. त्यांच्या शब्दसंपत्तीचा रोख, पाण्याच्या फवाऱ्याप्रमाणें, दुसऱ्याच्या दिशेला असतो आणि द्रव्यसंपत्तीची खैरात, शॉवरबाथप्रमाणें, स्वतःच्या भोंवतींच होत असते !

पुरवांच विलायतेंतील एका वर्तमानपत्रांतील 'कोर्टाच्या आवारांत' हें सदर वाचीत असतां, एका नवरोजींनीं आपल्या साक्षींत बायकोचें केलेलें वर्णन मला अतिशय मार्मिक वाटलें. तो म्हणाला—

"My wife is like a magnetic mine—vary attractive and highly dangerous."

आणि मला वाटतें हें वर्णन आपल्याही बायकोला तितक्याच यथार्थपणें लागू पडतें असेंच प्रत्येक नवरा म्हणूं शकेल! स्त्रियांच्या अंगीं 'आकर्षकता' आणि 'स्फोटकता' हे दोन गुण एकसंस्थ झालेले असल्यामुळेंच बहुतेक कवींनीं पुरुषाच्या स्त्रीवरील प्रेमाला ज्योतीवर झडप घालणाऱ्या पतंगाची सार्थ उपमा दिली असावी. 'मॅग्नेटिक माइन' मार्गांत पसरल्यानें जहाजांच्या हालचालींवर होणाऱ्या भयंकर परिणामांचें वर्णन हल्लीं नित्यशः वर्तमान-पत्रांतून वाचावयास मिळतें. पण भवसागरांत वावरणाऱ्या प्रबळ पुरुषी जहाजांच्या चिंधड्या उडविण्यासाठीं ईश्वरानें सर्वत्र पेरलेल्या स्त्रीरूप मॅग्नेटिक माइन्सनीं आजवर केलेल्या कामगिरीची आठवण झाली म्हणजे, सध्यांची 'माइन वॉरफेअर' अगदींच तकलुबी वाटूं लागते! एकट्या मेनकेनें विश्वा-मित्राचा कसा 'ग्राफूस्पे' केला तें सर्वश्रुतच आहे!

महिला-परिषदेंत पुरुषांवर तोंडसुख घेणाऱ्या स्त्रिया असल्या गोष्टी किती सोइस्कर रीतीनें विसरतात पण! पुरुषांनींच स्त्रियांना अज्ञानांत ठेवलें असें म्हणणाऱ्या स्त्रिया हें विसरतात कीं, आद्य पुरुषाला ज्ञानवृक्षाचें फळ खाण्याचा मोह आद्य स्त्रीनें पाडला नसता, तर जगांतील किती तरी आपत्तींचा मुळीं जन्मच झाला नसता. एका इंग्रजी लेखकानें सहधर्म-चारिणीची व्याख्या अशी केली आहे कीं:—

"संसारांत ओढवणाऱ्या आपत्तींच्या प्रसंगीं पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून सहधर्मचारिणी उभी असते. कारण कीं, त्यानं आपल्याशीं लग्नच मुळीं केलं नसतं, तर आलेल्या निम्म्या-अधिक आपत्ति तरी त्याच्यावर कोसळल्याच नसत्या, याची तिला जाणीव असते!"

तें कसेंही असलें, तरी माझ्या पुरुष वाचकांनीं महिला-परिषदेंतील बायकांच्या रणावेशानें बिथरून जाण्याचें कांहीं कारण नाहीं. एक तर घरांत कानींकपाळीं ऐकूं येणारी ओरड अशा रीतीनें परस्पर जर 'घराबाहेरच' होऊं लागली, तर घरीं तेवढीच शांतता नांदेल हा काय त्याचा थोडा फायदा झाला ? शिवाय स्त्रियांच्या असल्या परिषदांतून ज्या मागण्या पुढें येत आहेत त्या स्वतःला फारशी तोशीस लागूं न देतां, पुऱ्या केल्याची त्यांची समजूत करून देणें पुरुषांना फारसें जड जाऊं नये असें मला वाटतें. प्रसिद्ध फ्रेंच कादंबरीकार व्हिक्टर ह्यूगो यानें आपल्या हंचबॅक ऑफ नोत्रदाम या कादंबरींत एका आरब स्त्रीची एक मजेदार गोष्ट दिली आहे.

एके दिवशीं सदर आरब स्त्री रागानें फणफणतच आपल्या बापाकडे आली व म्हणाली,

" बाबा, तुमच्या जांवयानं तुमच्या लेकीच्या मुस्कटांत मारून तुमचा भयंकर अपमान केला आहे. याचा सूड तुम्हीं घेतलाच पाहिजे."

बापानें उत्तर केलें :—

" होय, लाडके, सोनुले, माझ्या हरामखोर जांवयाला त्याच्या उद्धट-पणाचं प्रायश्चित्त आतांच देतों पाहा. बोल, त्यानं तुझ्या कोणत्या गालावर थप्पड मारली ?"

" उजव्या ! "

हें ऐकतांच तिच्या बापानें तिच्या डाव्या श्रीमुखांत एक सणसणीत भडकावून म्हटलें,

" जा, माझ्या सोनुले, जा, जाऊन त्या माझ्या जांवयाला हा रंगलेला गाल दाखवून सांग कीं, माझ्या मुलीला थप्पड मारून त्यानं माझा जो अक्षम्य गुन्हा केला आहे, त्याचा सूड म्हणून मीं त्याच्या बायकोच्या श्रीमुखांत ठेवून दिली आहे !"

बापाच्या सूड घेण्याच्या या अभिनव पद्धतीनें पूर्ण संतुष्ट होऊन परत गेलेल्या स्त्रीच्या स्वभावाचें मर्म ज्याच्या ध्यानीं येईल, त्याला माझ्या वरील विधानाचा चटकन् उलगडा होऊं शकेल !

---

# मॅट्रिकची परीक्षा

उद्यांपासून मुंबई विश्वविद्यालयाची मॅट्रिकची परीक्षा सुरू होत आहे. गेलीं कैक वर्षे ही परीक्षा दरवर्षी होत आली आहे, आणि पुढेंही ती तशीच होत राहील. पण यंदाच्या परीक्षेच्या प्रथमग्रासीं थोडासा मक्षिकापात झाला. कोणत्याही कार्याला शुभमुहूर्तावर सुरुवात करावी अशी आमची हिंदु लोकांची शेंकडों वर्षांची समजूत व चाल आहे; आणि गुढीपाडवा हा तर हिंदूंच्या साडेतीन महत्त्वाच्या सणांपैकीं एक. तेव्हां या सणादिवशीं सुरू होणाऱ्या मॅट्रिकच्या परीक्षेंत तरी कांहीं विघ्न येणार नाहीं अशी माझी कल्पना होती. पण कोणतीही गोष्ट निर्विघ्न पार पडूं देणें हें पुणेकरांच्या लौकिकाला कमीपणा आणणारें आहे, अशा समजुतीनें जणूं पाडव्याच्या मुहूर्तावरील परीक्षेच्या शुभकार्याला कांहीं पुणेकर मंडळींनीं हिंदु धर्माभिमानाच्या नांवाखालीं हरकत घेतली व गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्ताचा चांगुलपणा कसाला लावून पाहण्याचा घाट घातला.

शुभमुहूर्तावरील कार्यारंभाला असा अपशकुन कां करण्यांत यावा याचा मी मनाशीं विचार करीत असतां, ब्रँडीची बाटली या बोलपटापासून पुण्यांत जोरानें वाहत असलेल्या पावित्र्यविडंबनाच्या वावटळीची मला आठवण झाली. हिंदूंच्या एका महत्त्वाच्या शुभमुहूर्तावर यावनी भाषेंतील एक महत्त्वाची परीक्षा सुरू व्हावी हें 'पावित्र्यविडंबन' नव्हे तर काय? भगवान् श्रीकृष्ण हे सूट-बूट घालून अप-टु-डेट इंग्रजी पोषाकांत चिरूट फुंकीत १९४० मॉडेलच्या मोटरमधून, 'मॅक्स फॅक्टर'मध्यें सौंदर्यप्रसाधन करण्यास गेलेल्या रुक्मिणीदेवीस परत आणण्यास निघाल्याचा देखावा एखाद्या बोलपटांत कोणी दाखविला तर तें जसें पावित्र्यविडंबन

होईल, तद्वत् हिंदूंचा शुभ सण यावनी परीक्षेसाठीं 'राबवून' घेण्याची कल्पनाही पाविञ्यविडंबकच मानायला नको काय? मला वाटतें, गुढी-पाडव्याच्या मुहूर्तावर मॅट्रिकची परीक्षा सुरू करण्यास हरकत घेणाऱ्या पुणेकरांच्या हृदयांत हीच पाविञ्यविडंबनाची छुपी भीति दडून बसलेली असावी!

तें कसेंही असलें तरी मॅट्रिकच्या परीक्षेच्या तोंडाशीं असलीं कांहीं विघ्नें येणें इष्ट नाहीं यावावत सर्वांचें एकमतच होईल असें मला वाटतें. कारण विश्वविद्यालयाच्या अनेक परीक्षांमध्यें मॅट्रिकची परीक्षा ही एकच परीक्षा अशी आहे कीं, समाजांतील बहुसंख्य लोकांचा तिच्याशीं कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारचा लागाबांधा जुळलेला असतो. किंबहुना इतर सर्व परीक्षांपेक्षां मॅट्रिकची परीक्षा हीच समाजमान्य परीक्षा होऊन बसलेली आहे. सर्वसामान्य जनतेला मॅट्रिकच्या परीक्षेचें जें महत्त्व वाटतें तसें बी. ए., बी. टी., टी. डी. (लंडन) यांसारख्या पदव्यांच्या संभाराचें वाटत नाहीं याचा अनुभव व्यवहारांत पदोपदीं येत असतो. साधारणपणें माणसाच्या सामाजिक प्रतिष्ठेचें माप मॅट्रिकच्या परीक्षेच्या रूपानें मोजण्याचा अगदीं अडाण्यांत देखील प्रघात पडून गेला आहे. पिण्याच्या चहाची उपमा मॅट्रिकच्या परीक्षेला साजून दिसेल. चहापेक्षां इतर कित्येक उंची व रुचकर पेयें आहेत, पण समाजाच्या खालच्या थरापर्यंत देखील जाऊन पोंचलेलें व मान्यता पावलेलें पेय एक चहाच! म्हणूनच चहाची सर्वदा आणि सर्वत्र जेवढी चहा चालू आहे तशी इतर पेयांची नाहीं. त्या पेयांची लज्जत फक्त खिशांत मुबलक पैसा खेळत असलेल्या कांहीं थोडक्या व्यक्तींच्याच जिभेपुरती मर्यादित असते.

मॅट्रिकची परीक्षा व तदितर परीक्षा यांचा समाजाशीं असलेला संबंध चहा आणि इतर उंची पेयें यांच्यासारखाच आहे. स्वदेशी व परदेशी पदव्या असतील मॅट्रिक परीक्षेहून मानाच्या आणि महत्त्वाच्याही, पण

मॅट्रिकच्या परीक्षेसारखी सर्वसाधारण जनतेंत त्यांची तमा राखली जात नाहीं. समाजांतील मूठभर जाणत्यांनाच काय ती असल्या पदव्यांची झळाळी दिपवीत असेल. पण साऱ्या समाजाच्या कानांवर ओळखीची साद घालणारी परीक्षा मात्र मॅट्रिकवांचून दुसरी नाहीं. सर्वपरिचितता हा मॅट्रिक परीक्षेचा सर्वांत मोठा व महत्त्वाचा भाग आहे. म्हणूनच ती परीक्षा समाजमान्य झालेली आहे.

अडाण्यापासून सुशिक्षितापर्यंत, पोरापासून थोरापर्यंत आणि पुरुषापासून बायकापर्यंत सर्वांच्या ओळखीची मॅट्रिकची परीक्षा असते. देवघरांत निरांजनें लावून पांडवप्रताप किंवा गुरुचरित्र वाचीत बसणाऱ्या आजीबाईंना, कित्येकांच्या नांवापुढें इंग्रजी धुळाक्षरांची जी मालिका लावण्यांत येतें तींतील एका अक्षराचाही बोध होण्याचा संभव नसला तरी ' मॅट्रिक पास ' ह्या शब्दाचा अर्थ मात्र चटकन् कळूं शकतो. पुणेरी टांगेवाल्याला कॉलेजमधील कांहीं प्रोफेसरांच्या नांवापुढील दीड हात लांबीच्या अक्षरमालिकेंतील एकाही पुष्पाचें आकलन होण्याची शक्यता नसली तरी मॅट्रिकच्या परीक्षेसाठीं त्याच्या टांग्यांतून जाणाऱ्या उमेदवारांच्या किलबिलाटाचा अर्थ मात्र तो जाणूं शकतो. साऱ्या वर्गांच्या आणि सगळ्या वर्णांच्या परिचयाची परीक्षा एक मॅट्रिकचीच !

मॅट्रिकची परीक्षा या कारणानें आपल्या आजच्या समाजाच्या तोंडीं खेळत आहे. मॅट्रिकच्या पुढच्या परीक्षांची समाजांत फार थोड्यांना माहिती असते व त्यांचें महत्त्व तर त्याहूनही थोडे लोकच जाणूं शकतात. एका संस्थानिकाकडे नोकरी मागण्यास गेलेल्या एका अर्जदाराला राजेबहादुरांनीं प्रश्न केला कीं—

" तुमचं शिक्षण कुठवर झालं ? "

" मी इंटर पास झालों आहे."

" पण मॅट्रिक झालांत का ? "

या प्रश्नांत राजेसाहेबांनीं जें अज्ञान व्यक्त केलें, तें केवळ अपवादभूतच मानण्याचें कारण नाहीं. नोकरीसाठीं अर्ज मागविणाऱ्या पुष्कळशा ठिकाणीं ( अर्थात् शैक्षणिक संस्था वगळून ) तर मॅट्रिक परीक्षा हीच एक लायकीची कसोटी मानली जाते. व्यवहारोपयोगिताच पाहिली तर इतर अनेक परीक्षांपेक्षां मॅट्रिकची परीक्षाच श्रेष्ठ ठरेल. मॅट्रिकला 'प्रवेश'परीक्षा म्हणतात, तें एका दृष्टीनें मला सूचक व अर्थपूर्ण वाटतें. मॅट्रिक पास झालेल्या इसमास हव्या त्या क्षेत्रांत 'प्रवेश' सुलभतेनें मिळूं शकतो. कॉलेजांत, नोकरींत, स्वतंत्र उद्योग-धंद्यांत, कोठेंही जा, मॅट्रिक पास असा 'पास' दाखविला कीं, 'प्रवेश' लवकर मिळतो. समाजांतही माणसाचा 'प्रवेश' या प्रवेशपरीक्षेनंतरच होतो. श्री. भालाकार भोपटकर म्हणत असत त्याप्रमाणें 'नानाचा नानासाहेब' होण्याच्या प्रक्रियेंतील पहिली पायरी म्हणजे मॅट्रिकची परीक्षा ! ही परीक्षा दिली कीं माणसाच्या जीवनांत खऱ्या अर्थानें पाऊल पडलें म्हणावयास हरकत नाहीं.

मॅट्रिकच्या अंगीं समाजाला भारून टाकण्याची शक्ति आहे असें मीं म्हटलें, तर त्यांत अतिशयोक्तीचा भाग फारसा असणार नाहीं. मॅट्रिक झाल्यावर माणसाला एक नवें वलय प्राप्त होतें. सामाजिक मानमान्यता त्याला लाभूं लागते, खुद्द घरांतही त्याचा दर्जा उंचावूं लागतो. मॅट्रिक होईतों बापाच्या नजरेला नजर भिडविण्यास घाबरणारा मुलगा मॅट्रिक होऊन कॉलेजांत जातांच बापालाही शहाणपण शिकवूं लागल्याचीं उदाहरणें समाजांत थोडींथोडकीं नसतात. मॅट्रिक होण्यापूर्वी म्हाबळभट्ट गणला जाणारा अजागळ इसम मॅट्रिकनंतर एकदम अप-टु-डेट फॅशनचा प्रणेता बनतो हें तर आपण नेहमींच पाहतों. उपवर वधूच्या रूपांत लग्नोत्तर वर्षसहा महिन्यांत जो विलक्षण बदल होतो, तसला फरक मॅट्रिक झालेल्या विद्यार्थ्यांत वर्षसहामाहींत अनुभवास येतो !

नदीच्या मर्यादित पात्रांतून समुद्राच्या विशाल उदरांत प्रवेश मिळालेल्या माशासारखीच मॅट्रिकोत्तर व्यक्तीची अवस्था होते. तिच्या राहणींत, पोषाकांत

आचार-विचारांत; इतकेंच काय, पण चेहऱ्यामोहऱ्यांतदेखील तफावत दिसून येते. मॅट्रिक झाल्यावर माणसाला थोडीशी 'अहं ब्रह्मास्मि'ची भावना होऊं लागते. गडकऱ्यांनीं म्हटल्याप्रमाणें माणसाला 'मिशा आणि मतें' फुटण्याचें वय मॅट्रिक झाल्यावरच येतें!

एवंगुणविशिष्ट अशी ही मॅट्रिकची परीक्षा पास होऊन मला पंधरा वर्षे लोटलीं, पण इतक्या वर्षांच्या कालांतरानेंही त्या परीक्षेंत लक्ष घालण्याची माझी हौस– किंवा व्यसन म्हणा– अद्याप कमी झालेली नाहीं. आणि मला वाटतें तसें कोणाच्याच बाबतींत होत नसावें. वर्षांच्या चिमखड्या पोरापासून नुकतीच एकसष्टी पार पडलेल्या म्हाताऱ्यापर्यंत सर्वांना स्वारस्य वाटेल अशी मॅट्रिकची परीक्षा आहे. कारण, दरवर्षी या परीक्षेला बसणाऱ्या हजारों विद्यार्थ्यांत प्रत्येक वाचकाला आपल्या ओळखीचा किंवा परिचयाचा प्राणी कोणी ना कोणी तरी सापडतोच! यंदा आपल्या ओळखीचें कोणीच असणार नाहीं, या खात्रीनें मॅट्रिकच्या परीक्षेचा निकाल वर्तमानपत्रांत वाचूं जावें, तों चटकन् आपल्या ओळखीचीं चारदोन नांवें त्यांत सापडतात असा माझा तरी आतांपर्यंतचा अनुभव आहे. मीं या लेखाच्या आरंभीं म्हटलें आहे कीं, "या परीक्षेशीं प्रत्येक वाचकाचा कोणत्या ना कोणत्या प्रकारचा लागाबांधा लागतो." तेंही याच अर्थानें!

मॅट्रिकच्या परीक्षेचा निकाल मी दरवर्षी काळजीपूर्वक वाचतों; त्याला आणखीही एक कारण आहे. या निकालपत्रकांत हजारों नांवें वाचायला मिळतात आणि त्यांतील विविधतेनें व वैचित्र्यामुळें माझी बरीच करमणूक होते. लोकांची नामावळी वाचण्यांतदेखील एक प्रकारची गंमत आहे. आणि मला वाटतें, या गंमतीचा नित्य अनुभव घेतां यावा म्हणूनच आमच्या दूरदर्शी पूर्वजांनीं विष्णुसहस्रनाम म्हणण्याचा पायंडा पाडला असावा! निदान मॅट्रिक परीक्षेच्या निकालपत्रांतील नांवें वाचून पाहणा-

त्याला तरी माझें म्हणणें पटेल अशी आशा आहे. 'विचित्र नांवांचा जंगी कॅटलॉग' असें त्या निकालपत्राचें थोडक्यांत वर्णन करतां येईल. तुमच्या कधीं कल्पनेंतही येणार नाहींत, अशी कैक गंमतीदार नांवें त्या पत्रकांत दृष्टीस पडतील. (एकदां अनुभव घेऊन खात्री करून घ्यावी!) अत्यंत काव्यपूर्ण आणि भयोत्पादक, अभिलषणीय व तिरस्करणीय, स्मरणीय व विस्मरणीय अशा नांवांची इतकी मोठी जंत्री एकत्र मिळण्याचा योग इतरत्र विरळाच सापडेल. तुमच्या ठिकाणीं विनोदबुद्धि असेल, तर अनेक मार्मिक कोट्या सुचण्यास त्या जंत्रीचा तुम्हांला उपयोग होईल. मातेच्या उदरांत असलेल्या अपत्यासाठीं चांगलेंसें नांव शोधण्याच्या चिंतेंत असलेल्या तरुण जोडप्याला किंवा कथाकादंबरींतील नायिकेसाठीं नावीन्यपूर्ण नांव हुडकण्याच्या विवंचनेंत गुरफटलेल्या लेखकाला मनपसंत नांव तयार मिळेल, तर तें फक्त मॅट्रिकच्या निकाल-पत्रिकेंतील जंगी जंत्रींतच!

मॅट्रिकची परीक्षा ही अनेक वर्तमानपत्रांना आपला खप वाढविण्याची सुवर्ण संधि असते. विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका सोडविण्याच्या कामीं मदत करण्याच्या मिषानें कैक वृत्तपत्रें आपले रकानेच्या रकाने भरून काढतात; पण या अनाहूत मदतीचा विद्यार्थ्यांना कितपत उपयोग होत असेल, याची मला शंका आहे. पोहण्याचे नियम पुस्तकांतून पाठ करून नदींत तरून जाण्यापैकींच आत्मघातकी प्रयत्न असतो तो, विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें तरी. पण हताश झालेल्या आजाऱ्याला कोणी कांहींही सांगावें, त्यावर त्याचा विश्वास बसतो; तशी मॅट्रिक परीक्षेस बसणाऱ्यांची नाजुक मनोवृत्ति असल्यानें तिचा फायदा कांहीं वर्तमानपत्रें घेतात.

वर्तमानपत्रांना केवळ याच एका बाबतींत मॅट्रिकची परीक्षा हात देते, असें नाहीं. परीक्षेचा निकाल छापण्याच्या कामीं वर्तमानपत्रांची चालणारी धावपळ कांहीं केवळ परोपकारार्थच नसते. शिवाय मॅट्रिकच्या परीक्षेमुळें वर्तमानपत्रांना अनेक खळबळ उडवून देणाऱ्या बातम्यांचा दरवर्षीं लाभ

होतो तो निराळाच ! वर्तमानपत्रांना विविध तऱ्हेच्या बातम्या पुरविण्याचें काम आजवर मॅट्रिकच्या परीक्षेनें जितकें केलें आहे, तितकें तें दुसऱ्या कोणत्याही परीक्षेनें केल्याचें दाखवितां येणार नाहीं.

यांपैकीं सर्वच बातम्या कांहीं सुखकर असत नाहींत हें खरें; परंतु जनतेंत औत्सुक्य उत्पन्न करण्यास आणि खळबळ किंवा हळहळ निर्माण करण्यास त्या बहुधा चुकत नाहींत, हें खोटें नव्हे. परीक्षा सुरू होण्याच्या पूर्वी घरांतून पळून गेलेल्या विद्यार्थ्यांना उद्देशून, 'परीक्षा म्हणजे सर्वस्व नव्हे, यंदा वाटल्यास तूं परीक्षेस बसूं नकोस, पण परत घरीं ये किंवा पत्ता तरी कळीव ! ' अशा केविलवाण्या हाका पितरांनीं मारलेल्या, वर्तमानपत्रांच्या रकान्यांत ऐकूं येतात, आणि परीक्षेच्या निकालानंतर, त्या सोडतींत अपेशी ठरलेल्या भावनाप्रधान तरुणांच्या आत्महत्येच्या खेदकारक बातम्या वर्तमान-पत्रेंच पुरवितात.

हळहळ उत्पन्न करणाऱ्या असल्या बातम्यांच्या जोडीनें खळबळ माजविणाऱ्याही कांहीं बातम्या मॅट्रिकच्या परीक्षेनें वर्तमानपत्रांच्या स्तंभांतून जनतेला पुरविल्या आहेत. कॉपी केल्याबद्दल अमक्या तमक्यास सुपरवायझरनें पकडलें, परीक्षेच्या पेपरांत मुद्राराक्षसानें उडविलेला मजेदार गोंधळ, बाप आणि मुलगा एकाच वर्षी मॅट्रिकला बसल्याचा चमत्कार, शिकवणीच्या विद्यार्थ्यांऐवजीं प्रोफेसरच परीक्षेच्या मंडपांत पेपर लिहिण्यास गेल्याचा विस्मयकारक प्रकार, आंधळा इसम परीक्षा पास झाल्याची बातमी वगैरेसारख्या खळबळ उडविणाऱ्या बातम्यांची जननी मॅट्रिकची परीक्षाच आहे. मॅट्रिकच्या परीक्षेमुळें अनेक विद्यार्थी बेपत्ता होतात, तर अनेकांचा 'वारकरी' पंथांत प्रवेश होतो. कांहींजणांनीं तरी पुरें एक तप मॅट्रिकच्या परीक्षेची तपश्चर्या केली असेल ! पंढरीच्या वाऱ्या करणाऱ्या माळकऱ्यांप्रमाणें मॅट्रिकच्या वाऱ्या करणारेही अनेक शाळकर आहेत ! एकाची विठोबावरील व दुसऱ्याची विद्येवरील भक्ति सारखीच निरलस म्हणायची !

मॅट्रिकच्या परीक्षेच्या अंगीं डॉ. व्होरोनाफ्प्रमाणें म्हाताऱ्या माणसांना देखील पुनः तारुण्याची हिरिरी आणण्याचें सामर्थ्य असल्याचें केव्हां केव्हां दिसून येतें. गेल्या वर्षी आपल्या तरुण मुलाला अभ्यासाचा धडा शिकविण्याच्या ईर्षेनें एक वृद्ध बाप कलकत्त्यास मॅट्रिकच्या परीक्षेला बसल्याची बातमी वाचल्याचें आठवतें मला! चाळिसाव्या, पन्नासाव्या, इतकेंच काय, पण साठाव्या वर्षी मॅट्रिकच्या परीक्षेला बसलेल्या 'हौशी जवानां'चीं उदाहरणें उपलब्ध आहेत. एकसष्टीचें उद्यापन मॅट्रिकच्या उंबरठ्यावर करण्याची ही हौस पाहिली कीं, त्या परीक्षेच्या अंगीं मुळांतच लोहचुंबकासारखा कांहीं तरी आकर्षक गुण असावा असा तर्क धावतो. नुकतेंच मीं वाचलें आहे कीं, कार्टर या नांवाचा एक इंग्लिश इसम साठाव्या वर्षी प्रथमच मॅट्रिकच्या परीक्षेला बसला. त्यानें आपणाला या परीक्षेचा काय अनुभव आला तो लिहून प्रसिद्ध केला आहे. तो अतिशय मनोरंजक आहे. साठाव्या वर्षी मॅट्रिकला बसण्याचें ठरविण्यापूर्वी तो आयुष्यांत कधीं कोणत्याच शालेय परीक्षेला बसला नव्हता. शाळेंत असतांना तो अभ्यासांत कुचकामी ठरला होता. साठाव्या वर्षी परीक्षेला बसण्याचें या स्वारीचें कारण असें होतें कीं, त्याच्या स्वभावांतील चौकसपणाला, शिक्षणाच्या कामीं परीक्षा या आवश्यक आहेत, कीं विद्यार्थ्यांच्या मार्गांतील त्या धोंडी आहेत, या प्रश्नाचें अनुभवसिद्ध उत्तर शोधण्याची लहर आली! स्वारीनें साठाव्या वर्षी कंबर कसून परीक्षेची तयारी केली आणि हजारों तरण्याताठ्या पोरांना बिकट वाटणाऱ्या परीक्षेंत यशही मिळविलें!

या परीक्षेच्या अनुभवाबद्दल लिहितांना कार्टर म्हणतो—

"ज्याला जीवनाचा कंटाळा आलेला आहे अशा कोणाही साठी उलटलेल्या म्हाताऱ्यास आयुष्यांत नवा आनंद लाभण्याचें साधन म्हणून मी मॅट्रिकच्या परीक्षेला बसण्याची शिफारस करीन. या योगानें मनाला नवचैतन्याचा लाभ होतो आणि शरीरालाही शिस्त लागते. या दृष्टीनें तरुणांइतकीच ही परीक्षा म्हाताऱ्यांनाही उपयुक्त आहे."

कार्टरचे हे विचार माझ्या वाचकांपैकीं कितीकांना पसंत पडतील याची मला शंका आहे. परंतु म्हाताऱ्यांच्या मॅट्रिक परीक्षेची कल्पना मजेदार आहे यांत शंका नाहीं. श्री. नरसोपंत केळकर, वामनराव जोशी, अण्णासाहेब लठ्ठे, बाळासाहेब खेरप्रभृति वृद्धांना पुन्हा मॅट्रिकच्या परीक्षेला बसण्याचा प्रसंग आला तर तो देखावा पाहण्यास एखाद्या जत्रेसारखी गर्दी होईल, यांत मला तरी शंका नाहीं. आजच्या अनेक विद्वानांना व वृद्धांना मॅट्रिक परीक्षेला पुनः बसण्याची सक्ती करण्यांत आलीच तर त्यांत कितीजण पास होतील हें सांगणें मात्र कठीण आहे. नापास विद्यार्थ्यांची हेटाळणी करणाऱ्या वडीलधाऱ्या मंडळींना व तीन तास मुदतीसाठीं लांबच लांब प्रश्नपत्रिका काढणाऱ्या शहाण्या परीक्षकांना जर परीक्षेस बसणें भाग पाडतां येईल तर बहार होईल अशी कल्पना माझ्याप्रमाणेंच अनेक विद्यार्थ्यांच्या मनांत पुष्कळदां येऊन गेली असण्याचा संभव आहे.

मॅट्रिकची परीक्षा ही अनेक धंदे आणि व्यवसाय यांची पोषणकर्ती म्हणूनही महत्त्वाची आहे. ठिकठिकाणीं तिचीं केंद्रें ( सेंटर्स ) असतात; व परीक्षेच्या निमित्तानें त्या त्या गांवीं जमलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येमुळें तेथें आठदहा दिवस जणूं जत्राच जमते. अर्थात् जत्रा म्हटली कीं हरेक प्रकारची उलाढाल आली व त्या गांवच्या तिजोरींत भरही पडली. परीक्षकांना मॅट्रिकची परीक्षा खरी लाभदायक होते. परंतु त्याबद्दल ते दाखवावी तितकी कृतज्ञता व्यक्त करीत नाहींत, अशी अनेक नापास विद्यार्थ्यांची तक्रार आहे ! हिंदुस्थानांतील तारखात्याला मॅट्रिकची परीक्षा हें एक जमेचें मोठेंच खातें लाभलें आहे.

वाङ्मयाच्या दृष्टीनें या परीक्षेचा उपयोग करून घेतां येण्यासारखा असून तिकडे अद्याप कोणाचें लक्ष जांत नाहीं याचें मला नवल वाटतें. इंग्रजींतील स्कूलबॉय हॉलरसारखा अभावित विनोदाचा जिवंत झराच हजारों

विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकेच्या रूपानें परीक्षकांच्या हातीं आलेला असतो. मॅट्रिकच्या विद्यार्थ्यांच्या पेपरांत नाना तऱ्हेचीं गमतीदार व हास्यकारक उत्तरें शेंकड्यांनीं सापडण्याचा संभव आहे. आमच्या परीक्षकांपैकीं एका-लाही विनोदबुद्धि नाहीं काय, अशी देखील मला केव्हां केव्हां शंका येते.

आज परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना वर उल्लेखिलेल्या कार्टरची एक सूचना मात्र तावडतोब मंजूर होईल अशी माझी खात्री आहे. साठीं उलटले-ल्या म्हाताऱ्यांना मॅट्रिकच्या परीक्षेला बसण्याचा उपदेश करणाऱ्या या वृद्धानें तरुणांना मात्र या परीक्षेचें बंधन असूं नये असें आपलें मत दिलें आहे ! तो म्हणतो कीं, " सर्वसाधारण बुद्धिमत्तेच्या तरुणाच्या मार्गांत जर मॅट्रिक, प्रवेशपरीक्षा वगैरेसारख्या परीक्षांची अडचण नसेल आणि आपल्या नैस-र्गिक गुणांचा विकास करण्यास अप्रतिबंध वाव देणाऱ्या शिक्षकांचा त्याला लाभ होईल तर त्याचा शैक्षणिक विकास अधिक फलदायी होईल."

मॅट्रिकच्या परीक्षेला यंदा बसण्यास लायक असणाऱ्या माझ्या एका विद्यार्थिमित्रास मी सदर कार्टरची हकीकत सांगून त्याचें वरील मतही त्याच्या कानीं घातलें, तेव्हां तो एकदम उत्तेजित होऊन म्हणाला—

" अगदीं बरोबर आहे त्या कार्टरचं मत. माझंही तसंच मत आहे. मॅट्रिकची परीक्षा तरुणांपेक्षां म्हाताऱ्यांनाच फायदेशीर ठरेल. माझंही ठरलं आतां. पुरे हा अभ्यास. कार्टरप्रमाणं आतां मी वयाच्या साठाव्या वर्षीच मॅट्रिकच्या परीक्षेला बसणार व मुंबई विश्वविद्यालयांत एक नवें 'रेकॉर्ड' करणार ! ! "

---

# शाळा-मास्तर

जर्मनींत अत्यंत कडक सेन्सॉरशिप आहे हें सर्वश्रुतच आहे. लढाईच्या सुरुवातीपासून तर सेन्सॉरशिपची तांत जास्तच घट्ट आवळली गेली आहे. नियंत्रण हें कांहींसें दलदलीच्या प्रदेशांतील प्रवासासारखें असतें. एकीकडचा पाय चिखलांतून काढावा तों दुसरीकडे जास्त खोल जाण्याचा प्रसंग येतो. जर्मन सेन्सॉरशिपचा प्रकार थोडाफार असाच आहे. त्याचे अनेक मासलेवाईक नमुने मीं वाचले आहेत. पण हल्लींच मीं जी एक बातमी वाचली ती कांहीं औरच !

" जर्मनीच्या एका भागांत एका शाळामास्तरला नाझी लोकांनीं सेन्सॉर नेमला. तो जन्मजात शाळामास्तर असल्यानें तपासण्यासाठीं समोर आलेल्या प्रत्येक कागदांतील व्याकरणाच्या चुका ( spelling mistakes ) दुरुस्त केल्यावांचून त्याला पुढें जाववत नसे.

त्या प्रांतांतील लोकांना शाळामास्तरची ही जिवंत खोड माहीत असल्यामुळें परदेशीं पाठवावयाच्या आपापल्या पत्रांमधून त्या त्या पत्रलेखकांनीं व्याकरणाच्या चुका जाणूनबुजूनच भरपूर करून ठेवल्या. आणि बिचाऱ्या सेन्सॉर झालेल्या शाळामास्तरच्या अंगचें मास्तरकीचें मूळचें पाणी जोरावल्या कारणानें त्यानें सारें लक्ष पत्रांतील व्याकरणाच्या चुका दुरुस्त करण्याकडेच केंद्रित केलें. त्याचा परिणाम असा झाला कीं, पत्रांतील मजकुराच्या मतलबाकडे त्याचें अवधान राहीनासें झालें आणि पत्रलेखकांच्या मनांतील अर्थ खुद्द सेन्सॉरच्या लेखणीवाटेच परस्थांना वाचावयास मिळूं लागला !

शाळामास्तर या प्राण्याची कुचेष्टा आतांपर्यंत अनेकांनीं अनेक तऱ्हांनीं केलेली आहे; पण वरच्या सत्यकथेंत शाळामास्तराचें जें स्वरूप व्यक्त होतें

तें आतांपर्यंतच्या सर्व कुचेष्टांहून जास्त निघृण आहे असें नाहीं वाटत तुम्हांला ? सत्य हें केव्हां केव्हां कल्पित कथेपेक्षां जास्त चमत्कारिक असतें असें म्हणतात त्याचें हें मूर्तिमंत उदाहरणच !

बिचारा शाळामास्तर ! आपल्या एकमार्गीपणामुळें साऱ्या जगाचा कायमचा हास्यविषय बनला आहे. शाळामास्तराचें जीवनच असें असतें कीं, वर्षानुवर्षे त्याच त्याच गोष्टी शिकवायच्या व करावयाच्या यापलीकडे त्याला कांहीं माहीत नसतें. याच सवयीचा जोर होऊन वरच्या गोष्टींतील शाळामास्तर समोरच्या पत्रांतील व्याकरणाच्या चुका दुरुस्त करीत बसला. आपण शाळामास्तर नसून सेन्सॉर आहोंत, व्याकरणाच्या चुका दुरुस्त करणें हें आपलें काम नसून पत्रांतील आक्षेपार्ह मजकुराला कात्री लावणें हें आपलें कर्तव्य आहे याची त्याला विस्मृति पडली. जर्मन रयतेनें परदेशीं पाठविलेलीं पत्रें म्हणजे शाळेंतील मुलांच्या एक्झरसाइजच्या वह्याच असें तो समजला !

बहुतेक शाळामास्तरांच्या आयुष्यांत मुलांच्या एक्झरसाइजच्या वह्यांपलीकडे इतर गोष्टींचा प्रवेश क्वचितच होतो. वयोमानाची मर्यादा ध्यानीं न घेतां सर्व जन्म ' शाळेच्या चिमण्या जगांत ' काढणारा प्राणी म्हणजे शाळामास्तर ! एका इंग्रजी कवितेंतील झऱ्याच्या उद्गारांत थोडा फेरफार करून

Boys may come and
boys may go
But I will remain
forever—a master !

असें मास्तरचें ध्येय सांगतां येईल. मास्तरच्या हाताखालीं शिकलेलीं किती तरी मुलें त्याच्या डोळ्यांदेखत महत्पदाला पोंचतात; पण बिचारा शाळामास्तर जेथें असतो तेथेंच जन्मभर राहतो ! सत्यभामेच्या अंगणां-

तील पारिजातकाचीं फुलें मात्र रुक्मिणीला मिळत असत; तसाच प्रकार शाळामास्तरच्या शिकवणीचा होतो– त्याचा फायदा नेहमीं दुसऱ्याला मिळतो. मास्तरला काय, दोनचार शिकवण्या कमीजास्त मिळतील, तेवढ्याच !

शाळामास्तरची दृष्टि व महत्त्वाकांक्षा सारखीच अधु असते. त्याच्या मर्यादित जीवनपरिघाचा तो अपरिहार्य परिणाम असूं शकेल. वरच्या जर्मन मास्तरचें उदाहरण घेतलें, तर सेन्सॉरशिपचें काम करण्याची संधि लाभल्याबद्दल त्याला निराळ्या दृष्टिलाभाचा आनंद न होतां चटकन् तो व्याकरण शोधीत बसण्याची मास्तरकीच करण्यांत मग्न होऊन गेला ! नव्या जीवनाची लज्जत चाखण्याचा प्रयत्न न करतां जुन्या चाकोरींतील ओझ्याखालींच तो दडपला गेला.

बहुतेक शाळामास्तरांची हीच तऱ्हा. कोठेंही गेलें तरी त्यांच्या मानगुटी-चें मास्तरकीचें भूत कांहीं सुटत नाहीं. माझे दोन दिलजान दोस्त शाळा-मास्तर आहेत. त्यांच्याबरोबर गप्पाटप्पा करण्याचा जेव्हां जेव्हां प्रसंग येतो, तेव्हां तेव्हां मी माझ्या मित्राबरोबर बोलत नसून एका शाळामास्तरशीं बातचीत करीत असल्याची वारंवार मला जाणीव होते. वरच्या जर्मन शाळामास्तरप्रमाणें माझे एक शाळामास्तर मित्र व्याकरणाशिवाय दुसऱ्या कोणत्याच विषयावर कधीं बोलत नाहींत. त्यांच्या मतें प्रत्येक व्यक्तीला व्याकरणशुद्ध मराठी बोलतां व लिहितां आल्याखेरीज हिंदुस्थानला स्वराज्य मिळणें शक्य नाहीं ! हिंदुस्थानांत घटनासमितीपेक्षां व्याकरणसमितीची स्थापना होणें अधिक अगत्याचें आहे असा त्यांचा आग्रह आहे; आणि श्री. जिनांच्या मागणीप्रमाणें हिंदुस्थानचे दोन विभाग करायचेच असतील, तर ते वैय्याकरणी हिंदुस्थान व व्याकरणहीन हिंदुस्थान या तत्त्वांवर करावेत अशी त्यांची सूचना आहे !

माझ्या दुसऱ्या शाळामास्तर मित्राला भूगोल आणि खगोल या विषयाचें

वेड आहे. संध्याकाळीं ते जेव्हां जेव्हां माझ्याबरोबर रेक्लमेशनवर फिरायला येतात, तेव्हां तेव्हां त्यांच्या मास्तरकीमुळें फिरण्याची सारी मिजास विघडून जाते असा माझा अनुभव आहे. समोर पसरलेल्या अफाट सागराच्या विलोल नर्तनांतील काव्यमाधुरी अनुभवण्यापेक्षां आकाशांतील निरनिराळ्या ग्रहांचीं स्थानें, त्यांचें परस्परांतील अंतर, पृथ्वीपासून त्यांचें अंतर, वगैरे रूक्ष माहिती ते मला नेहमीं पाजीत असतात. अशा वेळीं कै. गडकऱ्यांच्या धीडपानी नाटकांतील प्रो. कोटिबुद्धयांची मला आठवण होते. मी अनेक वेळां निषेध प्रगट केला असतांही आपलें खगोलशास्त्रांतील प्रभुत्व माझ्या डोक्यांत कोंबण्याचा त्यांचा हट्ट अद्याप कायम आहे.

शाळामास्तराच्या स्वभावांतील ही गोम आहे. ठराविक गोष्टी ठराविक पद्धतीनें करीत राहायचें; त्यांत बदल म्हणून होऊं द्यायचा नाहीं. माझ्या लहानपणीं आमच्या शाळेंत एक मास्तर होते. आम्हांला ते इंग्रजी शिकवीत. पुस्तकांतील प्रत्येक वाक्याचा ते एकदांच सरळ अर्थ सांगत व पुढें जात. मात्र प्रत्येक वाक्याचा अर्थ सांगून झाला कीं, 'समजलं ना रे?' हा प्रश्न हटकून यायचा. 'मास्तर, आम्हाला नाहीं समजलं हें' असें शाळेंतील पोरें क्वचितच म्हणतात हें माझ्या वाचकांना स्वानुभावावरून माहीत असेलच; पण त्यांतूनही एखादा खट भेटलाच, तर मास्तरमजकूर त्याला म्हणत, "काय? इतकं (?) सांगूनही तुला समजलं नाहीं? मग तुला कितीही सांगितलं तरी समजणार नाहीं. बैस जाग्यावर!" इतक्याही उपर कोणी म्हटलंच कीं, "मास्तर, थोडंसं समजलं." तर मास्तर उत्तर देत, "मग आणखी विचार कर, म्हणजे उरलेलं समजेल!" असा हा फार्स नेहमीं चालायचा. जर कोणतेंही वाक्य पुन्हा सांगायचें नाहीं, तर 'समजलं ना रे ऽ?' हें तरी मास्तर कशाला विचारतात असा प्रश्न मला पडे. पण मास्तरांची ती आपली एक सवय होती हें आतां मला कळतें.

आतांशा शिक्षणपद्धतींत पूर्वींच्या मानानें फार बदल झाला आहे; पण शाळामास्तर मात्र आहे तसाच प्राणी आहे. फरक झालाच असेल, तर पूर्वींचे मास्तर आपापल्या विषयांत बरेचसे मुरब्बी असत व हल्लींचे मास्तर बहुतांशीं नोट्सवर आपला संसार मारून नेतात. पूर्वींच्या मास्तरांच्या हातांत छडी असे व एखाद्या सैनिकाप्रमाणें तिचा ते भरपूर उपयोग करीत; त्यामुळें विद्यार्थ्यांना मास्तरांचा विलक्षण दरारा असे. आतां मास्तरांनाच उलट विद्यार्थ्यांचा दरारा उत्पन्न झालेला आहे ! पूर्वींच्या मास्तरनें धडधडीत चुकीची माहिती दिली, तरी विद्यार्थी निमूट ऐकून घेत; आजच्या मास्तरांची बिनचूक माहिती देखील चुकीची असल्याचें विद्यार्थी सिद्ध करूं शकतात ! पूर्वींच्या मास्तरशीं अधिकउणा शब्द बोलण्याचें धैर्य विद्यार्थ्यांना होत नसे, तर या आठवड्यांत कोणते बोलपट बघण्यासारखे आहेत, कोणती नवीन कादंबरी चांगली आहे, वगैरे प्रश्नांसंबंधीं आपापल्या मास्तरांना 'टिप्स्' देण्यापर्यंत आजच्या विद्यार्थ्यांची प्रगति झालेली आहे !

मला वाटतें, या बदललेल्या परिस्थितीचें कारण मास्तरच्या हातची काढून घेण्यांत आलेली छडीच असावी. 'छडी वाजे छम् छम्, विद्या येई घम् घम्' हें जुनें सुभाषित आज आजोबांच्या बाराबंदीप्रमाणें दुर्मिळ झालेलें आहे. नखें काढून घेतलेल्या वाघाप्रमाणें छडीहीन मास्तर निष्प्रभ झाला असल्यास नवल काय ? मास्तराविषयींचा समाजांतील आदरही पण या छडीबरोबरच नाहींसा झाला आहे. निःशस्त्र हिंदुस्थानप्रमाणेंच निःशस्त्र मास्तर कुचेष्टेचा विषय बनला. मास्तरची योग्यता तात्त्विक दृष्ट्या नाकबूल करतां येणार नाहीं. उलट मी तर म्हणतों कीं, जिच्या हातीं पाळण्याची दोरी, तीच 'राष्ट्रातें उद्धरी' या जीर्ण म्हणीपेक्षां

'ज्याच्या हातीं तरुण पिढी
तोच सोडवील राष्ट्राचीं कोडीं'

ही म्हण मास्तरांच्या बाबतींत जास्त यथार्थ होण्यासारखी आहे.

पण आजचा शाळामास्तर विचारा 'राष्ट्राचीं कोडीं' सोडविण्यापेक्षां स्वतःच्या 'पोटाचें कोडें' सोडविण्यांतच मेटाकुटीला आला आहे. अर्धांगी बोलपटांतील दामू मास्तर व त्याचें 'झटपट विद्यालय' हीं केवळ विनोदाच्या अतिशयोक्तीचीं उदाहरणें नव्हेत. एका वर्षांत तीन-चार इयत्ता करून देणारे कैक दामूमास्तर समाजांत आहेत. आणि त्यांपैकीं पुष्कळांचें ज्ञानही दामूमास्तरापेक्षां अधिक नसल्याचा अनुभव येतो. परवांच माझ्या एका मित्रानें एका शाळामास्तराबरोबर बोलतांना एक मनोरम कोटी केली. मित्राच्या 'बोंडेफकीर'पणाला उद्देशून सदर शाळामास्तर टोमणा मारण्याच्या हेतूनें म्हणाले:—

" तुमच्यासारखे तरुण लोक लग्न करण्यास कांकूं करीत असल्यामुळें आम्हां शाळामास्तरांना शिकवण्या करण्यास नव्या मुलामुलींची चणचण भासत आहे."

यावर माझ्या मित्रानें तावडतोब उत्तर केलें—

" तुमच्यासारखे शाळामास्तर झाल्यामुळेंच आम्हांला हें सक्तीचं संततिनियमन करणं भाग पडत आहे !"

परिस्थितीनें शाळामास्तरच्या दृष्टीचें क्षितिज देखील कसें आपोआप आकुंचित झालें आहे पाहा. एका शाळामास्तरला त्याच्या एका हितकर्त्यानें एका ठिकाणचा पत्ता दिला व " तेथें शिकवणीसाठीं तुझी मीं शिफारस केली आहे. भेटून नक्की करून ये" म्हणून सांगितलें. मास्तर तेथें जाऊन घरच्या कर्त्या पुरुषास भेटला. शिकवणीची वेळ वगैरे ठरल्यावर देण्याघेण्याचा प्रश्न निघाला; तेव्हां शाळामास्तरानें मोठा धीर करून आपणाकडून पंचवीस रुपयांचा आंकडा सांगितला. घासाघीस करून विसाला प्रश्न सुटेल अशी त्याची अपेक्षा होती. पण तो गृहस्थ हसून म्हणाला, " अहो, तुमच्या मित्राकडे तर मीं पन्नास रुपये देण्याचं कबूल केलं आहे कीं ! "

'मास्तर आहेस झालं' असें हेटाळणीनें म्हणण्याची पद्धत रूढ आहे. अजागळ व मंदबुद्धि माणसाला 'मास्तर' हें टोपणनांव देण्यांत येतें. मास्तर म्हणजे कोणीही टोपी घालावी असा निरुपद्रवी प्राणी! पण 'मास्तर' या शब्दांत हेटाळणीचा भरलेला अर्थ फक्त शाळामास्तरापुरताच मर्यादित आहे. कारण शाळामास्तराव्यतिरिक्त इतर ठिकाणीं मास्तर हें विशेषण मानाचें मानण्यांत येतें. कलेच्या क्षेत्रांत तर 'मास्तर' ही पदवीच ठरूं पाहत आहे. 'मास्तर कृष्णा', 'मास्तर विनायक', 'मास्तर मनहर बर्वे', 'मास्तर दीनानाथ' वगैरे कलावंतांना जडलेली 'मास्तर'ची उपाधि अनादराची दर्शक नाहीं खास. सर्कशीमध्यें वाघसिंहांचीं कामें करणारा 'मास्तर क्ष' किंवा 'मास्तर ज्ञ' म्हणूनच प्रायः ओळखला जातो. कलेच्या क्षेत्रांत जो 'मास्तर' गौरवास्पद व्हावा, तो शाळेच्या क्षेत्रांत उपहासास कां पात्र व्हावा हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

गोल्डस्मिथच्या डेझर्टेड व्हिलेज ( ओसाड खेडेगांव ) या मनोरम काव्यांतील गांवकऱ्यांना आपल्या शाळामास्तराचें जें कौतुक वाटे तसें कौतुक हल्लीं किती मास्तरांच्या वांट्याला येत असेल चित्रगुप्त जाणे! खेडवळांना आपले सर्व प्रश्न शाळामास्तरला विचारून त्याच्या सल्ल्याप्रमाणें चालण्याची सवय असल्यामुळें

How one small head could carry all he knew

याचें त्यांना परम आश्चर्य वाटे असें गोल्डस्मिथ उपरोधिक वर्णन करतो. पण तो निरागस जमाना आतां कोठें आहे? आजच्या विद्यार्थ्यांना मास्तरपेक्षां ज्ञान ( General knowledge ) जास्त असतें असें माझ्या एका शाळामास्तर मित्रानें मला सांगितलें आहे आणि एका प्रसंगानें मलाही तसेंच वाटूं लागलें. माझे पूर्वींचे एक शाळामास्तर मला अलीकडेच एका सिनेमाच्या थिएटरांत भेटले. त्यांना सिनेमाला आलेले पाहून मला नवल वाटलें. कारण मी शाळेंत असतांना या विषयासंबंधींचीं त्यांचीं मतें मला

ठाऊक होतीं. तेव्हां साहजिकच मीं मास्तरांना या प्रकाराचा खुलासा विचारला, तेव्हां ते म्हणाले—

" शाळेंतील सारींच पोरं सिनेमाचीं नादी असतात आतांशा. त्यांच्या बरोबर कालाच्या मानानं राहायचं म्हणजे हे सारे प्रकार करावेच लागतात. नाहीं तर वर्गांत मास्तरच्या अज्ञानाचं हसूं होतं."

— आणि हें कांहीं खोटें नाहीं. गांधी गोलमेज परिषदेला गेल्यावेळीं लंडन येथें त्यांची व चार्ली चॅप्लीनची भेट झाली तेव्हां 'चार्ली चॅप्लीन हा कोण गृहस्थ?' असा अज्ञानदर्शक प्रश्न गांधींनीं विचारला होता. गांधींनाच म्हणून तें अज्ञान शोभून गेलें! पण एखादा शाळामास्तर जर वर्गांत तशासारखा 'शांता आपटे अगर मीनाक्षी कोण आहे?' असा प्रश्न करील, तर सारीं लहानमोठीं मुलें मास्तरच्या अज्ञानाला खदखदून हसल्यावांचून राहणार नाहींत याबद्दल माझी खात्री आहे. शिक्षकांच्याबरोबरीनें पूर्वीं विद्यार्थ्यांना अभ्यास करावा लागे; आतां विद्यार्थ्यांच्या पावलावर पाऊल टाकून शाळामास्तरला ज्ञान संपादन करावें लागत आहे!

---

# सिनेमा नट

वर्तमानपत्रें म्हणजे पिकाळ शेतेंच असतात. शेतांत नवीं नवीं पिकें प्रतिसाल येत असतात, तद्वत् वर्तमानपत्रांत प्रतिदिनीं नव्या नव्या बातम्या येत असतात. माणसाच्या पोटाची भूक भागविण्यासाठीं शेतें धान्याचें पीक पुरवतात, आणि त्याच्या बुद्धीची भूक भागविण्यासाठीं वृत्तपत्रें बातम्यांचें पीक पुरवतात. म्हणूनच मला खानावळीप्रमाणें वर्तमानपत्रही रोजच्या रोज जवळ करावें लागतें. वर्तमानपत्रांत सध्यां युद्धाच्या बातम्यांनीं बरीचशी जागा अडवलेली असते, तरीही अधून मधून कांहीं विचित्र बनावाच्या बातम्याही वाचावयास मिळतातच. गेल्या आठवड्यांत वाचलेल्या एका बातमीकडे याच कारणामुळें माझें विशेष लक्ष वेधून राहिलें.

ती बातमी अशी—

## 'मॅट्रिक नापास झालेल्यांचा सिनेमांत प्रवेश

झांशी, ता. २० मे—असें समजतें कीं, या आठवड्यांत लागलेल्या शालेय परीक्षांच्या निकालामुळें कांहीं आत्महत्या आणि कांहीं गृहत्याग घडून आले.

आठवी आणि नववी या इयत्तांतील दोन विद्यार्थ्यांनीं, वरच्या वर्गांत चढविण्यांत न आल्यामुळें, पायांना मोठाले दगड बांधून लक्ष्मी तलावांत जीव दिला, तर आणखी एक विद्यार्थी गेले दोन दिवस कोठें बेपत्ता झाला आहे.

दोन विद्यार्थ्यांनीं मात्र, आपल्या शालेय जीवनांत अनेकदां अपयश आल्यामुळें, शिक्षण सोडून देऊन सिनेमांत नट होण्याच्या उद्देशानें मुंबईस प्रयाण केलें आहे.'

या बातमींतील तिसऱ्या परिच्छेदानें मला विचार-प्रवृत्त केलें. पहिल्या दोन परिच्छेदांतील बातमींत कारुण्य असलें, तरी नावीन्य नव्हतें. परीक्षेंत मिळालेल्या अपयशानें आतांपर्यंत किती तरी तरुण व होतकरू जीवांचा असा शेवट केला आहे. आणि पुढील आठवड्यांत मुंबई विश्वविद्यालयाच्या प्रवेशपरीक्षेचा निकाल लागणार आहे, त्यानंतरही असल्या खेदकारक बातम्या थोड्या प्रमाणांत तरी कानांवर येण्याचा संभव आहे, असें इतक्या वर्षांच्या अनुभवावरून वाटतें.

परंतु अशा निराश विद्यार्थ्यांचें लक्ष, वरील बाबतींत जो एक 'संदेश' आहे तिकडे मी वळवूं इच्छितों. आपल्याला परीक्षेंत अनेकवार प्रयत्न करूनही यश न मिळाल्यामुळें दोघां विद्यार्थ्यांनीं तो नादच सोडून मुंबईला जाऊन सिनेमाच्या धंद्यांत नशीब काढण्याचें ठरविलें हें वाचून मला समाधान वाटलें. नापास विद्यार्थ्यांनींही अपयशानें हताश होऊन जीवाचें बरेंवाईट करण्यापेक्षां असा कांहीं तरी मार्ग काढावा यांतच खरा 'माणूसधर्म' आहे.

शाळेंतील पुस्तकी विद्या अवगत होत नाहींसें पाहून तिचा पाठलाग करण्याचा अयशस्वी मार्ग सोडून उपरोक्त दोघां झांशीकर तरुणांनीं सिनेमांत शिरण्याचें ठरविलें ही गोष्ट मला बरीच सूचक वाटते. शाळेंत त्या दोघां वीरांनीं बरींच अपयशें ( failures ) मिळविलीं आहेत, यावरून 'फिरून यत्न करा' ही शालोपयोगी पुस्तकांतील 'एका कोळियाची' शिकवण त्यांनीं अमलांत आणून पाहिली आहे हें सिद्ध होतें. आतां 'यत्ने कृते यदि न सिद्ध्यति कोऽत्र दोषः' हें सुभाषित प्रसिद्धच आहे. तेव्हां अखेर देवी सरस्वतीची वश होण्याची इच्छा नाहीं हें दिसून येतांच त्यांनीं तिचा वृथा पिच्छा पुरविण्यापेक्षां सरस्वतीची सनातन वैरीण जी लक्ष्मी तिचा खळखळाट जेथें सारखा ऐकूं येतो अशा सिनेमासृष्टींत प्रवेश करण्याचें ठरवून एक प्रकारें सरस्वतीचें उट्टेंच फेडलें आहे असें मला वाटतें. एक सरस्वतीची तरी उपासना करा, किंवा लक्ष्मीच्या भजनीं लागा, हा ध्वनि दोघां झांशीकर तरुणांच्या कृतींतून काढतां येण्यासारखा आहे.

पूर्वी शाळेला किंवा अभ्यासाला कंटाळून अनेक विद्यार्थी नाटक कंपन्यांत पळून गेल्याचीं उदाहरणें माझ्या वाचकांच्या कानांवरून गेलीं असतीलच. 'माझी भूमिका' या आपल्या आत्मचरित्रांत रा. गणपतराव बोडस यांनींही आपल्या असल्या पलायनाची मनोरंजक हकीकत दिली आहे. मराठी रंग-भूमीवर पुढें ख्यातनाम झालेल्या अनेक नटांचा नाटकांत प्रथमप्रवेश पलायनाच्या द्वारानेंच झालेला आहे. आतां नाटक कंपन्याच जिवंत राहणें मुष्कील झाल्यामुळें घरांतून पळून जाऊं पाहणाऱ्यांचा तो रस्ता बंद झाला आहे.

परंतु नाटकांची जागा सिनेमानें घेतली, तशी नाटक कंपन्यांची जागा सिनेमा कंपन्यांना घ्यायला अडचण नसावी असें झांशीकरद्वयाच्या उदा-हरणावरून वाटूं लागतें. विद्यार्थ्यांनीं, अभ्यासाचा कंटाळा आला ( आणि तसा तो कोणत्या विद्यार्थ्याला येत नाहीं म्हणा ! ), किंवा परीक्षेंत अपयश आलें कीं, जीवाचें बरेंवाईट करून घेण्यापेक्षां सिनेमांत पळून जाणें हा आपद्धर्म म्हणून मान्य करायला मीं तरी कांकूं करणार नाहीं.

सिनेमासृष्टि ही स्टूडिओबाहेरच्या लोकांना प्रत्यक्ष अलका नगरीच वाटत असते. सिनेमांतील नायक प्रेक्षकांच्या दृष्टीनें किती भाग्यवान् ! कांहींही कारण नसतां, प्रथम दृष्टिक्षेपांतच, एक सुंदर व श्रीमंत छबकडी त्याच्यावर बेहद्द फिदा होते. एक व्हिलन् सोडला तर बाकी सारेजण त्या नायकावर लुब्ध झालेले दिसतात; मात्र हे लोक त्याच्या कोणत्या गुणावर इतके बेहोप होतात याचा प्रेक्षकांना अखेरपर्यंत पत्ता लागत नाहीं, हा भाग वेगळा ! जेव्हां जशी जरूर पडेल त्याप्रमाणें घोड्यावर बसणें, मोटर चालवणें, फेन्सिंग करणें, उंच उड्या मारणें, मवाली गुंडांना बुक्क्या मारून लोळवणें, कॉलेजांत पहिला नंबर मिळविणें, संकटांत सापडलेल्या 'सुंदरी'ला सोडवून नंतर तिच्याशीं लग्न करणें, जुगाराच्या अड्ड्यावर सापडलेल्या वेश्येला पोलिसांच्या अटकेंतून सोडवून स्वतःच्या मायापाशांत अटकावणें, मच्छी-

मारीचा धंदा करतां करतां एक छबेली त्या जाळ्यांत पकडणें, किंवा स्वतः बेकार व अन्नाला महाग असतां एका थोर घराण्यांतील परित्यक्ता स्त्रीचा 'सहारा' होणें, इत्यादि अनेक किमया सिनेमांतील नायकाला तळहातावरील मळासारख्या असतात. आतां या सर्व 'विद्या' तो केव्हां व कोठें शिकतो हा मोठाच प्रश्न आहे.

सिनेमांतील नायकांचा हेवा करण्यासारखा गुण म्हणजे त्यांना कधीं कोठें अपयश येत नाहीं, आणि मला वाटतें उपरोक्त झांशीकर मित्रद्वयानें अनेक अपयशांचा अनुभव घेतल्यानंतर नेमका सिनेमाचा धंदा निवडून घेतला याचें कारण हेंच असावें. सिनेमांत एकदां जो 'हीरो' तो कायमचा 'हीरो' ! मग तो हीरो आचरटमूर्ति सत्यवान असला, तरी त्याच्यावर विदुषी अरुंधती खूष, तितकीच अडाणी सावित्रीही खूष! मूर्ख व अशिक्षित स्त्रीला जो अजागळ पुरुष भुरळ पाडतो, तोच शहाण्या व शिकलेल्या स्त्रीलाही तितकाच मनपसंत वाटावा हें भाग्य फक्त सिनेमांतील नायकाच्याच कपाळीं कोरलेलें असतें !

सिनेमांत शिरायला अंगीं कांहीं विशेष गुण किंवा शिक्षण लागतें असेंही नाहीं. उलट इतर सर्व ठिकाणीं अपयशी ठरलेले कित्येक लोक सिनेमासृष्टींत भलतेच यशस्वी ठरलेले आहेत ! याही दृष्टीनें झांशीकर मित्रद्वयाचा विचार स्वागतार्ह आहे. सुशिक्षितांनीं सिनेमांत प्रवेश करण्याची आवश्यकता अनेकजण प्रतिपादतात. सिनेमांत पाऊल टाकल्याबरोबर जशी प्रत्येक नटीच्या 'कुलीन'पणाची भडक जाहिरात करण्यांत येते, तद्वत् प्रत्येक नटाच्या शिक्षणसंपन्नतेचीही करण्याची प्रथा पडत आहे. परंतु जाहीर करण्यांत येणारें नटीचें वय आणि नटाचें शिक्षण हे जाहिरातबाजींतील 'परिहासविजल्पितम्'चे नमुने असल्यामुळें त्यांत 'सत्या'चा बाद आंकडाच जास्त असतो ! एखाद्या नटीच्या कुलीनपणावर मुद्दाम जोर देऊन तिचें श्रेष्ठत्व भासविण्याचा प्रयत्न करण्यांत येतो, तेव्हां मला

खडाष्टक नाटकांतील "स्वतःच्या कृतीनें कुलाला लीन करील ती कुलीन" ही अर्थपूर्ण कोटी आठवते. आणि नटाच्या शैक्षणिक लायकीचा नगारा वाजविला जातो तेव्हां, त्याच्या ज्ञानाच्या अकटोविकटपणाचा मला अचंबा वाटतो !

सिनेमाविषयक एका इंग्रजी मासिकांत सिनेमानायकाच्या भूमिका करणाऱ्या नटाच्या अंगीं कोणते गुण असतात याचा एकदां उपरोधिक तक्ता आला होता:—'

| | | |
|---|---|---|
| जाहिरात | ४० | टक्के |
| नशीब | ३० | टक्के |
| प्रौढी | २५ | टक्के |
| गार्वो | २½ | टक्के |
| व्हॅलंटिनो | १½ | टक्के |
| बुद्धिमत्ता | शून्य | |
| शिक्षण | ,, | |
| अक्कल | ,, | |
| दानत | ,, | |
| | १०० टक्के 'मॉडर्न हीरो !' | |

राजकारणी पुढाऱ्याप्रमाणेंच सिनेमानटाचीही मदार बहुतांशीं जाहिरात-बाजीवर असते. पुढाऱ्यांच्या 'आजारा'प्रमाणेंच सिनेमानट-नटींना होणाऱ्या 'अपघातां'चा 'आंतील आवाज' आतां बहुतेकांना कळून चुकला आहे. अर्थशून्य शब्दांचा अगडबंब पसारा पुढाऱ्यांप्रमाणेंच सिनेमानटांच्या तोंडून बाहेर पडून कानांवर आदळतो. धडधडीत खोट्या व लोकांच्या डोळ्यांत उघड उघड धूळ फेकणाऱ्या मुलाखती (व त्यासोबत आपला ऐटबाज फोटो) वर्तमानपत्रांत छापून आणण्याच्या कामांत तर पुढारी

आणि सिनेमानट यांची 'नेक-टू-नेक' शर्यतच चालू असल्याचा भास होतो. आणि दोघांच्याही जाहीर व खाजगी मतांत कम्यूनिझम व फासिझम-इतकें अंतर आढळतें ! उक्ति आणि कृति यांच्यांत मेळ नसणें हेंही दोघांत आणखी एक उल्लेखनीय साम्य आहे.

पुढाऱ्यांचें महत्त्व अनुयायांच्या संख्येवर आणि सिनेनटाचें प्रस्थ फॅन-मेलवर बरेंचसें अवलंबून असतें. निवडणुकीस उभे राहिलेले कैक उमेदवार आपल्या पुढ्यांतील लोकांच्या वर्गण्या स्वतःच्या खिशांतून भरून त्यांची मतें मिळवितात, तसाच प्रकार कांहीं सिनेनट आपल्या स्टूडिओच्या पत्त्यावर स्वतःच 'फॅन-मेल' पाठवून मालकावर 'इम्प्रेशन' मारण्याचा प्रयत्न करतात ! राजकारणी पुढारी एकमेकांना गालिप्रदान करीत असतात तसे सिनेनट देखील आपल्या व्यवसायबंधूंचा अस्सल शब्दांनीं उद्धार करीत असतात ! आपली चळवळ यशस्वी झाली तर तिचें एकशें दहा टक्के श्रेय स्वतःच्या पदरांत टाकायला धडपडायचें आणि चळवळ अपेशी ठरली, तर अनुयायांच्या अंगचुकारपणाला दोष द्यायचा, हा पुढाऱ्यांचा निष्कामकर्मयोगही सिनेनटांच्या अंगांत मुरलेला असतो. चित्रपट यशस्वी झाला, तर आपल्याच केवळ करामतीचा तो परिणाम भासवावयाचा, आणि चित्रपट 'पडला', तर दिग्दर्शकापासून रिफ्लेक्टर धरणाऱ्या पोऱ्या-पर्यंत सर्वांवर एकजात घसरायचें, हा बहुतेक सिनेनटांचा बाणा असतो !

आणि उपरोक्त झांशीकर मित्रांनीं सिनेमासृष्टीची निवड बहुधा याच गोष्टी-कडे लक्ष देऊन केली असावी. परीक्षेंत अपयश आल्यास त्याचें खापर शहाजोगपणें परीक्षकाच्या माथीं फोडण्याची आपली केवढीही इच्छा असली, तरी लोकांचा त्या थापेवर विश्वास बसूं शकत नाहीं. सिनेमांतील अपयशाचें धनीपण दुसऱ्याच्या माथीं खुशाल मारतां येतें. आणि म्हणूनच मला वाटतें, इतर अनेक क्षेत्रांत अयशस्वी झालेल्या लोकांना सिनेमासृष्टींत लौकिक, मान्यता व पैसाही मिळवितां आला आहे. घरादारांत उनाडटप्पू म्हणून गाजलेला व घरच्या मंडळींनीं कंटाळून घराबाहेर हाकून दिलेला एक

इसम सिनेमासृष्टींत यशस्वी दिग्दर्शक म्हणून सध्यां मिरवीत असलेला माझ्या माहितीचा आहे. एक पानपट्टीवालाही असाच चुकून सिनेमांत शिरला, नि बायरनप्रमाणें एका रात्रींत प्रसिद्धीला आला. परदेशीं उच्च शिक्षणासाठीं जाण्याच्या इराद्यानें मुंबईला आलेला एक उत्तरहिंदुस्थानी इसम एका स्टूडियोंत गेला, आणि तिथेंच रमून आजकाल एक नामवंत नट झाला आहे. अशीं किती तरी उदाहरणें आहेत. रस्त्यावरची भिकारीण किंवा विशिष्ट रस्त्यावरच्या गांवसावित्री सिनेमासृष्टींत पदार्पण केल्यामुळें आज एवढ्या योग्यतेला चढल्या आहेत कीं, एरवीं जेथें त्यांचें नांवही कोणी तोंडानें उच्चारलें नसतें, तेथें आज चांगल्या चांगल्या कुटुंबांतून देखील त्यांचे विविध पोझिसमधील फोटो दर्शनी भागांत मांडलेले दिसून येतात !

आतां साऱ्यांचेंच भाग्य सिनेमासृष्टींत देखील असें फळफळत नाहीं हें खरें आहे. नाहीं तर मी देखील वर्तमानपत्रांत लेख लिहिण्याच्या ऐवजीं सिनेमांत गेलों असतों ! उपरोक्त झांशीकर मित्रांप्रमाणें मोठ्या आशेनें स्टूडियोंत पाऊल टाकणाऱ्या कांहीं होतकरू तरुणांना नायकांच्या भूमिका करण्याची तहान मॉब् सीन्समध्यें उपऱ्या (एक्स्ट्रॉ) म्हणून तिष्ठत राहूनच भागवून घ्यावी लागली आहे. खलपुरुषाच्या भूमिकेसाठींच आपणाला परमेश्वरानें जन्माला घातलें आहे अशी प्रामाणिक समजूत असणाऱ्या कांहीं व्यक्तींना स्टूडिओच्या लेबॉरेटरीमध्यें फिल्म धूत बसण्यावरच समाधान मानून घ्यावें लागलें आहे. आणि कथालेखक होण्याच्या ईर्षेनें स्टूडिओंत प्रवेशिलेल्या कांहीं व्यक्तींचें लेखनकौशल्य निरनिराळ्या रद्दी चित्रपटांचे झोकदार 'राइट-अप्' लिहिण्यांतच खर्च होत आहे ! प्रत्येक ढगाला जशी रुपेरी कडा असते, तसा प्रत्येक झगझगाटाच्या खालीं काळोखही असतो ! सामान्य प्रेक्षकांना रजतपटावरील सिनेनटाची छबी आकर्षक वाटते, पण त्या मुखड्यावरील 'मेक-अप'ची रंगोटी दूर केली तर

" A majesty is nothing but
a jest when torn off its outs. "

या कटु सत्याचीच प्रचीति येण्याचा संभव फार. रस्त्यानें आपली भडक रंगाची स्पोर्टिंग कार बेफाम वेगानें हाकीत जाणाऱ्या बेदरकार सिनेमा-नटाकडे पाहून पुष्कळांना वाटणारें कौतुक त्या मोटारीच्या टँकमधील पेट्रोलचा तुटवडा नजरेला पडेल तर क्षणभरही टिकणार नाहीं हें मी स्वानुभवानें सांगतों.

# शेजारी

प्रभातच्या आगामी शेजारी या बोलपटाच्या नाना प्रकारच्या जाहिराती अलीकडे अनेक वर्तमानपत्रांत झळकत असलेल्या वारंवार माझ्या नजरेस पडतात. त्या जाहिराती वाचीत असतां, प्रभातचा हा 'शेज़ारी' कसा काय असेल हा विचार जसा मनांत हटकून येतो, तसाच आपल्या स्वतःच्या शेजाऱ्यांपैकीं कोणाची छबी स्पष्टास्पष्ट स्वरूपांत त्या बोलपटांत दिसेल कीं काय, हाही प्रश्न मनांत डोकावल्यावांचून राहत नाहीं. मला वाटतें माझ्या-प्रमाणेंच तुमच्याही मनांत हा प्रश्न येत असला पाहिजे. प्रभातनें काढलेले बहुतेक बोलपट माझ्याप्रमाणेंच तुम्हींहो पाहिले असतील असें मी धरून चालतों. परंतु त्यांपैकीं कोणत्याही बोलपटानें आगामी 'शेजारी'इतकी तुमच्या माझ्याशीं क्वचितच लगट केली असेल !

शेजारी म्हटला कीं, आपल्या अगदीं घराशीं येऊन भिडलेला प्राणी डोळ्यां-समोर उभा राहतो. प्रभातच्या 'अमृतमंथन'मधील राजगुरु तुमच्या माझ्या आयुष्यांत क्वचितच प्रवेश करील. 'उद्यां जेवायला येणार नाथ आमच्या घरीं' म्हणून आनंदानें नाचणारी अस्पृश्य छोकरी आपल्या आयुष्याला स्पर्श करतांना विरळाच आढळेल. आपण कोणावरही कधीं अन्याय करीत नसतो अशी तुमची-माझी प्रामाणिक श्रद्धा असल्यामुळें, अन्यायाशीं झगडणाऱ्या एखाद्या नीरेशीं आपला झगडा उत्पन्न होण्याचा जितका संभव, त्याहीपेक्षां एखाद्या मैनेच्या नादीं लागून जीवन जगण्याची पाळी आपल्यावर येण्याची शक्यता कमी. परंतु शेजारीची बात याहून अजीबात निराळी आहे. 'माणूस' म्हटला कीं, त्याच्या मागून 'शेजारी' हा आलाच !

शेजारी ! खरोखरी शेजारी हा आपल्या आयुष्यांतील अजब प्राणी आहे. तुम्ही पृथ्वीच्या पाठीवर कोठेंही जाऊन वसती करा, तेथें शेजारी तुमच्या पाठीशीं उभा असणारच ही खूणगाठ आहे. एक वेळ आपण आपले आईबाप, आप्तेष्ट, मित्र, वगैरे जवळच्या मंडळींना दूर करून लांब कोठें तरी जाऊन राहूं शकूं; परंतु त्या दूरच्या प्रांतींही शेजारी म्हणून ओळखला जाणारा प्राणी तुमच्याजवळ येईलच. कोठेंही गेलें तरी शेजाऱ्यांच्या तडाख्यांतून आपली सुटका होण्याचा संभव नाहीं. म्हणूनच मला वाटतें, प्राचीनकाळीं आमचे दूरदर्शी ऋषीमुनी तपश्चरणासाठीं हिमालयांत किंवा निबिड अरण्यांत जाऊन राहणें पत्करीत असावेत. निर्घोर 'तपश्चरण करावयाचें तर शेजाऱ्यांची कटकट जेथें मुळींच होणार नाहीं, असें ठिकाण शोधण्यावांचून गत्यंतर नसतें.

आपणही आपल्या शेजाऱ्यांच्या जाचाला त्रासून अनेकदां अरण्यवास पत्करण्याची भीष्मप्रतिज्ञा करतों, हें तुम्हांला आठवतच असेल. अर्थात् आपण ती प्रतिज्ञा कधीं पाळीत नाहीं हा भाग वेगळा! पण त्याचें कारण प्रतिज्ञापालनाच्या बाबतींतील आपला कमकुवतपणा हें खास नव्हे. तर ज्यांच्या त्रासाला कंटाळून आपण घरदार सोडून अरण्यवास पत्करणार, त्या शेजाऱ्यांचे भाईबंद तेथेंही भेटण्याची भीति आपणांस जाचत असते म्हणून ! 'भयानं गाठलं रान, तिथं भेटला मुसलमान' तशापैकीं अवस्था व्हायची.

अर्वाचीन सुधारणेचा हा परिणाम आहे. या सुधारणेच्या प्रगतीमुळें पूर्वींसारखीं निर्मक्षिक अरण्यें दुर्मिळ झालीं आहेत. पृथ्वीवरच काय पण मंगळावर देखील वस्ती असल्याचें अलीकडील शास्त्रज्ञ सांगतात. अर्थात् जेथें कोणी 'शेजारी' भेटणार नाहीं असें निवान्त ठिकाण अलीकडे दुर्लभ झालें असल्यास नवल नाहीं. कोठेंही गेलें तरी, स्वतःच्या जीवनाइतकीच स्वतःच्या शेजाऱ्यांचीही काळजी घेणें आजकाल आपणांस भाग पडतें.

रानटी युगांतून मनुष्य सुधारत जाऊन एकांडे शिलेदारीपेक्षां कळप करून राहण्याकडे जसजशी त्याची प्रवृत्ति होत गेली, तसतशा ज्या अनेक संस्था जन्म पावल्या त्यांत 'शेजारी' हा प्राणी फार महत्त्वाचा आहे. मानवी सुधारणेच्या किंवा प्रगतीच्या इतर अनेक बाबींशीं तुमचा माझा आयुष्यांत कधीं संबंधदेखील येत नाहीं. मात्र शेजाऱ्यांशीं आपला संबंध चोवीस तासांचा असतो. 'तुझे माझें जमेना नि तुझ्याशिवाय गमेना' ही म्हण बहुधा शेजाऱ्यावरूनच सुचली असावी असा माझा तर्क आहे.

आपले शेजारी हे नेहमीं आपल्या कल्याणाची चिंता बाळगीत असल्याचा अनुभव येतो. तुमचा तोल कोठें जातो, तुम्ही कोठें एखादी चूक करतां हें पाहण्यास तुमचे शेजारी घारीसारखे टपून बसलेले असतात. तुम्ही घरांत चार भिंतींआड बायकोशीं केलेली कुजबूजदेखील 'ब्रॉडकास्ट' करण्याची कामगिरी अनाहूतपणें तुमचे शेजारी करीत असतात. शेजाऱ्यांच्या या गुणधर्मावरूनच 'भिंतीला कान असतात' ही म्हण रूढ झाली असावी. तुमच्या दैनंदिन कार्यक्रमावर तुमचे शेजारी इतकी सूक्ष्म पाळत ठेवतात कीं, एखाद्या महान् क्रांतिकारकाच्या हालचालींवर नजर ठेवणाऱ्या सी. आय. डी. च्या हुशार अधिकाऱ्यानें देखील तोंडांत बोट घालावें !

प्रत्येक व्यक्तीचा शेजारी हा त्याचा आरसा आहे अशा अर्थाची एक इंग्रजी म्हण आहे. स्वतःचें प्रतिबिंब स्वतःला पाहावयास आरसा मदत करतो, तशीच शेजारीही करतो. आणि आरशाप्रमाणेंच उजव्याचं डावं आणि डाव्याचं उजवं करून दाखविण्याचा 'गुण' शेजाऱ्यांत असतो !- तुमच्या अंगच्या गुणविशेषांचा जर कधीं तुम्हांला गर्व वाटला तर तुमच्या शेजाऱ्याशीं थोडें भांडण उकरून काढा म्हणजे पांच मिनिटांत तुमचें गर्वहरण होईल. 'निंदकाचें घर असावें शेजारीं' असें म्हणून तुकाराम महाराजांनीं, निर्हेतुकपणें का होईना, निंदकांची दावण शेजाऱ्याशीं बांधण्यांत कमालीची सूक्ष्मदृष्टि व्यक्त केली आहे असें मला वाटतें.

शेजारी हा प्राणी असा आहे कीं, तो असला तर अडचण करतो आणि नसला तर खोळंबा करतो. शेजाऱ्यांत उपकारकता व उपद्रवीपणा हे दोन्ही विरोधी गुण एकसंस्थ झालेले असतात. त्यामुळें कांहीं वेळां शेजारी हा मोठा मोलवान् प्राणी वाटतो हें खोटें नसलें, तरी खट्याळ पोराच्या खोडकरपणाचें कौतुक करतांना जी सावधगिरी पाळावी लागते तीच दक्षता शेजाऱ्यापाजाऱ्यांबाबत तुम्हांला नेहमा घ्यावी लागते. शेजाऱ्यांवाचून साऱ्यांचें सर्व काळ काम निभावेलच असें जरी नसलें तरी शेजाऱ्यापाजाऱ्यांचें घोडें मात्र तुमच्या चांभारचौकश्या केल्यावांचून एक पाऊल नाहीं पुढें टाकायचें !

शेजाऱ्यांवर जो फाजील विसंबून राहील त्याची बत्तिशी सफाईनें केव्हां पडेल याचा नियम नाहीं. तुमच्या फजितीच्या प्रसंगासारखा आनंद तुमच्या शेजाऱ्यांना प्रत्यक्ष पुत्रजन्माच्या वेळींही होत नसेल. 'इंग्लंडची अडचण हीच आयर्लंडची सुसंधि' हें ब्रीद आयर्लंडला सुचलें याचें कारण इंग्लंड व आयर्लंड यांच्यामधील शेजारीपणाच असें मला वाटतें. तुमची अडचण हाच तुमच्या शेजाऱ्यांचा सुखक्षण असत नाहीं काय ? एक वेळ दूरच्या माणसांना तुमच्या अडचणीच्या प्रसंगीं तुमच्याबद्दल सहानुभूति वाटेल; पण तुमचे शेजारी मात्र दाराच्या फटी किलकिल्या करून संभावितपणें तुमच्या फजितीचा तो सोहळा उपभोगीत राहतील !

तुमच्या नाजुक मर्माचा किंवा वैगुण्याचा गांवभर बभ्रा कोण करतो याची तुम्हीं कधीं चौकशी केली आहे काय ? तशी ती करण्याचा तुम्ही प्रयत्न कराल तर तुमच्या शेजाऱ्यांच्या कर्तबगारीची थोडीशी चुणूक तुम्हांला जाणवेल. एवढ्याशा गोजिरवाण्या बाळाच्या तोंडांतील विश्वदर्शनानें यशोदामाईला वाटला त्याहीपेक्षां मोठा चमत्कार तुम्हांला तुमच्या शेजाऱ्यांच्या मुखानें होणाऱ्या विश्वदर्शनानें वाटेल याची खात्री असूं द्या. तुमच्याविषयीं हरतऱ्हेच्या कंड्या गांवांत पिकविण्याचें काम तुमच्या शेजाऱ्यांइतकें

निरलसपणें दुसरें कोणीच करीत नाहीं. आणि हे सर्व धंदे करण्याचा तुमच्या शेजाऱ्यांचा उद्देश मात्र तुमचें कल्याण व्हावें हाच एक असतो !

शेजारी या प्राण्याचें स्वरूप पौराणिक मयसभेसारखें असतें. स्नेहाचें जल क्षालवून कपटाच्या फरशीवर तुमचा कपाळमोक्ष करण्यांत शेजाऱ्यांचा कारस्थानी हात कोणीच धरूं शकणार नाहीं. कांहीं वेळां तर स्वतःचें नाक कापून देखील तुम्हांला अपशकुन करण्यास तुमचे शेजारी कमी करणार नाहींत ! याविषयीं एक प्रसिद्ध संस्कृत कथा येथें देण्यासारखी आहे.

फार प्राचीन काळीं एका गांवीं एक ब्राह्मण राहत होता. त्याच्या घरीं अठरा विश्वे दारिद्र्य नांदत होतें. त्याला कंटाळून त्यानें घोर तपश्चर्या केली व शेवटीं एकदांची देवता प्रसन्न करून घेतली. देवानें त्याला वर दिला कीं, तूं जें जें कांहीं इच्छिशील तें तें तात्काळ तुझ्या पायांशीं येऊन पडेल. परंतु त्यावरोबरच देवानें त्या वरदानांत असें एक कलम नमूद करून ठेवलें कीं, त्या ब्राह्मणाला ज्याची ज्याची म्हणून प्राप्ति होईल त्याची त्याची दामदुप्पट त्याच्या शेजाऱ्यांच्या पदरांत पडेल !

वरप्राप्तीच्या आनंदानें ब्राम्हण बेहोष झाला. देवतेला मनापासून धन्यवाद देत स्वारी स्वग्रामीं परत आली. तेथील स्वतःची 'चंद्रमौळी' झोपडी दृष्टीस पडतांच ब्राम्हणाला वर मिळाल्याची आठवण होऊन, त्या जागीं स्वतःचा एक भव्य राजवाडा उभा राहावा अशी त्यानें इच्छा व्यक्त केली. तात्काळ तो दरिद्री ब्राम्हण एका वैभवसंपन्न राजवाड्याचा मालक झाला ! परंतु त्याच क्षणीं त्याच्या प्रत्येक शेजाऱ्याला त्याच्याहीपेक्षां विस्तीर्ण, भव्य आणि प्रचंड अशा राजवाड्याची प्राप्ति झाली ! हें पाहून त्या ब्राम्हणाला चरकाच बसला.

राजवाड्याचा मालक झाल्यावर ब्राह्मणाला हाताखालीं दासदासी असाव्यात असें वाटूं लागलें. मनांत विचार येतांच दहाबारा दास त्याच्यासमोर हात जोडून सेवेला उभे टाकले. पण त्याबरोबरच त्याच्या प्रत्येक शेजाऱ्याला

त्याच्या दुप्पट दासांची प्राप्ति झाली. या प्रकारानें ब्राम्हणमहाशय अस्वस्थ होऊन गेले. त्याच्या मनांत येणारी प्रत्येक इच्छा क्षणार्धांत पूर्ण होत असे खरी, पण त्याबरोबरच त्याच्या शेजाऱ्यांचें वैभव दुपटीनें वाढून त्याच्या डोळ्याला असह्य वेदना देत असे ! आणि कोणता सच्चा शेजारी आपल्या शेजाऱ्याच्या वैभवानें सुखी होऊं शकेल ?

विपुल वैभव लाभूनही पूर्वीच्या दारिद्र्याहूनही तो ब्राम्हण जास्त दुःखी झाला. त्यानें आपले दासदासी, वैभव आणि राजवाडा हीं पार नाहींशीं व्हावींत अशी इच्छा केली, आणि त्याच्या इच्छापूर्तीबरोबरच त्याच्या सर्व शेजाऱ्यांचेंही तळपट झालें. सर्व कांहीं पूर्वस्थितीला आलें. एवढ्यानें तरी त्या ब्राम्हणाचें समाधान व्हावयाला हवें होतें, पण तो पडला शेजारी ! सूडबुद्धीचा जोर होऊन त्यानें आपला एक डोळा जावा अशी इच्छा केली. त्याबरोबरच त्याच्या शेजाऱ्यांचे दोन्ही डोळे गमावले आणि मग तो ब्राम्हण आपल्या उरलेल्या एका डोळ्यानें आपल्या शेजाऱ्यांचे होत असलेले हाल पाहून मोठा संतुष्ट होत्साता समाधानाचे श्वास सोडीत राहिला ! !

या गोष्टींतील अतिशयोक्ति जरी बाजूला ठेवली, तरी त्यांत मानवी स्वभावाची जी एक छटा दाखविली आहे, ती कितीही विषादकारक असली तरी खोटी मात्र नाहीं. तुम्हांला अनुभवानें माहीत असेल कीं, दूरच्या कुठल्या सोम्या गोम्याला गोव्याची लॉटरी फुटून बक्षीस मिळालें किंवा वर्तमानपत्रांतील क्रॉसवर्ड पझल सोडवून धनलाभ झाला, तर त्याची ओळख-देख नसलेले तुमचे शेजारी केवळ ती बातमी वर्तमानपत्रांत वाचूनही त्या सोम्या गोम्याचें कोण कौतुक करतात; पण तेंच तुम्हांला कोठें नशिबानें हात दिला तर मात्र, हेच शेजारी तुमच्या त्या दैवरेषेचा संबंध भलभलत्या कारणपरंपरेशीं लावून तुमचा आनंद खचीं करण्याचा प्रयत्न करतात !

मनुष्यामनुष्यांमधील शेजारधर्माप्रमाणेंच राष्ट्राराष्ट्रांमधील शेजारधर्माची अवस्था आहे. जर्मनीचा शेजारी फ्रान्स, पण त्याच्याशीं जर्मनीनें लढाई

केली, पण फ्रान्सच्याही पलीकडे असलेल्या स्पेनशीं मात्र जर्मनीची दोस्ती जमते. शेंकडों मैल दूर असलेल्या जर्मनी व इटलीशीं जपानचा मैत्रीचा करार जमूं शकतो, परंतु हद्दीला हद्द भिडलेल्या शेजारी चीनशीं मात्र त्याचें नेहमीं खडाष्टक माजलेलें. बाल्कन गटांतील छोट्या छोट्या राष्ट्रांचे हितसंबंध दूरच्या राष्ट्रांशीं जुळूं शकतात; पण आपापसांत मात्र त्यांची कायमची कुरकुर चालू असते. मनुष्याप्रमाणेंच शेजारी राष्ट्रेंही सलोख्यानें क्वचितच नांदतात.

प्रेमसंन्यासांत कमलाकर एके ठिकाणीं म्हणतो त्याप्रमाणें जगाच्या पेढीवर परदेशी कागदी हुंडी दर्शनीसुद्धां पटते, परंतु शेजारच्या दुकानदाराला मात्र रोख रुपयाची मोड मिळूं शकत नाहीं! शेजारधर्म, मला वाटतें, आतांशा फक्त उसनवारी करण्यापुरताच उरलेला असावा. मुंबईसारख्या गांवांत चाळींतील किंवा नळावरील भांडणें पाहिलीं कीं, शेजार जितका जवळचा तितका त्याचा आजार वाढायचा असा एखादा अलिखित संकेत आहे कीं काय याची शंका केव्हां केव्हां माझ्या मनांत चमकून जाते.

शेजाऱ्यांबाबत तुमची अजीबात कधीं कांहीं तक्रार नाहीं असें कधींच होत नाहीं! तुम्ही कोठेंही बिऱ्हाड करतांना प्रथम शेजार कसा आहे याची चौकशी करता. नवीन जागेंत गेल्यावर पहिले कांहीं दिवस तुम्हांला वाटतें कीं, असा शेजार दुनियेंत कोठें मिळायचा नाहीं. नव्यानें खानावळ बदलली कीं, पहिले चार दिवस सामान्यतः कोणतीही खानावळ पहिलीपेक्षां बरी वाटते; तसाच प्रकार नव्या शेजाऱ्यांचा असतो. परंतु हळूहळू हे नवे शेजारीही जुन्यांच्या वळणावर जात चालल्याचा तुम्हांला अनुभव येऊं लागतो आणि मग तुम्हांला वाटूं लागतें कीं, शेजारी या प्राण्याचे गुणधर्म पळसाच्या पानाप्रमाणें कोठेंही गेले तरी एकसारखेच असतात!

पण अशा वेळीं एक बारीकशी पण महत्त्वाची बाब तुम्ही नजरेआड करतां ती हीच कीं, तुम्हीही एक 'शेजारी'च आहांत! तुमच्या शेजाऱ्यां-

चा तुम्हांला कोणत्याही कारणामुळें जेव्हां जेव्हां संताप येईल व त्यांच्याविषयीं तुमच्या मनांत कांहीं येऊं नयेत असे विचार येतील तेव्हां तेव्हां बादशहा आणि बिरबल यांच्या अनेक चतुर आख्यायिकांतील एका गोष्टीची तुम्हीं मनांत याद करावी अशी मी भलामण करतों.

एकदां कांहीं कारणानें बादशहाची स्वारी आपल्या जांवयावर नाराज झाली व जगांतील साऱ्या जांवयांना सुळीं देण्याचा त्यानें बिरबलाला हुकूम सोडला. बिरबलानें खाविंदांचा तो हुकूम शिरसावंद्य मानून एवढ्या प्रचंड कार्याच्या पूर्ततेसाठीं कांहीं महिन्यांची मुदत मागून घेतली. कांहीं दिवसांनीं कार्याची तयारी कोठवर आली आहे हें पाहण्याची लहर आली असतां प्रत्येक जांवयाला सुळीं देण्यासाठीं तयार करण्यांत येत असलेले सूळ बिरबलानें बादशहास दाखविले. त्यांत शेंकडों लोखंडाचे, कित्येक इतर धातूंचे, कांहीं रुप्याचे आणि एक सोन्याचा होता.

बादशहाच्या प्रजाननांच्या इतमामाप्रमाणें निरनिराळ्या दर्जाच्या लोकांना सुळीं देण्यासाठीं निरनिराळ्या धातूंचे सूळ तयार केल्याचा खुलासा बिरबलानें केल्यावर त्याच्या बुद्धिमत्तेची तारीफ करीत बादशहानें विचारलें,—

“ बिरबल, हा सोन्याचा सूळ कोणाकरितां ? ”

“ खास आपणासाठींच, खाविंद.” बिरबल नम्रपणें उत्तरला. “आपणही कोणाचे तरी जांवई आहांतच ना ?”

आपल्या शेजाऱ्यांसंबंधीं अनेक प्रकारच्या कागाळ्या करतांना तुम्ही स्वतः एक शेजारीच आहांत याचें कसें अचूक विस्मरण पडतें तुम्हांला! म्हणून मला तुम्हांला एक नाजुक इशारा द्यावासा वाटतो कीं, तुमच्या शेजाऱ्यांपैकीं कोणाची छबी प्रभातच्या आगामी ‘शेजारी’मध्यें दिसते हें न्याहाळण्याच्या उद्देशानें गेल्यावर त्यांत कदाचित् तुमचेंच प्रतिबिंब तुम्हांला आढळलें तर नवल वाटूं देऊं नका. कारण तुमच्या शेजाऱ्यांप्रमाणेंच तुम्हींही कुणाचे तरी शेजारी आहांतच कीं ?

# शिरस्त्राण

आठदहा दिवसांपूर्वी वर्तमानपत्रांत आलेली एक बातमी विशेष कुतूहलजनक होती. इंग्लंडमधील जगप्रसिद्ध पत्रपंडित लॉर्ड नॉर्थक्लिफ हा आपल्या बातमीदारांना कोणत्या हकीकतीला 'बातमी' म्हणावें व कोणतीला म्हणूं नये याविषयीं कांहीं टिप्स देतांना सांगत असे कीं, माणसाला कुत्रें चावलें तर ती 'बातमी' नव्हे; पण कुत्र्याला माणूस चावला तर मात्र ती झाली ' बातमी '. याचा अर्थ अघटित किंवा लोकविलक्षण गोष्ट घडून आली, तर तिला वृत्तपत्राच्या दृष्टीनें बातमीचें महत्त्व येतें. मीं परवां वाचलेली बातमी लोकविलक्षणपणाच्या गुणामुळेंच 'बातमी' म्हणून महत्त्व पावली व म्हणूनच ॲसोशिएटेड प्रेसनें ती सर्वत्र प्रसिद्ध केली. ती बातमी अशी—

एक हैदराबादी हिंदु गृहस्थ गाडी पकडण्यासाठीं आपल्या बायकोचा हात धरून लखनौ स्टेशनच्या फलाटावरून धावत होता. गृहस्थमजकुराच्या डोकीवर मुसलमानी टोपी होती व ती बाई धावून घामाघूम झाली होती. अशा विचित्र परिस्थितींत तें जोडपें पाहून स्टेशनवरील पोलिसांना तो इसम म्हणजे हिंदु स्त्रीला पळविणारा कोणी मुसलमान गुंड असावा असा संशय आला, व पोलिसांनीं सरळ जाऊन त्याला अडविलें.

प्रवासी या प्रकारानें चिडला व रागारागानें तो पोलिसांना शिव्या देऊं लागला; पण त्याची भाषा पोलिसांना कळेना. 'ही माझी बायको आहे' असें तो गृहस्थ सांगत होता; पण पोलिसांना त्याचें म्हणणें कळेना. इकडे त्या बाईची ओढाताण सुरू झाली. नवरा एकीकडून ओढी व शिपाई दुसरीकडून! या रस्सीखेचींत त्या गृहस्थाचा विजय

होऊन तो बायकोसह पळूं लागला. पोलिस त्याच्या मागें धावला. पाठलाग करणाऱ्या पोलिसाच्या हातीं लागलेला त्या गृहस्थाचा सदरा खेचण्यांत आल्याबरोबर गृहस्थाचें जानवें तुटून पोलिसाच्या हातीं आलें व तो गृहस्थ हिंदुच असल्याबद्दल पोलिसाची खात्री झाली ! या साऱ्या गडबडींत ज्यासाठीं धावपळ करून त्यानें हें संकट स्वतःवर ओढवून घेतलें, ती गाडी मात्र विचाऱ्याची चुकली !

-

ऐतिहासिक काळांत पुण्याच्या कसबा पेठेंत शाहिस्तेखानाच्या जीवावर बेतलें होतें तें नुसत्या बोटांवरच निभावलें, तसाच कांहींसा प्रकार होऊन मशारनिल्हे हैदराबादकरांच्या बायकोवर बेतलेलें संकट गाडी चुकण्यावरच निभावलें ही काय कमी समाधानाची गोष्ट आहे ? खरोखरी डोकीवरील टोपीनें ओढवलेलें संकट गळ्यांतलि जानव्यानें टाळलें व जरी हैदराबादकरांच्या गळ्यांतील जानवें या लढ्यांत कामीं आलें, तरी त्यांच्या बायकोच्या गळ्यांतील मंगळसूत्र सलामत राहिलें ! ही प्रत्यक्ष घडून आलेली लघुकथा करुण व हास्य या दोन विरोधी रसांनीं भरलेली असून फार बोधपर असल्यानें हरेक गोष्टींत कांहीं तरी 'बोध' हवा असें म्हणणाऱ्या वाचकांना ही कहाणी कदाचित् रुचेलही.

'स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः' हाच या लघुकथेपासून प्राणिमात्रानें बोध घेतला पाहिजे असें माझ्या अल्पमतीला वाटतें ! हैदराबादकरमजकुरांनीं 'मुसलमानी' टोपी डोक्यावर घातल्यामुळें हा घोटाळा झाला, यावरून 'परधर्मो भयावहः' हें भगवद्वचन किती व्यापक अर्थानें खरें आहे हेंच सिद्ध होत नाहीं काय ? आणि आलेल्या अकल्पित आपत्तींतून या जोडप्याची सुटका जानव्याच्या प्रभावामुळें झाल्याकारणानें 'स्वधर्म' हाच शेवटीं मानवाचा तारकधर्म कसा हेंही ध्यानीं येतें. एका सामान्य लघुकथेंतून केवढा व्यापक व सर्वहितकारी तात्पर्यबोध निघाला पाहा ! पुण्याच्या संस्कृति-संरक्षण मंडळानें अश्लील चित्रें पाहण्यांत गर्क झालेली आपली

नजर जरा या बोधपर व स्वसंस्कृति संरक्षणाचें महत्त्व बिनतोड पटवून देणाऱ्या सत्यकथेकडे वळवावी अशी माझी नम्र सूचना आहे.

जानव्याची ब्रह्मगाठ दाखविल्यानें भुतेंखेतें दूर पळतात अशी एक सनातन समजूत आहे. प्रस्तुत गोष्टीनें तिचें सत्यत्व, परमार्थानें नव्हे, तरी थोडेंफार पटतें. भूत मानगुटीस बसणें आणि पोलिसचा ससेमिरा पाठीस लागणें यांत अधिक त्रासदायक गोष्ट कोणती हें नक्की सांगणें, स्वानुभवाच्या अभावीं, मला कठीण आहे. पण समाजांत असें दिसून येतें कीं, ज्यांना भूतबाधा होते ते लोक बव्हंशीं मनाचे दुबळे असतात. निगरगट्ट काळजाच्या मंडळींच्या वाऱ्यास भुतें क्वचित् जातात. चोर, दरोडेखोर, डाकू रामोशी, मवाली वगैरे बदमाषांचा संचार रात्रीं सर्वत्र होतो. त्यांना भुतांचें भय वाटत नाहीं; पण ही मंडळी पोलिसच्या भयानें मात्र नाड्या आंखडतांना दिसतात ! यावरून भुतांपेक्षां पोलिसांचा इंगा कांहीं औरच असला पाहिजे असें मानण्याकडे मनाचा कल होतो ! आणि अशा पोलिसाला देखील जानव्याची ब्रह्मगांठ ताळ्यावर आणूं शकते हें पाहिल्यापासून गळ्यांत दोन-तीन तरी जानवीं अडकविल्याखेरीज यापुढें कोठेंही प्रवासाला जायचें नाहीं असा मीं मनाशीं संकल्प केला आहे !

जानव्याच्या बाबतींत एक अडचण मात्र जाणवण्यासारखी आहे. माणसाच्या गळ्यांत जानवें असलें, तरी तें कपड्यांच्या आड दडत असल्यानें डोक्यावरील टोपीप्रमाणें दर्शनींच परिणाम करण्यास तें असमर्थ असतें. वरच्या गोष्टींतच पाहा ना ! डोक्यावरील मुसलमानी टोपी पोलिसाला चटकन् दिसली, पण जानवें बऱ्याच गडबडीनंतर पोलिसच्या हातीं आलें ! मला वाटतें, गळ्यांतील एकसर किंवा मोहनमाळ पोलक्यावरून बाहेर दिसेल अशी रुळत ठेवण्याच्या बायकांच्या पद्धतीप्रमाणें पुरुषाला देखील गळ्यांतील जानवें खमिसावरून बाहेर काढण्याची परवानगी असावी. म्हणजे हैदराबादकरमजकुरांसारखा प्रसंग ओढावण्याची भीति कांहीं अंशीं

कमी होईल. डोक्यावर धर्माची टोपी मिरविणाऱ्या मुसलमानी पद्धतीस तोड म्हणून हिंदूंनीं मफलरसारखें जानवें दर्शनीं गळ्याभोंवतीं गुंडाळण्याची वहिवाट पाडावी पाहिजे तर !

डोक्यावरच्या टोपीवरून माणसाचा धर्म व देश हें सकृद्दर्शनींच ओळखूं येण्याची सोय झालेली आहे. मुसलमानी फेज कॅप, साहेबी हॅट, पारशी टोप, ब्राह्मणी पगडी, शीखांचा साफा, मराठ्यांचा फेटा, काठेवाडी पोगोटें, भाटियांचा कोका वगैरे अनेक प्रकारचीं शिरस्त्राणें हिंदुस्थानांत आज प्रचलित आहेत. एकट्या हिंदु धर्मांत जितक्या जाति आहेत तितक्या विविध प्रकारचीं शिरस्त्राणेंही उपलब्ध आहेत. या दृष्टीनें इतर कोणत्याही धर्मापेक्षां हिंदु धर्म हा वैचित्र्य व विविधता यांचा भोक्ता आहे असें म्हणावें लागतें. एक तेढेदार पागोटेंच पाहिलें तर काठेवाडी आणि ब्रावण-कोरी पागोट्यांचे तेढे एकमेकांशीं तेढ्यानेंच वागतांना दिसतात ! मराठ्यांच्या फेट्याचें वळण रजपुतांच्या शिरस्त्राणाबरोबर सहमत असत नाहीं. हिंदुस्थानांत शिरस्त्राणांची इतकी विविधता आहे कीं, एखादी अखिल भारतीय शिरस्त्राण-परिषद् भरविण्याचें कोणी मनांत आणल्यास एका प्रेक्षणीय म्यूझियमची देशाला देणगी दिल्याचें पुण्य त्याच्या पदरीं पडेल.

टोपीचा जन्म केव्हां झाला तें मला माहीत नाहीं. पुराणकाळीं शिरस्त्राणें होतीं तीं शोभेपेक्षां युद्धांत डोक्याचें संरक्षण करण्याच्या हेतूनेंच प्रायः वापरीत. मानव प्रथम 'बोडका'च होता. मध्यंतरीं कांहीं ऐतिहासिक वा सामाजिक किंवा हवामानाच्या फेरफारानें मनुष्यानें डोक्यावर संरक्षक वस्तु ठेवण्यास प्रारंभ केला आणि सौंदर्यदृष्टीच्या विकासाबरोबरच शिरस्त्राणांतही सुधारणा होत गेली असेल हें तर्कानें ताडतां येतें. आतां फिरून 'Back to Nature' ही आरोळी जोरानें ऐकूं येत असल्यामुळें पुष्कळांचीं डोकीं 'उघडीं' पडूं लागलीं आहेत. बंगाली लोकांनीं स्वातंत्र्य मिळेपर्यंत टोपीवर बहिष्कार घातला आहे. मद्रासी लोकांनाही शिरस्त्राणाचें सामान्यतः वावडेंच

दिसतें. रशियन अक्कल डोक्यांत शिरल्यापासून आमच्या 'भाई' लोकांना टोपीचें ओझें सहन होईनासें झालें आहे.

नाकासमोर चाललें असतां मनुष्य जेथून निघाला तेथेंच परत येऊन पोंचतो हें पृथ्वीच्या वाटोळेपणाचें एक लक्षण माणसाच्या शिरस्त्राणालाही लागू पडतें. जटासंभार वाहणारा पूर्वींचा मानवप्राणी अनेक शिरस्त्राणांची वाटचाल करीत आज फिरून पूर्वस्थितीला येऊन पोंचला आहे ! फरक इतकाच कीं, पूर्वींचे मानव आपल्या केसांची निगा राखण्याकडे लक्ष पुरवीत नसत. आजचा तरुण त्या एकाच कार्यावर आपलें सारें लक्ष केंद्रित करतांना आढळतो. आजचा तरुण 'टोपी'वर बहिष्कार घालीत आहे तर आधुनिक तरुणी एका निराळ्या 'टोपी'चा वाढत्या प्रमाणावर आश्रय करतांना दिसत आहे, हा कालमहिमा होय !

निरनिराळ्या प्रकारच्या टोप्यांचें व शिरस्त्राणांचें एखादें प्रदर्शन भरविण्यांत आलें, तर करमणुकीचें तें एक मोठेंच साधन होईल असें मला वाटतें. दरवर्षी चित्रांचें, हस्तकौशल्याचें, फुलांचें, फार काय, पण कुत्र्या-मांजरांचीं देखील प्रदर्शनें भरतात; मग मानवी टोपीनेंच काय पाप केलें आहे ? तसें प्रदर्शन भरलेंच, तर गांधी-टोपीसारख्या हलक्या वस्तूचेंही ओझें सहन न होण्याइतकीं नाजुक डोकीं बनलेल्या आजच्या नवजवान विद्यार्थ्यांना कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर डेक्कन कॉलेजमध्यें शिकत असतांना जें प्रचंड चक्री पागोटें वापरीत, तें पाहून स्वतःविषयीं काय वाटेल याची कल्पनाच करणें बरें ! गतवर्षी पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाला मीं 'भेट' दिली, तेव्हां तेथील कांहीं ऐतिहासिक व्यक्तींचीं साखळीचीं वजनदार शिरस्त्राणें पाहून मला त्या पुरुषांच्या रणावेशाचा अंदाज करतां आला. डोक्यावर असें वजनदार दडपण असल्यावर मारूं किंवा मरूं या वृत्तीनें कोण नाहीं लढणार ?

मी स्वतः इंग्रजी चवथी-पांचवींत असतांना जरीचा पांढऱ्या चौकडीचा काळा रुमाल बांधून शाळेंत जात असें तेव्हांची एक गंमत मला आठवते.

गांधी-टोपीचें युग तेव्हां सुरू झालें होतें व सबंध शाळेंत मीच काय तो एकटा रुमाल बांधून जात असे. शाळेंतील मास्तरही बहुतेक टोपीच घालीत ( मुलांना नव्हे ! ). अशा परिस्थितींत रुमालविभूषित अस्मादिकांच्या दर्शनार्थ शाळेंत इतर विद्यार्थ्यांत जी झिम्मड माजे ती अजून मला हसं आणते. आतां रुमाल बांधणारा शाळकर विद्यार्थी औषधाला देखील मिळणार नाहीं. कोठें तो विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या वेळचा चक्री पागोटेवाला विद्यार्थी, आणि कोठें आजचा बोडका विद्यार्थी ? हाय-हाय ! शिरस्त्राणाच्या बाबतींत देखील आम्हां 'आर्यां'ची संस्कृति सुधारणेच्या कल्पनेला बळी पडली आहे.

याच्या उलट मुसलमानांनीं आपली फेज कॅप कायम ठेवली आहे. कायदे अझम जिनांनींदेखील कधीं नव्हे ती आपली ताठर मान हल्लींच फेज कॅपपुढें वाकविली नाहीं काय ? मुसलमानांचा मोठ्यांत मोठा पुढारी आणि यःकश्चित् मवाली गुंड या दोघांचेंही डोकें एकाच फेज कॅपनें अलंकृत केलेलें दिसून येतें. मुसलमानांत जी एकी व बंधुभावना नांदते, तिचें बरेंचसें श्रेय या धर्माच्या टोपीला दिलें पाहिजे.

म्हणून मी म्हणतों कीं, आमच्या संस्कृतीच्या संरक्षणासाठीं, देशाच्या उद्धारासाठीं, टोपीची चळवळ जोरानें चालू केली पाहिजे.

> " हिंदुस्थानाला आग लागली
> जनहो, टोपि ( फ्रेंच नव्हे ! ) वापरा !"

असल्या पदांच्या प्रभात-फेऱ्या काढून देशसेविकांच्या पलटणी लोकांना 'टोप्या' घालण्यासाठीं बाहेर पडल्यावांचून तरुणपिढीचा तरणोपाय नाहीं. तरुणांनीं टोप्यांच्या बहिष्काराची पद्धत अशीच कायम ठेवली, तर पुणेरी पगडीला वारस उरणार नाहीं अशी मला भीति वाटते. आणि पगडी अशी स्मृतिशेष व्हावी ही महाराष्ट्राला काळिमा आणणारी गोष्ट नाहीं काय ?

वरच्या बातमींतील हैदराबादकरांनीं मुसलमानी टोपीऐवजीं पुणेरी पगडी शिरावर धारण केली असती, तर त्यांच्यावर हा भलताच प्रसंग ओढवला नसता खास ! सुरक्षितपणाच्या दृष्टीनें पुणेरी पगडीसारखें दुसरें उपयुक्त शिरस्त्राण नाहीं असें मला वाटतें. ज्याला फायद्याचें राजकारण करावयाचें असेल किंवा राजकारणाचा फायदा करून घ्यायचा असेल, त्यानें पुणेरी पगडीला आपलें शिर अर्पण करावें; हटकून गुण ! पुणेरी पगडी डोक्यावर असेल, तर एकाच वेळीं परस्परविरोधी अशा चळवळींचें पुढारीपण आत्मविश्वासपूर्वक स्वीकारतां येतें. पुणेरी पगडी डोक्यावर चढविली कीं, हव्या त्या सभेचें अध्यक्षपद, तिच्या रुबाबाला भुलून, आपल्या पायांशीं लोळण घेत येतें. माणसाला खानदानीपणाची ऐट आणण्याच्या कामीं पुणेरी पगडीचें बहुमोल साहाय्य होतें, आणि विद्वत्तेचें उसनें सोंग पुणेरी पगडीमुळें आणतां येतें.

शिरस्त्राण वापरणें आणखीही एका दृष्टीनें फायदेशीर आहे. स्मशानवासी शंकरानें एखाद्या भाईप्रमाणें बोडकेपणाचा स्वीकार केला नसता, तर त्याच्या डोक्यावर गंगाबाई चढून बसली नसती. शंकराच्या डोक्यावर शिरस्त्राण असतें तर गंगाबाईचा थंडगार मारा सहन करण्याचा त्याच्या डोक्याला त्रास पडता ना ! लग्नाला चटावलेल्या बोडक्या भाईंनीं शंकराच्या या उदाहरणापासून वेळींच बोध घ्यावा असा गंभीर इशारा त्यांना देणें मला अवश्य वाटतें. स्त्रियांच्या डोक्यावरील पदर आणि पुरुषांच्या डोक्यावरील पगडी ढळली कीं, भारदस्तपणाला ओहोटी लागलीच म्हणून समजावें. हल्लींचे आपले पुढारी, आपल्या चळवळी, आपलें वाङ्मय सारें कांहीं छचोर व पोरकट आहे असें पुष्कळ लोक म्हणतात. या परिस्थितीचें कारण माझ्या मतें आम्हीं केलेला पगडीचा त्याग हेंच होय ! डोक्यावर चक्री पागोटें बसविण्याची सवय नाहींशी झाल्याबरोबर कोणतेंही लहानमोठें कार्य शिरावर घेण्याची तरुण पिढीची कुवतही नाहींशी झाली.

---

# प्रसिद्धीसाठीं धडपड !

श्रीयुत सुभाषचंद्र बोस यांनीं अलीकडे काढलेल्या एका पत्रकांतील एक वाक्य वाचून मला प्रथम कांहींसा विस्मय वाटला; आणि नंतर मोठ्या समजल्या जाणाऱ्या माणसांच्या छोटेपणाचा विचार मनांत येऊन माझा मीच मनाशीं हसलों. सुभाषबाबूंनीं गेल्या महिन्यांत एका उभयान्वयी मित्राच्या घरीं भोजनाच्या निमित्तानें बंगालचे मुख्य प्रधान श्री. फझलुल हक् यांची पडद्याआड गाठ घेऊन उभयतांच्या सहकार्यानें नवें मंत्रिमंडळ बनविण्याबाबत गुप्त बातचीत केल्याची बातमी कलकत्त्याच्या एका इंग्रजी दैनिकानें फोडली. त्या गौप्यस्फोटासंबंधीं एका जाहीर सभेंत सुभाषबाबूंनीं कांहीं तरी गुळचट निषेधाचे उद्गार काढले तेही कलकत्त्याच्या बहुतेक वृत्तपत्रांतून दुसऱ्या दिवशीं छापून आले. मीं स्वतः सुभाषबाबूंच्या कारस्थानाचा झालेला रहस्यस्फोट ज्या वर्तमानपत्रांत वाचला, त्यांतच बाबूजींचे ते निषेधाचे 'नरो वा कुंजरो वा' थाटाचे उद्गार वाचले होते. इतकेंच काय, पण बाबूजींच्या त्या बोटचेप्या खुलाशावर त्याच दैनिकानें खणखणीत अग्रलेख लिहून दिलेलें उत्तरंही मीं वाचलें असल्यामुळें या प्रकारानंतर आठ दिवसांनीं रिपव्हॅन विंकलप्रमाणें जागें होऊन काढलेल्या एका पत्रकांत "माझ्या भाषणाला मिळावी तितकी प्रसिद्धीच मिळाली नाहीं" अशी तक्रार सुभाषबाबूंनीं केलेली पाहून मला प्रथम विस्मय वाटला; परंतु थोड्या विचारांतीं मनुष्यस्वभावाची एक गोम लक्षांत येऊन मनांतल्या मनांत मी हसलों.

'तसाच विचार केला, तर थोर पुढाऱ्यापासून सामान्य अनुयायापर्यंत सर्वांची, सर्वत्र आणि सर्वकाळ हीच एक तक्रार असते कीं—

" मला आणि माझ्या उक्ति-कृतींना मिळावी तितकी प्रसिद्धि मिळत नाहीं."

प्रत्येक व्यक्तीला वाटत असतें कीं, प्रसिद्धि मिळण्याच्या बाबतींत सारें जग भाग्यवान् आहे, फक्त आपणच काय ते 'हुतात्मा' आहोंत. आणि गंमत अशी कीं, जितकें जितकें एखाद्या व्यक्तीचें नांव लोकांच्या तोंडीं होत जातें, तितकी तितकी त्याची 'अनुल्लेखानें' आपल्याला मारण्यांत येत असल्या-बद्दलची तक्रार वाढतच जाते ! व्यसनी माणसाचें असें सांगतात कीं, उपभोगानें त्याची व्यसनाची तलफ अनावर होत जाते; तसेंच प्रसिद्धीच्या व्यसनाचेंही आहे. मानवी मनाच्या अतृप्ततेचें खरें प्रदर्शन कोठें पाहावयास मिळत असेल तर तें त्याच्या प्रसिद्धीच्या हावरेपणांत. जगांत ज्यांना उदंड कीर्ति मिळाली आहे असें आपण समजतों त्यांची, आपल्या योग्यतेप्रमाणें जग आपली बूज ठेवीत नसल्याची पिरपीर नेहमीं कानीं येत राहते. दारू पिऊन गटारांत लोळणारा इसमही हातांतील 'ब्रँडीची बाटली' सोडण्यास तयार नसतो, त्यांतलाच हा प्रकार !

प्रसिद्धीला दारूची उपमा छान शोभते. दोघींची चटक विलक्षण व अनावर, आणि दोघींच्या नादानें बेहोष झाल्यावर माणूस काय करायचें बाकी ठेवील हें सांगणें अशक्य आहे. दारूपायीं स्वतःच्या बायकोला घरा-बाहेर काढणारे लोक आहेत, तसे प्रसिद्धीसाठीं 'यशवंती' विवाह करून पहिल्या बायकोला देशोधडी लावणारे इसम समाजांत भेटतात. दारूच्या नशेंत पोटच्या मुलाच्या नरडीला नख लावणारे नरपशु आणि प्रसिद्धीपायीं पाठच्या अनुयायांना खड्ड्यांत लोटणारे पुढारी यांच्यांत अधिक निंदनीय कोण हा प्रश्नच आहे. दारूसाठीं घरदार गहाण टाकणारे आणि प्रसिद्धी-साठीं अक्कल-अब्रू वेशीवर टांगणारे सारख्याच निधड्या छातीचे असतात !

प्रसिद्धि ही देवता आहे कीं राक्षसीण आहे याचा निर्णय करून घेण्या-पूर्वींच बहुतेक लोक तिच्या आहारीं पुरते गेलेले असतात. प्रसिद्धि हा एक अकल्पनीय चक्रव्यूह असल्यानें एकदां त्यांत प्रवेश केलेली व्यक्ति त्या

ब्रह्मघोटाळ्यांतून सुखरूप बाहेर येण्याची आशा नसते. पण, त्याबरोबरच अभिमन्यूसारखें वीर-मरणही या चक्रव्यूहांत सापडलेल्या लोकांपैकीं फार थोड्यांच्या ललाटीं लिहिलेलें असतें ! प्रसिद्धि, अधिक प्रसिद्धि, आणखी प्रसिद्धि असा आक्रोश करीतच बहुतेक प्रसिद्धिप्रिय लोक तळमळत विस्मृतीच्या गर्तेत लपले जातात !

प्रसिद्धीच्या मार्गांतील पुढल्यांना खाव्या लागलेल्या असल्या ठेचा पाहून मागच्यांपैकीं शहाणा होणारा अगदीं विरळा! प्रसिद्धिप्रियता हा मला वाटतें, प्रत्येक माणसाच्या रक्तांत भिनलेला गुण आहे. कांहीं वल्ली तर अशा असतात कीं, एक वेळ त्यांच्या नांवानें तुम्हीं गालिप्रदान केलेंत तरी तें त्यांना पत्करेल; पण त्यांना अनुल्लेखानें मारलेंत, तर तें त्यांना असह्य होईल.

प्रसिद्धि हें अलीकडे एक स्वतंत्र शास्त्र बनलें आहे व त्याचें तंत्रही पण वेगळें झालें आहे. पूर्वीच्या काळीं प्रसिद्धि मिळविण्याच्या आजच्यासारख्या सोई सुलभ नव्हत्या तेव्हां, अंगीं तसेंच कर्तृत्व किंवा चांगला पराक्रम असल्यावांचून कोणास प्रसिद्धि मिळणें सोपें नव्हतें. परंतु आजकाल तो जमाना बदलला आहे. हल्लीं अंगच्या पराक्रमापेक्षां गाठच्या पुण्याईवरच माणसाला प्रसिद्धीचा किल्ला सर करतां येतो. कांहीं अगदीं कर्तृत्वहीन लोक आज प्रसिद्धीच्या पिंजऱ्यांत मोठ्या तोऱ्यानें बसलेले दिसतात त्याचें कारण हेंच. कांहींही कर्तृत्व न दाखवितां घरबसल्या प्रसिद्धि कशी मिळवावी हें एक पद्धतशीर तंत्र आहे आणि तें ज्याला अवगत झालें आहे तो प्रसिद्धीचा प्रवास घोडदौडीनें करूं शकतो.

प्रसिद्धितंत्राचा पहिला नियम म्हणजे बेछूट नंगेपणा हा होय. या बाबतींत जो उच्चांक गाठील तो प्रसिद्ध पुरुष होण्याला मुळींच विलंब लागणार नाहीं. कांहीं कांहीं लोक आज प्रसिद्धीच्या झगझगाटांत नांदतांना दिसतात ते याच बेछूट नंगेपणाच्या प्रभावामुळें होय.

आपल्या बोलण्यांत आणि वागण्यांत बेछूट बातारामी ऐट आणली कीं प्रसिद्धिसुंदरी वश झालीच म्हणून समजावें. लोकांच्या डोळ्यांत भरण्यासाठीं प्रथम त्यांच्या डोळ्यांत सलावें लागतें हा प्रसिद्धीचा महामंत्र हिंदुस्थानचे 'प्रसिद्ध व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन यांनीं आपले जांवई सर ऑस्वाल्ड मॉस्ले यांना दिला होता—

"To be in public eye be a nuisance!"

या महामंत्राचा उपयोग करून अनेक महापुरुषांनीं प्रसिद्धि मिळविली आहे. संस्कृतमध्येंही अशाच अर्थाचें एक 'प्रसिद्ध' सुभाषित आहे—

घटं भिन्द्यात्पटं छिन्द्यात्कुर्याद्रासभरोहणम्
येन केन प्रकारेण प्रसिद्धः पुरुषो भवेत् ॥

दारूच्या बाणाप्रमाणें भरभर अस्मान गाठणारी प्रसिद्धि हवी असेल तर लोकांना सतावून सोडण्यासारखा राजमार्ग नाहीं. लोकांना खूप तापवून त्यावर प्रसिद्धीची पोळी भाजून घेणें फायदेशीर असतें. वाणीचा किंवा वागणुकीचा बेछूट विक्षिप्तपणा प्रसिद्धि मिळवून देतो तसा परस्परप्रशंसामंडळाचा उंटगर्दभन्यायही थोडा लाभदायक होतो. माझ्या ओळखीची एक साहित्यिकांची दुकल आहे. जावा बेटांतील जुळ्या बहिणीप्रमाणें ही दुकल अभेद्य आहे असा आतांपर्यंतचा माझा तरी अनुभव आहे. जेव्हां जेव्हां माझी व त्यांची गाठ पडली आहे, तेव्हां तेव्हां ही सांधेजोडच माझ्या नजरेला पडली आहे; त्यांपैकीं एक कथालेखक व दुसरे कवि आहेत. त्यांच्याशीं बोलण्याचा प्रसंग आला, कीं त्यांपैकीं कथालेखक-महाशय कवीच्या कवितांची तोंड फाटेपर्यंत स्तुति करतात व कविमजकूर लेखकाच्या गोष्टींची घसा फुटेपर्यंत प्रशंसा करतात!

मराठी वाङ्मयांत अशीं परस्परप्रशंसामंडळें फार बोकाळलीं आहेत. या मंडळांतील सदस्यांचीं जाहीर मतें एक व खाजगी मतें निराळींच असल्याचा अनुभव येतो! उंटगर्दभन्यायाचा फायदा कांहीं काळ होतो खरा; परंतु

त्याचे नंतरचे दुष्परिणाम फार वाईट होतात. उत्तम मित्र हाच सर्वांत भयंकर शत्रु बनतो या इंग्रजी म्हणीचा अनुभव परस्परप्रशंसामंडळांच्या बहुतेक सभासदांच्या भोगवट्यास येतो. महाराष्ट्रांतील बहुतेक परस्परप्रशंसामंडळांच्या उपसंहाराचें प्रकरण करुणपर्यवसायीच झालें नाहीं काय ?

त्यापेक्षां बर्नार्ड शॉनीं प्रसिद्धि मिळविण्यासाठीं प्रारंभीं उपयोजिलेली युक्ति अधिक सुरक्षितपणाची आहे. शॉनीं स्वतःच टोपणनांवानें स्वतःच्या वाङ्मयावर प्रखर टीका लिहून आपल्या वाङ्मयाकडे जनतेचें लक्ष वेधविलें म्हणतात ! आमच्या कित्येक साहित्यिकांनीं स्वतःच्या वाङ्मयकृतीचीं प्रशंसेनें खचून भरलेलीं परीक्षणें स्वतःच लिहून वशिलेबाजीच्या जोरावर छापवून आणलेलीं मला माहीत आहेत. परंतु अतिरिक्त पुष्पवर्षावापेक्षां अतिरिक्त गारांच्या वर्षावानेंच लोकांचें लक्ष जास्त वेधलें जातें हा मानसशास्त्रीय नियम बर्नार्ड शॉप्रमाणें त्यांच्या लक्षांत न आल्यामुळें आत्मप्रशंसेचे हौद पसरूनही त्यांपैकीं कित्येकांना प्रसिद्धीचा थेंब मिळवितां आला नाहीं !

सिनेमाचें युग सुरू झाल्यापासून प्रसिद्धीच्या जगांत भयंकर उलथापालथ झाली आहे. बोलपटांत कांहीं अर्थ नसला तरी चालेल, पण त्याची प्रसिद्धि मात्र अनर्थकारक प्रमाणावर झाली पाहिजे अशीच बहुतेक सिनेमावाल्यांची समजूत दिसते. त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, भाषेमध्यें शब्दांच्या उपयोगाला कांहीं अर्थच उरलेला नाहीं ! भडक जाहिराती आणि भंपक बोलपट यांची सांगडच बहुधा तुमच्या आमच्या पदरांत पडते. 'तुफान गर्दी', 'धिक्कार हाउस', 'बेहद्द बोलपट', 'कर्णमधुर संगीत', 'सनसनाटी कथानक', 'कमालीचा अभिनय' असल्या शब्दांना सिनेमाच्या जाहिरातींत काडीचाही अर्थ उरलेला नाहीं. प्रत्येक बोलपट मागल्या सर्व बोलपटांपेक्षां बेफाम चांगला निघतो आणि थिएटरमधील जागांची संख्या मर्यादित असतांही प्रत्येक बोलपट 'रेकॉर्ड ब्रेकिंग' ठरतो ही केवळ प्रसिद्धीची पोपटपंची आहे. सिनेमाच्या जाहिराती म्हणजे खोट्या मोत्यांच्या

दागिन्यांची विशुद्दीपांच्या झगझगाटांतील बेगडी श्रीमंती होय अशी माझी अनुभवानें खात्री झालेली आहे.

कोणत्याही गोष्टीला त्वरित व परिणामकारक प्रसिद्धि देण्यांत बायकांचा हात—किंवा तोंड कोणीच धरूं शकणार नाहीं. गडकऱ्यांनीं म्हटलेंच आहे ना, कीं 'अगदीं रहस्यांतील रहस्य देखील बायकांच्या पोटांत ठराविक मुदतीपलीकडे राहूं शकत नाहीं !'

परवांच मीं एक चुटका वाचला:—

ऑफिसर— बातमी शीघ्र प्रसृत करण्याचें उत्तम साधन कोणतें ?

एक उमेदवार—टेलिफोन.

दुसरा उमेदवार—तार पाठविणें.

तिसरा उमेदवार—ती बातमी एखाद्या स्त्रीला सांगणें.

या चुटक्यांतील खोंच विशद करून सांगण्याचें कारण नाहीं. आपल्या नवऱ्याच्या अवगुणांची चारचौघांत प्रसिद्धि करण्याचें नाजुक कौशल्य बायकांना किती साधलेलें असतें याचा अनुभव बहुधा प्रत्येक विवाहित पुरुषाला असतोच !

'नहि कस्तुरिकामोदः शपथेन प्रकाश्यते' हें जुनें सुभाषित 'जुनें जाउं द्या मरणालागुनि' या केशवसुतांच्या वचनाप्रमाणें आज अक्षरशः मरण पावलें आहे. आजच्या प्रसिद्धीच्या काळांत बोलेल त्याचीं तोंडलीं विकलीं जातील, पण न बोलणाराचीं वांगींही खपणार नाहींत. म्हणून कांहीं बाताराम बेछूट थापा मारीत असतात. तेवढेंच वर्तमानपत्रांत नांव छापून येण्याचें काम होतें. प्रसिद्धीसाठीं अशी निर्लज्ज धडपड चालू ठेवीत असतांच तिकडे आपल्याला 'अनुल्लेखानं मारल्या'बद्दल 'रासभस्वर' काढीत राहायचा हा दुतोंडेपणा मात्र और म्हणायचा ! प्रसिद्धीसाठीं अहोरात्र प्राण टाकीत

असतांना स्वतः प्रसिद्धीच्या बाबतींतील हुतात्मा असल्याबद्दल केविलवाण्या किंकाळ्या मारणें हें बहुतेक प्रसिद्धिप्रिय पुरुषांचें प्रमुख लक्षणच असावें असें मला वाटतें. आणि या लेखाच्या सुरुवातीस दिलेल्या सुभाषबाबूंच्या उदाहरणांत तरी दुसरें काय दिसतें? समुद्रांत राहूनही आपण कोरडेच आहोंत असें जगाला भासविण्याचा हा प्रसिद्ध पुरुषांचा स्वभाव पाहून मनांत प्रसिद्धीविषयीं एक प्रकारचा उबग येतो, नाहीं का?

---

# खोटीं नाणीं

नवे नवे शास्त्रीय शोध लागले कीं त्यांचे नवे नवे उपयोगही माणसाला सुचूं लागतात. वास्तविक क्ष-किरणांचा शोध लागला तो डॉक्टरींच्या उपयोगासाठीं ! परंतु त्याचा उपयोग डॉक्टर लोकांप्रमाणेंच पोलिसांना होत असल्याच्या बातम्या केव्हां केव्हां ऐकूं येतात. नुकतीच तसली एक बातमी मीं वर्तमानपत्रांत वाचली—

कलकत्ता,

अलीपूर येथील एका बंगाली पोलिस सी. आय. डी. ऑफिसरनें ॲसोशिएटेड प्रेसला दिलेल्या मुलाखतीवरून खोट्या नाण्यांचा शोध लावण्याच्या कामीं क्ष-किरणांचा पोलिसांना कसा उपयोग झाला याची मनोरंजक हकीकत बाहेर आली आहे. मिळालेल्या माहितीवरून, सी. आय. डी. ऑफिसरांनीं दक्षिण कलकत्त्यांतील एका घराची झडती घेतली. झडती चालू असतां घरांतील एका इसमानें आपल्याजवळील कांहीं तरी वस्तु गिळून टाकल्याचें नजरेस आलें.

त्या माणसानें काय पदार्थ गिळला तें शोधून काढण्यासाठीं पोलिसांनीं त्याला मेडिकल कॉलेज हॉस्पिटलमध्यें नेलें व तेथें त्याची क्ष-किरणांनीं तपासणी केल्यानंतर त्याच्या पोटांत तेवीस खोट्या आणेल्या असल्याचें आढळून आलें !

माणसाच्या पोटांत दडलेल्या रोगाप्रमाणेंच त्याच्या कायदेशीर गुन्ह्यांचाही रहस्यस्फोट करण्यास क्ष-किरणांचा होत असलेला हा उपयोग, तो शोध लावणाऱ्या रॉन्टजेन या शास्त्रज्ञाला अभिप्रेत असेलच असें म्हणवत नाहीं. परंतु अमेरिकेंत गॅंग्स्टर लोकांच्या पाशवी अत्याचारांना ऊत आल्यापासून

गुन्हे शोधून काढण्याच्या कामीं आतांशा शास्त्रीय शोधांचाच अधिकाधिक उपयोग करून घेतला जात आहे. खोटीं नाणीं पाडणें जसें जातां दक्ष पोलिसांच्या नजरेंतून निसटणें कठीण, तद्वत् तसलीं नाणीं उदरांत लपवूनही निभाव लागणें अशक्य.

माझ्या टेबलावर सकाळच्या चहाबरोबर येऊन पडणाऱ्या दैनिक पत्रांत मधून मधून बनावट नाणीं पाडण्याच्या आरोपावरून कोठें ना कोठें, कोणाला ना कोणाला तरी पोलिसांनीं पकडल्याच्या बातम्या प्रसिद्ध होत असतात. बनावट नाणीं कशीं करतात याची मला माहिती नसलीं तरी, तीं कां करण्यांत येतात याची मात्र मला कल्पना आहे. 'लोभ हा पापाचा परमेश्वर आहे' हें पुण्यप्रभावांतील वाक्य 'पाप हें धृतराष्ट्राप्रमाणें आंधळें आहे' या भावबंधनमधील वाक्याशीं जोडलें कीं, खोटीं नाणीं पाडणाऱ्यांच्या हेतूचा उलगडा होण्यास अडचण पडत नाहीं. कोणाचें लग्न जमत असेल तर, किंवा कोणाचा प्राण वांचत असेल तर, बेधडक खोटें बोलावें असें धर्मशास्त्र सांगतें. त्याच शास्त्राचा सोइस्कर विपर्यास करून स्वतःचा प्राण वांचवून संसार सलामत ठेवण्यासाठीं बनावट खोटीं नाणीं पाडण्याला काय हरकत आहे, अशीच बनावट नाणेवाल्यांची विचारसरणी असेल कदाचित्, कोणी सांगावें !

परंतु एखाद्या कृत्याच्या पाठचा हेतु उमजला म्हणून तें कृत्य समर्थनीय ठरेलच असें नाहीं. खोटीं नाणीं पाडणारांच्या अज्ञानाची कींव आली तरी त्यांच्या पापाबद्दल क्षमा करावीशी वाटत नाहीं. कारण दोनचार बदमाष लोक स्वतःच्या स्वार्थासाठीं कोठें तरी अज्ञात ठिकाणीं अंधारांत खोटीं नाणीं पाडतात; पण त्यामुळें तुमच्या-माझ्यासारख्या सभ्य समजल्या जाणाऱ्या गृहस्थांवर मात्र भर मंडळींत दात पडण्याचा फजितीचा प्रसंग ओढवतो. आपण एखादा जिन्नस विकत घ्यावा व त्याची किंमत म्हणून खिशांतून मारे ऐटींत एक नाणें काढून दुकानदाराच्या अंगावर फेकून

चालायला लागावें; तोंच तो दुकानदार हेटाळणीनें संबोधतो—"अहो, अहो, मिस्टर, हें नाणं खोटं आहे; चालत नाहीं, बदलून द्या पाहूं!" दुकानदाराचे हे शब्द ऐकून आपण सर्दच होतों व शेजारची प्रतिष्ठित मंडळी मिस्किलपणें हसून आपली फजिती 'एन्जॉय' करतात, तेव्हां तर आपण कोंडलेल्या मांजराप्रमाणें चिडतों व चरफडतों!

तुमच्यापैकीं पुष्कळांना हा अनुभव आला असेल. तुमच्यामाझ्या-सारख्या सामान्य माणसांना खरें नाणें व खोटें नाणें यांतील फरक दर्शनींच कळून येत नाहीं. समाजांत दुष्ट व सुष्ट व्यक्ति जशा केवळ पाहून ओळखणें कठीण, तद्वत् खऱ्या-खोट्या नाण्यांतील फरक सामान्य दृष्टीला चटकन् आकलन होण्यासारखा नसतो.; त्यामुळें आपल्याला न कळत कोठून तरी एखादें खोटें नाणें पटकन् आपल्या खिशांत केव्हां तरी घर करून बसतें आणि वरच्यासारखा एखादा फजितीचा प्रसंग आपल्या-वर ओढवून आणते.

नुकताच मी एका प्रतिष्ठित थिएटरांत इंग्रजी सिनेमा पाहावयास गेलों होतों. एक रुपया काउंटरवर देऊन तिकीट व मोड खिशांत घालून सरळ आंत जाऊन मी लठ्ठ लठ्ठ गादीच्या खुर्चीत देह लोटून दिला. सिनेमा संपून परत येतांना बसमध्यें दिलेली चवली कंडक्टरनें खोटी असल्याचें सांगून परत केली, तेव्हां रुपयाची मोड नीट पाहून न घेतल्याचें प्रायश्चित्त मला मिळालें हें मीं ओळखलें. परंतु एवढ्या अप-टु-डेट थिएटरांत खोटें नाणें मिळेल अशी कल्पना मला असण्याचें कारण नसल्यानें माझ्या हातून ही गलती झाली.

ती खोटी चवली मीं नंतर अनेक ठिकाणीं चालवून पाहण्याचा 'प्रामा-णिक' प्रयत्न करून पाहिला; परंतु जिंदगी बोलपटांतील रतनलालप्रमाणेंच मलाही अनुभव आला कीं, ती 'बडी वफादार, सती सावित्री' आहे. माझ्या खिशाची ऊब सोडून जाण्यास तिची अद्याप तयारी नसल्यानें तिला

'उजविण्या'चे माझे सारे प्रयत्न आजतागायत तरी फुकट गेले आहेत. कुरूप मुली उजवितांना त्यांच्या बापांना काय यातना होत असतील याची मात्र कल्पना, मला ती खोटी चवली उजविण्याच्या प्रयत्नांत आली. या अनुभवानेंच माझ्या डोक्यांत एक नावीन्यपूर्ण कल्पना आली हें खरें. अलीकडे थोर पुरुषांच्या स्वाक्षरी गोळा करण्याचा किंवा वापरलेलीं पोस्टाचीं तिकिटें जमविण्याचा छंद पुष्कळांना असतो, तें एक फॅशनेबल व्यसनच झालें आहे आजकाल! तसा खोटीं नाणीं जमविण्याचा छंद माणसांना असता, तर किती बरें झालें असतें असें मला तेव्हांपासून वाटत आहे. म्हणजे अशा एखाद्या नादी वेडप्याकडे मी माझ्याकडील खोटीं नाणीं खपवून मोकळा झालों असतों! (माझ्या वाचकांपैकीं कोणाला तसा नाद असल्यास मजकडील खोटी दुणेली मी त्याला सहा पैशाला देऊन त्याच्या हौसेखातर दोन पैशांचें स्वतःचें नुकसान करून घेण्यासही तयार आहे!)

माझ्याप्रमाणेंच तुमचाही अनुभव असेल असें मी धरून चालतों. खोटीं नाणीं कोठून, कशीं आपल्या खिशांत येतात तें कळत नाहीं व लोकांनीं तीं परत करीपर्यंत त्यांचा खोटेपणा आपल्याला उमजत नाहीं आणि नंतर हा काय भुताटकीचा चमत्कार असावा याचा आपल्याला संभ्रम पडतो. खरें व कल्चर मोतीं यांतील फरक जसा सामान्य दृष्टीला आकलन होत नाहीं, तसाच प्रकार खरीं नाणीं व खोटीं नाणीं यांचा होतो. खऱ्या मोत्यांपेक्षां कल्चर मोतीं जास्त तजेलदार दिसतात, तद्वत् खऱ्या नाण्यांपेक्षां खोटीं नाणीं पुष्कळदां जास्त लखलखीत दिसतात. गर्भश्रीमंतांपेक्षां पोकळ श्रीमंतांचाच दिमाख अधिक असतो त्यांतलाच हा प्रकार! पण जग देखाव्यावर भुलणारें असल्यामुळें कल्चर मोत्यांचा सुळसुळाट झाला आहे आणि पोकळ श्रीमंतांप्रमाणेंच खोटीं नाणींही बाजारांत 'भाव' खात आहेत!

केवळ तात्त्विक दृष्ट्या पाहिलें तर खोटीं नाणीं पाडण्याचें तें कृत्य गुन्हेगारींत कां मोडावें हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. कायद्यानें प्रस्थापित झालेल्या सरकारशीं प्रतिस्पर्धी सरकार (Parallel Govern-

ment ) स्थापून भांडूं पाहणाऱ्या कॉंग्रेसच्या आत्यंतिक पुढाऱ्यांच्या ज्या कृतीचें लोक कौतुक करतात, त्या कॉंग्रेस-कल्पनेचें विडंबन करण्याचा प्रयत्न खोटीं नाणीं पाडणाऱ्या लोकांच्या मनांत नसेलच असें म्हणवत नाहीं. कोणी सरकारला तुल्यबल असें ‘ पॅरलल् गव्हर्नमेंट’ स्थापन करूं पाहतात तद्वत् कांहीं ‘छुपे’ देशभक्त सरकारी टांकसाळीशीं “पॅरलल् मिंट” म्हणून खोट्या नाण्यांचा कारखाना काढूं पाहतात. पॅरलल गव्हर्नमेंट जसें बनावट तशीं हीं नाणींही बनावटच ! पण पॅरलल् गव्हर्नमेंटवाल्या ‘ देश-भक्तां ’चे लोक गोडवे गातात आणि ‘पॅरलल् मिंट’वाल्या ‘दे. भ.’चे मात्र वाभाडे निघतात !

तसें पाहिलें तर सारें जग हाच मुळीं एक खोट्या नाण्यांचा प्रचंड कारखाना आहे. जगाच्या बाजारांत अस्सल खरीं नाणीं व कमअस्सल खोटीं नाणीं यांचें प्रमाण खरोखरीच रोज चरख्यावर सूत काढणारे कॉंग्रेस-वाले व केवळ शपथेवर भागविणारे देशभक्त यांच्यासारखेंच आहे. जगांत शिवाजी एखादाच निपजतो; पण दुसऱ्या बाजीरावाची अवलाद मात्र ढेकणाच्या विणीनें निपजत असते. खोटीं नाणीं हीं जगाच्या पांचवीला पुजलेलीं आहेत. फरक असेल तर त्यांच्यांत रुपें व हीण यांच्या प्रमाणा-बाबतच असतो.

लोकांच्या मनोवृत्तीचें मला केव्हां केव्हां हसूं येतें. त्यांना खोटीं नाणीं चालत नाहींत; परंतु खोटे पुढारी मात्र चालतात ! वेश्या, वकील आणि वैद्य या तीन ‘व’कारांना पोटासाठीं खोटें बोलावें लागतें असें जुनें सुभाषित मला कुठें तरी वाचल्याचें अंधुक आठवतें. सध्यांच्या ‘पुरोगामी’ काळांत मात्र खोटें बोलण्याचा, वेङ्कट थापा मारण्याचा अधिकार व्यापारी, देशभक्त व साक्षीदार यांच्या वाट्याला आलेला दिसतो.

लटके पुढारी, खोटे मित्र, खोटें वैभव, सारें कांहीं खोटें जगाला चालतें; पण खोटें नाणें मात्र चालत नाहीं हें नवल नव्हे काय ? आणि गंमत ही कीं,

ज्याला जग खरें नाणें समजतें व मोठी किंमत देतें, त्यांत रुप्याबरोबरच हीणही मिसळलेलें असतेंच. पैशाच्या ज्या कर्णमधुर आवाजानें बहिरेही जागे होतात, तो मधुर नाद नाण्यांत असलेल्या हीणाचाच प्रभाव असतो. खरें नाणें आपण खणखणीत वाजवून घेतों, त्या वेळीं आपल्या त्या कृतीचा खरा अर्थ त्या नाण्यांत योग्य प्रमाणांत हीण आहे कीं नाहीं हें अजमावून पाहणें असाच होतो हें कितीजणांच्या ध्यानीं येतें ? हीण पाहून नाण्याचा अस्सलपणा पारखण्याची आमची पद्धत कांहीं और म्हटली पाहिजे ! एखाद्या व्यक्तीच्या बदमाषगिरीचें माप करून तिला साधुत्वाचें शिफारसपत्र देण्यापैकींच हा प्रकार नव्हे काय ?

खरीं नाणीं पारखून घेण्याचीं जी दक्षता समाज बाळगतो ती पुढारी किंवा मान्यवन्त लोक पारखून घेतांना जर दाखविण्यांत आली, तर कित्येक लोकांच्या रूपावरील दिखाऊ बेगड दूर होऊन आंतील हिडिसपणाचें दर्शन आपणांस किळस आणण्यास कारण होईल याविषयीं मला शंका नाहीं. मला वाटतें, या आत्मवंचनेचें दुःख टाळण्यासाठींच नाणीं पारखून घेण्याची कसोटी मान्यवर शिष्टांची पारख करतांना लावण्याचें समाज जाणून बुजून टाळीत आला असावा. त्यामुळें सोनें कोणतें नि पितळ कोणतें याचें वर्गीकरण न होतांच सद्गुणी आणि सोंगाडे, कलावन्त व कोल्हाटी, असली मंडळी त्या त्या क्षेत्रांत गर्दीनें वावरतांना दिसतात !

नाणें खरें असो कीं खोटें असो, तें 'चलनी' असेपर्यंतच त्याला व्यवहारांत किंमत. दिखनेमें डब्बू और चलनेमें शिवराई या म्हणीचा अक्षरशः अर्थ घेतला, तर या विधानाला तो पोषकच होईल. माणसें कितीही चांगलीं व पराक्रमी असलीं, तरी कांहीं कालानें तीं कालवश होतात, तशीं नाणींही खरीं व खणखणीत वाजणारीं असलीं तरी, कालांतरानें तीं इतिहासांत जमा होतात. शिवाजीच्या वेळचीं खरीं नाणीं देखील आज कोणाकडे असलीं तरी पुराण-वस्तुसंग्रहालयापलीकडे त्यांना आतां कोण किंमत देणार ? फार

कशाला, कंपनी सरकारच्या वेळचीं नाणीं आज इंग्रज सरकारच्या राजवटींत चालणार नाहींत. नाण्यांचें महत्त्व त्यांच्या खरेपणावर व त्यांचा मान चलनीपणावर अवलंबून असतो. एकदां नाणें चलनांतून गेलें कीं तें कितीही चांगलें असो, व्यवहारांत त्याला नंतर कोणी विचारीत नाहीं.

मान्यवर लोकांची स्थितीही तशीच असते. त्यांचा चालता काळ आहे तोंवरच त्यांचा बडेजाव राखला जातो. पण एकदां का ते 'टाइमबार' झाले, कीं आठवणी व आख्यायिका यांच्यापलीकडे त्यांना फार थोडें आयुष्य उरतें. गणेशोत्सवांत दर वर्षी नव्या गणपतीचें पूजन चालतें, तसें समाजांत नेहमीं नवे लोक पूजिले जातात. राणीछापाचा रुपया कायदेशीर नाणें असतांही त्याचा स्वीकार करण्यास पुष्कळांची कां कूं दिसून येते याचें कारण लोकांची नवपूजक वृत्तीच. नाण्याप्रमाणेंच पुढाऱ्यांत किंवा मान्यवंत मंडळींत समाजाला नेहमीं नवें नवें हवेंसें वाटतें.

आणि खोट्या नाण्यांना फावतें तें समाजाच्या या वृत्तीमुळेंच. खोटीं नाणीं वरून दिसायला चकचकीत दिसतात, तसे नवे पुढारीही आवेशानें थबथबल्यासारखे भासतात. पण दोघांचाही तो दिखाऊपणा तकलुबी असतो. ज्यांचा चालता काळ संपला आहे असे कांहीं इसम आपलें महत्त्व जाणवून देण्याच्या महत्त्वाकांक्षेनें प्रेरित होऊन थारा मारूं लागतात; पण पेंढा भरलेल्या मृत श्वापदाप्रमाणें हा प्रकार दिसायला मोहक असला, तरी निर्जीव असतो. खोटीं नाणीं जवळ बाळगणारा जसा बाजारांत फजित पावतो, तद्वत् असल्या खोट्या पुढाऱ्यांच्या नादीं लागणारे व्यवहारांत बत्तिशी फोडून घेतात.

खोटीं नाणीं, खोटे पुढारी यांच्याप्रमाणेंच आपल्याला दगा देणाऱ्या आणखी दोन बाबी म्हणजे खोटी बुद्धि व खोटी आशा—माणसाला खोटी

बुद्धि झाली कीं, त्याच्या पायाखालीं दुर्दैवाचा खड्डा खणला गेलाच म्हणून समजावें. संशयकल्लोळांतील फाल्गुनरावाप्रमाणें

" खोटी बुद्धि कैंवि झाली ? "

असा पश्चात्ताप करण्याची पाळी पुष्कळांवर येते. खोट्या बुद्धीप्रमाणेंच खोटी आशाही घातकीच. खोट्या आशेनेंच माणसें आंकडे लावतात, शर्यतें खेळतात; पण त्याचा परिणाम खोटें नाणें पदरांत पडण्यांत होतो. 'जिंदगी' बोलपटांतील रतनलालप्रमाणें जो खोट्या नाण्याला

" ये है मेरी जीवन आशा
यही है मेरी सारी पूंजी, यही है सब धन माया
आँख की ठंडक मनकी डाढस अन्नदाता ये है "

असें मानील त्याची निराशा होण्याला कठोर व्यवहारांत वेळ लागणार नाहीं. ज्याचा दाम खोटा, त्याच्या कपाळीं गोटा हें ठरलेलें.

# ओझें आणि हमाली

विक्षिप्तपणाच्या गोष्टी करण्याबद्दल पं. जवाहरलाल नेहरू फार प्रसिद्ध आहेत. आततायीपणा व आकस्ताळेपणा पंडितजींच्या कृत्यांत पुष्कळ वेळां दिसून येतो. या त्यांच्या स्वभावाचें कारण त्यांच्या मनोवृत्तींचा तत्त्वनिष्ठ आग्रहीपणा हें असावें अशी माझी समजूत आहे. ज्या गोष्टी तुम्हीं किंवा मीं केल्या तर लोक आपणांला वेड्यांत काढून हसतील, त्याच गोष्टी पं. नेहरूंसारख्या मोठ्या समजल्या जाणाऱ्या व्यक्तीनें केल्या तर समाजांत त्याचें कोण कौतुक होतें! आणि जर करतां त्या खुळ्या चाळ्याच्या मुळाशीं एखादें तत्त्व छपून बसलेलें असेल तर मग विचारायलाच नको ! !

पंधरा दिवसांपूर्वीं ॲसोशिएटेड प्रेसमार्फत एक बातमी सर्व वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करण्यांत आली व कॉंग्रेस वृत्तपत्रांनीं तिला विशेष प्रामुख्य देऊन छापल्यामुळें माझें तिच्याकडे लक्ष वेधलें गेलें, ती बातमी अशी—

'नेहरू स्वतःची हमाली करतात'

"जून १४—अलाहाबाद येथील रेल्वे-स्टेशनवरील हमालांनीं, कॉंट्रॅक्टरशीं देण्याघेण्याच्या बाबतींत मतभेद झाल्यामुळें, पुकारलेला संप आज महिनाभर चालू आहे. काल रात्रीं संपवाल्यांच्या कार्याला पं. जवाहरलाल नेहरूंनीं 'सक्रिय' पाठिंबा दिला. लाहोर येथून पं. नेहरू अलाहाबाद स्टेशनवर येऊन दाखल झाले; तेव्हां त्यांच्या सामानाचें ओझें उचलण्यासाठीं कॉंट्रॅक्टरनें बाहेरून आणलेल्या भाडोत्री संपफोड्यांपैकीं, दोन-तीन हमाल धावले. परंतु पंडितजींनीं त्यांना आपल्या

सामानाला हात लावूं दिला नाहीं व स्वतःचें सामान प्लॅटफॉर्मवरून स्टेशनबाहेरील आपल्या मोटारीपर्यंत स्वतःच्या पाठीवरून वाहून नेलें.

स्वतःचें सामान स्वतःच्या पाठीवरून वाहून नेणारे शेंकडों प्रवासी प्रत्येक रेल्वे-स्टेशनवर हमेष भेटतात. रेल्वेवरील हमालांनीं संप केलेला असो किंवा नसो, आपल्या खिशांतील पैशांचा 'संप' नेहमींच चालू असल्यानें स्वतःच्या ओझ्यांची हमाली आपल्या नशिबीची क्वचित् चुकते. पण 'सदा मरे त्याला कोण रडे' या न्यायानें आपल्या हमालीची 'बातमी' कोणतीही वार्ताप्रसारकसंस्था प्रसिद्ध करीत नाहीं. मात्र पं. नेहरूंसारखा गर्भश्रीमंत इसम स्वतःचें ओझें स्वतःच पाठकुळीवरून नेऊं लागला कीं, ती 'बातमी' वर्तमानपत्रांत ठळक टाइपांत छापली जाते व लोकही मोठ्या कौतुकानें ती वाचतात ! थोरांचें सारेंच थोर !

पं. नेहरूंच्या हमालीची ही कुतूहलोत्पादक बातमी मीं प्रथम वर्तमानपत्रांत वाचली, तेव्हां फार वर्षांपूर्वीं शाळेंत इंग्रजी पांचवी-सहावींत असतांना क्रमिक पुस्तकांत मीं रस्किनचा Dignity of Manual Labour या नांवाचा एक पाठ वाचल्याचें मला आठवलें. शरीरकष्ट करण्यांत देखील भूषणावह भाग आहे हें रस्किनचें म्हणणें मला त्या वयांत पटत नव्हतें आणि आजही पटतें तें केवळ दुसऱ्यांच्या शारीरिक कष्टांबद्दल दुरून आदर व्यक्त करण्यापुरतेंच ! मी स्वतःला बुद्धिजीवी समजतों, परंतु केव्हां केव्हां मला असें वाटतें कीं, शारीरिक ओझ्याच्या हमालीपेक्षां बौद्धिक ओझ्याची जन्मभर करावी लागणारी हमाली जास्त कष्टांची व पुष्कळदां अनुत्पादकही असते.

पं. नेहरू हे बौद्धिक हमालीबद्दल प्रसिद्ध आहेत. 'आंतरराष्ट्रीय राजकारणा'चें केवढें तरी मोठें ओझें त्यांच्या शिरावर सतत असतें. आणि त्यामुळेंच मला वाटलें, कष्टून भागून मथूनमथून पत्रकांच्या रूपानें ते लांबलचक श्वाससुस्कारे सोडीत असावेत ! अलाहाबाद स्टेशनवर केलेल्या आयुष्यां-

तील पहिल्याच शारीरिक हमालीच्या वेळच्या आपल्या अनुभवासंबंधीं त्यांनीं अद्याप कसें एखादें पत्रक काढलें नाहीं याचें मला राहून राहून नवल वाटत आहे. तसें एखादें पत्रक त्यांनीं काढलेंच, तर दररोज अर्धा तास चरख्यावर सूत काढण्याबरोबरच, कांहीं वेळ स्टेशनवर हमाली केल्यानें संपूर्ण स्वातंत्र्य जवळ येईल अशी धाडसी सूचना ते करणारच नाहींत असें म्हणवत नाहीं.

पं. नेहरू हे सोशॅलिस्ट आहेत व रशियाला ते गुरुस्थानीं मानतात. समाजसत्तावाद त्यांना अत्यंत प्रिय आहे. भांडवलशाहीचा नाश करण्यास ते उद्युक्त असतात. वर्गभेद त्यांना सहन होत नाहीं व मालक-मजूर हा प्रकार त्यांना अन्याय्य वाटतो. अशा पं. नेहरूंनीं स्टेशनवर, एकदां का होईना, स्वतःचें ओझें स्वतःच वाहून नेल्याचें वाचलें, तेव्हां मला मेट्रो-गोल्डविन-मेयर कंपनीच्या निनोशूका या सुप्रसिद्ध बोलपटांत पाहिलेल्या हुबेहूब तसल्याच प्रसंगाची आठवण आली. निनोशूका या बोलपटांत रशियन समाजसत्तावादाची चांगलीच टर उडविली आहे. निनोशूकाची भूमिका करणारी नटी ग्रेटा गार्बो, पॅरिसला गेलेल्या रशियन ट्रेड-बोर्डावरील खास कमिसार या नात्यानें मॉस्कोहून पॅरिसला रेल्वेनें येते तेव्हां स्टेशनवर तिचें सामान उचलूं पाहणाऱ्या हमालास ती मनाई करते. 'तूं माझें सामान कां उचलतोस ?' असें ती विचारते. तेव्हां हमाल म्हणतो—

"It is my business."

तेव्हां निनोशूका म्हणते—

"It is not your business. It is social injustice."

निनोशूकाप्रमाणेंच नेहरूही सोशॅलिस्ट असल्यानें हमालांनीं प्रवाशांचें सामान उचलावें, हा त्यांना 'सामाजिक अन्याय' वाटतो कीं काय मला ठाऊक नाहीं. परंतु ओझीं उचलण्याचें काम पं. नेहरूंनीं स्वतःच्या गांवीं, प्रयाग क्षेत्रींच केलें म्हणून ठीक. दुसऱ्या एखाद्या स्टेशनवर नेहरूंनीं आपला

हा प्रयोग करण्याचा प्रयत्न केला असता, तर एखादे वेळीं हिंदुस्थानच्या या माजी राष्ट्रपतीविषयीं लोकांचा भलताच गैरसमज होण्याची भीति होती.

'साहित्यबत्तिशी'तील कै. श्री. कृ. कोल्हटकरांचा 'साहित्य-संमेलनाची तयारी' हा लेख तुमच्यांपैकीं पुष्कळांनीं वाचला असेल. आपल्या गांवीं भरावयाच्या साहित्य-संमेलनासाठीं येणाऱ्या पाहुण्यांच्या स्वागतासाठीं, सुदामा, पांडुतात्या व बंडूनाना हे त्रिवर्ग स्टेशनवर गेले व आदरातिथ्याचा अतिरेक करण्यासाठीं कांहीं प्रवाशांचे बोजे उचलण्यालाही त्यांनीं अनमान केला नाहीं. परंतु त्यांच्या कृतीचा प्रवाशांनीं विपरीत अर्थ घेतला व त्यांना 'हमाल समजून एकेक दिडकी देऊं केली.' या प्रसंगाचें कोल्हटकरांनीं केलेलें वर्णन व मासिक 'मनोरंजन'मध्यें आलेलें त्याचें तें चित्र, पं. नेहरूंच्या हमालीच्या बातमीमुळें, पुन्हा एकवार माझ्या मनश्चक्षूंसमोर उभें राहिलें ! सुदामादि त्रिवर्गापेक्षां पं. नेहरूंचें भाग्य थोर म्हणून स्वतःच्या गांवीं असला विपरीत प्रसंग त्यांच्यावर ओढवला नाहीं !

थोर पुरुषांच्या आयुष्यांतील पुष्कळ चमत्कारिक घटना मीं वाचल्या आहेत. परंतु कोणाही थोर व्यक्तीनें स्वखुषीनें हमालीचा पेशा स्वीकारल्याचें कांहीं मला आठवत नाहीं. औरंगजेब बादशहा असून, कुराणांतील स्वकष्टार्जनाची आज्ञा पाळण्यासाठीं टोप्या शिवी किंवा कुराणाच्या हस्तलिखित प्रती काढून विकी व त्या मिळकतीवर गुजारा करी असें इतिहास सांगतो. तसा उपजीविकेचा आधार म्हणून हमालीचा आश्रय केलेला कोणी न मिळाला तरी चिंता नाहीं; परंतु हौस म्हणूनही या व्यवसायाचा थोडाफार अनुभव घेणारा कोणीच का निघूं नये हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. तसेंच पाहिलें तर, हमालीपेक्षां अधिक हलके धंदे कांहीं थोर पुरुषांनीं केलेले आहेत. कौंट लियो टॉलस्टॉय यांना जोडे शिवण्याचा विलक्षण छंद असे हें सर्वश्रुतच आहे. गांधींनीं 'हौस' म्हणून भंगीकामही केलेलें आहे. इंग्लंडचे सध्यांचे मुख्य प्रधान श्री. विन्स्टन चर्चिल हे आपला

फुरसतीचा वेळ गवंडीकाम करण्यांत खर्च करतात. गेल्या महायुद्धाच्या वेळचे इंग्लंडचे मुख्य प्रधान श्री. लॉइड जॉर्ज यांना शेतकीचा छंद असून ते स्वतः नांगरही हाकतात. जर्मनीचा माजी कायसर आणि रियासतकार रा. ब. सरदेसाई यांना लाकडें फोडण्याचा नाद आहे. असे अनेक थोर पुरुषांना नाना विचित्र छंद असतात; पण कोणीही हमालीचा छंद कधींच कसा घेतला नाहीं ?

या प्रश्नाचें एक उत्तर मला सुचतें तें हें कीं, संसारांत प्रत्येक माणसाला पाठीवर त्याचें स्वतःचेंच एवढें मोठें ओझें वाहावें लागतें कीं, दुसऱ्याच्या ओझ्यांची त्यांत भर घालणें म्हणजे उंटाच्या पाठीवर शेवटची काडी लादण्यापैकींच प्रकार व्हायचा. नानाप्रकारच्या चिंता व काळज्या यांच्या ओझ्याखालीं चिरडून गेलेल्या समाजांतील लोकांची अवस्था अलंकारांच्या ओझ्याखालीं दडपून गेलेल्या गडकरी-खांडेकरांच्या भाषेप्रमाणें अनुकंपनीय होते.

म्हणूनच, साऱ्या जगाचें ओझें शिरावर घेऊन अनंतकाळ हमाली करीत असलेल्या शेषशायीबद्दल मला विस्मयादर वाटतो. साध्या फिरकीच्या ताब्यांला एक 'डाग' मानून डागाला एक आणा हमाली चोपून घेऊं पाहणाऱ्या रेल्वेवरील "लाल" हमालांना उद्देशून, हजारों वर्षें एका दिडकीची अपेक्षा न करतां साऱ्या जगाचें ओझें डोक्यावर वाहणाऱ्या शेषशायीच्या उदाहरणाकडे बोट दाखविण्याचा मला वारंवार मोह होतो. परंतु शेपटीवर पाय पडून हमालाच्या अंगांतील 'शेषशायी' फुसफारूं लागण्याची भीति असल्यामुळें मला तें धैर्य अद्यापपर्यंत झालेलें नाहीं हा भाग वेगळा !

भगवान् शेषशायीशीं स्पर्धा करणारा एकच प्राणी जगांत आहे आणि तो म्हणजे Whiteman. रुडयार्ड किप्लिंग यांनीं White Man's Burden चा शोध सर्वश्रुत केला व जगांतील सर्व काळ्या आदमीचें ओझें 'पांढऱ्या मानवा'वर ईश्वरानें टाकलें आहे, अशी समजूत करून देण्याचा हरयुक्तीनें प्रयत्न करण्यांत आला. या पांढऱ्या मानवाच्या शिरावर साऱ्या जगाचें

ओझें कोणी व कशासाठीं लादलें याचा समाधानकारक उलगडा होऊं शकत नसला तरी अनुभव मात्र असा आहे कीं, हें 'पांढऱ्या मानवाचें ओझें' नेहमीं काळ्या मानवाच्या मानगुटीला बसतें !

शारीरिक हमाली करणाऱ्यांची संख्या जगांत जास्त आहे, कीं बौद्धिक हमालांची लोकसंख्या अधिक आहे. हें सांगणे कठीण आहे; परंतु या दोन प्रकारच्या हमालांत एक साम्य आहे तें हें कीं, ते दोघेही नेहमीं दुसऱ्याच्या 'माला'ची बोजेउठावणी करीत असतात. मात्र शारीरिक हमालीमध्यें माल जड वस्तूंचा असल्यानें तो ज्याचा त्याला परत देऊन अंग झटकून मोकळें होतां येण्याची सोय असते, ती बौद्धिक हमालींत नसते, इतकेंच काय पण बौद्धिक हमालींत परक्यांचीं वैचारिक ओझीं वाहण्याची माणसाला इतकी सवय होते कीं, कालांतरानें तो माल आपलाच असल्याची त्याची भावना होते! शेजाऱ्याकडून मागून आणलेली एखादी जिन्नस वापरून आपल्याच मालकीची करण्याची कला कांहींना छान साधलेली असते. पं. नेहरू ज्या समाजसत्तावादाचे पुरस्कर्ते आहेत, त्या वादाला आपल्या डोकीवरील टोपीचें तर्पण करून 'भाई' बनलेल्या कैक लोकांना आपणच लेलिन-स्टॅलिन आहोंत असा भास होतो याचें कारण तरी हेंच. माझ्या एका कादंबरीकार मित्रानें आमच्या भाईचें वर्णन "मार्क्सचे हमाल" या शब्दांत अगदीं समर्पक केलें आहे.

फोडिलें भांडार । धन्याचा हा माल
मी तो हा हमाल । भारवाही

असल्या भारवाही हमालापेक्षां आपल्या भाईंची लायकी अधिक नसते.

समाजांत असेही कांही भाग्यशाली प्राणी असतात कीं, ज्यांचें ओझें सदैव दुसऱ्याच्या शिरावर असतें. एका संस्थानांतील एक गंमत अशी सांगतात कीं, संस्थानांत थोरली व धाकटी पाती मिळून एके काळीं समान वयाचे असे पांच-सहा राजकुमार शिक्षण घेत होते. त्यांत मधले एक

राजकुमार भाऊसाहेब हे बुद्धिमान् व अभ्यासू वृत्तीचे निघाले. तेव्हां बाकीच्या सर्व राजकुमारांनीं आपापलें अभ्यासाचें ओझें यांच्यावर टाकून उनाडक्या करीत दिवस घालविण्यास सुरुवात केली. पण मौज अशी कीं परीक्षा आली कीं, भाऊसाहेब अभ्यास करून परीक्षेला बसत खरे, परंतु पास होत मात्र नानासाहेब किंवा तात्यासाहेब! कारण त्यांच्या परीक्षेचा अभ्यास करून त्यांच्या नांवानें भाऊसाहेब परीक्षेला बसत असत. या योजनेचा परिणाम असा झाला कीं, अभ्यास न करणारे सगळे राजकुमार शाळेंतील सगळ्या परीक्षा पास होऊन गेले, तरी भाऊसाहेबांना स्वतःची अशी एकही परीक्षा देण्याला सवड मिळाली नाहीं!!

कांहीं कांहीं वेळां मला असें वाटतें कीं, आपण आपल्या डोक्यावर ज्ञानाचें एवढें मोठें ओझें वागवतों त्याचा तादृश फायदा काय आहे? माझ्या शेजारीं राहणाऱ्या एकदोन बिऱ्हाडांत कोणी चुकूनही कसलें पुस्तक किंवा वर्तमानपत्र उघडून बघितलेलें मीं पाहिलें नाहीं; पण त्यामुळें त्यांच्या संसारांत सुख किंवा आनंद कमी पडल्याचें मला केव्हांच आढळलेलें नाहीं. असें असतां रोज सकाळीं उठल्याबरोबर तुलाच साऱ्या जगांतील कटकटींत डोकें खुपसण्याचें काय कारण, हा प्रश्न मी मनाला कांहीं वेळा विचारतों. माझ्याशीं ज्यांचा काडीमात्र संबंध पोंचण्याचा संभव नाहीं, अशा जागतिक भानगडींचीं ओझीं मीं नित्य माझ्या शिरावर हौसेनें लादून चालविलेल्या फुकट हमालीचा अर्थ काय? मला वाटतें पूर्वीची गुलामगिरीची पद्धत नष्ट होऊन आतां बौद्धिक गुलामांची नवी जात निर्माण झाली आहे.

साखरेच्या गोण्या बैलाचिया पाठी
तयाला शेवटीं कळ वाटे;

यापेक्षां कांहीं अधिक 'फलप्राप्ति' बौद्धिक ओझीं वाहून होत असेल असें वाटत नाहीं.

'माझ्या खजिन्यांतील हवें तितकें द्रव्य घेऊन जा' म्हणून एका राजानें परवानगी दिल्यावर, कुवतीबाहेर द्रव्य वाहून नेण्याचा प्रयत्न केल्यामुळें वाटेंत गतप्राण झालेल्या लोभी ब्राह्मणाची गोष्ट लहानपणीं मीं वाचली होती. माणसाची ती लोभी वृत्ति अजून नाहींशी झालेली नाहीं. आपल्या कुवती-बाहेरचीं ओझीं वाहण्याची धडपड सर्व क्षेत्रांतील लोक करीत असलेले आजही दिसत आहेत; कोणी संसाराचें तर कोणी सार्वजनिक कार्याचें ओझें वाहतो. कोणी संपत्तीचा, तर कोणी सरस्वतीचा भार वाहतात. येथून तेथून सर्व मनुष्यांचा आत्मा एकच असल्याचें वेदान्ती लोक सांगतात; तें खरें असेल तर त्या 'आत्म्या'ला कसलें ना कसलें तरी 'ओझें' वाहण्याची 'हमाली' करीत राहण्याचा छंद जडलेला असला पाहिजे असें मला वाटतें.

# क्रिकेट आणि लढाई

सुमारें पंधरा दिवसांपूर्वी सर्व वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेली एक लहानशी बातमी माझ्या वाचकांपैकीं पुष्कळांच्या वाचनांत आली असेलच—

" ॲडलेड, जून ता. २८

डॉन ब्रॅडमन यांनीं हवाई दलांत नांव दाखल केलें असून सैनिक म्हणून कामावर येण्याबद्दलच्या हुकुमाची आतां ते वाट पाहत आहेत.

या चार ओळींच्या बाबतींत तसें विशेष महत्त्वाचें कांहीं नाहीं. लढाई सुरू झाल्यापासून लष्कराच्या निरनिराळ्या दलांत दाखल होऊं पाहणाऱ्या लोकांची संख्या वाढतच आहे. हिंदुस्थानसारख्या देशांतही हवाई दलांत भरती सुरू झाल्याचें जाहीर होतांच रोज एक ते दोन हजार अर्ज येऊं लागल्याचें सरकारी पत्रक निघालें आहे. अशा स्थितींत ऑस्ट्रेलियासारख्या स्वयंशासित देशांत, सैन्याच्या वेगवेगळ्या विभागांत प्रवेश मिळवूं इच्छिणाऱ्या तरुणांची संख्या वाढती असल्यास नवल नाहीं.

हवाई दलांत दाखल होण्यासाठीं येणाऱ्या शेंकडों तरुणांचीं नांवें कांहीं कोणी वर्तमानपत्रांत छापीत नाहींत. वरच्या बातमीला एवढें महत्त्व येण्याचें कारण तींत डॉन ब्रॅडमनचें नांव गोंवलें आहे, हेंच.

"पाणिस्पर्शेचि आमचा शकतसे वस्तूंप्रती द्यावया.
सौंदर्यातिशया..........."

हें जसें लोकोत्तर कवींच्या प्रतिभेबाबत खरें आहे; तद्वत् थोर पुरुषांच्या व्यक्तिमाहात्म्याबाबतही म्हणतां येईल कीं—

" नामस्पर्श तदीय होउनि सदा साधीहि वार्ता जगीं
पावे थोर महत्त्व—"

थोर लोकांच्या महत्त्वाच्या हकीकतींनाच काय, पण साध्या हालचालींना

देखील सार्वत्रिक महत्त्व येत असतें. थोरांच्या हालचाली एवढ्याचसाठीं वर्तमानपत्रांत छापण्याचा रिवाज आहे.

ब्रॅडमनच्या नांवामुळें एका अगदीं सामान्य बातमीला जागतिक महत्त्व आलें. परंतु तींत नावीन्यही थोडें आहे त्यामुळें माझें लक्ष त्या बातमी-कडे विशेष वेधलें गेलें. माझ्यासारख्या वर्तमानपत्राच्या नियमित वाचकाला डॉन ब्रॅडमनचें नांव वाचण्याचा प्रसंग या दिवसांत जरी नेहमींचाच असला, तरी वरच्या बातमींत ज्या अनुषंगानें त्याचें नांव आलें आहे, त्यासंबंधांत तें वाचायला लागण्याचा हा पहिलाच प्रसंग !

क्रिकेटर म्हणून ब्रॅडमनचें नांव सर्व जगभर प्रसिद्ध आहे. परंतु आज त्याचें नांव झळकलें तें क्रीडाक्षेत्रावरील त्याच्या कामगिरीमुळें नव्हे, तर तो हवाई दलांत दाखल होऊन वैमानिक होणार म्हणून. प्रतिस्पर्धी संघांतील गोलंदाजानें फेकलेल्या चेंडूचें विमान फटक्यासरशीं आकाशांत चढविण्याची करामत जरी ब्रॅडमननें अनेक वेळां केलेली असली, तरी स्वतःचें 'विमान' त्यानें कधींच फार वर चढूं दिलें आहे. पण आतां मात्र हवाई दलांत दाखल झालेला ब्रॅडमन क्रिकेटच्या चेंडूप्रमाणें उंच उडून, आकाशांत गिरक्या घेईल. आपण उंच चढवलेल्या चेंडूची अवस्था वर काय होत असेल याची ब्रॅडमनला या नव्या अनुभवानें थोडीशी कल्पना येण्याचा संभव आहे !

क्रिकेटच्या क्रीडांगणावरील पराक्रमाची पुनरावृत्ति तो हवाई दलांत करूं शकेल किंवा कसें हें सांगणें कठीण आहे. क्रिकेटचा खेळ ही एक प्रकारची लढाईच असते खरी; परंतु ती संपूर्ण 'अनत्याचारी' व 'अहिंसात्मक' असते.

ब्रॅडमनच्या बातमीमुळें माझ्या मनांत क्रिकेटचा विचार घोळूं लागला. इंग्लंड-मध्यें क्रिकेटचा खेळ वसंतऋतूंच्या आगमनाबरोबर सुरू होत असला तरी, हिंदुस्थानांत त्याचें आगमन मृग-नक्षत्राबरोबर होतें. सध्यां आपला

क्रिकेट-सीझन सुरू आहे. पावसाच्या पाण्यानें हिरवींगार दिसणारीं क्रिकेटचीं क्रीडांगणें या दिवसांत अत्यंत नयनमनोहर दिसतात. या दिवसांत रेक्लेमेशनवर संध्याकाळीं फिरण्याची मिजास कांहीं औरच असते! एका बाजूला सागराच्या लाटा तुफान आवेशानें पॅरापेटवर आपटून पथिकांवर तुषारमौक्तिकांचा वर्षाव करून त्याचें शरीर 'गार' करतात, तर दुसऱ्या बाजूस पसरलेली निरनिराळ्या जिमखान्यांचीं हिरवींगार क्रीडांगणें त्याचे डोळे 'गार' करतात.

लढाईच्या संकटामुळें क्रिकेटचा यंदाचा सीझन फारसा गाजण्याचा संभव नाहीं. इंग्लंडमध्यें तर क्रिकेटचा खेळ आतां फ्रँकवुलीसारखे क्रीडानिवृत्त म्हातारेच कसाबसा जिवंत ठेवीत आहेत. लेन हटन, लेस्ली एम्स, बिल एड्रिचप्रभृति बहुतेक तरुण खेळाडू क्रीडांगणावरून रणांगणावर गेले आहेत, आणि ऑस्ट्रेलियांत आतां डॉन ब्रॅडमनप्रभृति पट्टीचे खेळाडू तीच वाट धरूं पाहत आहेत.

या दिवसांत हटन, हॅमंड, व्हेरिटी, यांसारखीं नांवें एरवीं रोजच्या वर्तमानपत्रांत हटकून आढळावयाचीं हा दरवर्षीचा अनुभव आहे. पण यंदा हिटलरच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेमुळें या खेळाडूंच्या नांवांची वर्तमानपत्रांतील हक्काची जागा लष्करी सेनापतींच्या नांवांनीं पटकावली आहे. आतां गोडार्ड या गोलंदाजाचें नांव रॉयटरच्या तारेंत दिसत नाहीं, तर गोर्ट हें नांव पुढें येते. हॅमंडच्या ऐवजीं दर्यासारंग डडूले पौंड यांच्या नांवाला सध्यां जास्त महत्त्व आहे. आपल्या नेहमींच्या परिचयाचीं क्रीडांगणावरील नांवें अजीबात मागें पडून, पूर्वी कधीं फारशीं न ऐकलेलीं रणांगणावरील नांवें सध्यां जिकडे तिकडे दृष्टीस पडतात.

नांवाप्रमाणेंच स्थळें व इतर शब्दही आपल्या तोंडचे आज बदललेले आहेत. एरवीं या दिवसांत लॉर्ड्स, ओव्हल, लीड्स, यांसारख्या क्रीडाक्षेत्रांचीं नांवें लोकांच्या जिभेवर नाचत असायचीं, पण आज त्या

जिभा वेस्टर्न फ्रन्ट, फ्लँडर्स, डंकर्क वगैरे नांवें वळविण्यांत गर्क आहेत. सेंचरी हा शब्द शंभर वेळां घोकला जाण्याच्या सध्यांच्या दिवसांत ज्याच्या-त्याच्या बोलण्यांत सबमरीन हा शब्द वावरत आहे. चेंडूफेकीच्या ऐवजीं बॉम्ब-फेकीची सर्वत्र चर्चा चालू आहे. अॅशिस् या शब्दाची जागा अलाइस या शब्दानें घेतली आहे. स्टोन वॉलिंग ऐवजीं ब्लॉकेड आपल्या परिचयाचा झाला आहे. स्कोअर-कार्डची जागा रेशन-कार्डनें बळकावली आणि 'हेमंड गेला', 'लीलंड गेला' वगैरे भाषेच्या जागीं हॉलंड गेलें, लोलँड गेलें, ही भाषा कानीं पडत आहे.

क्रिकेट हीसुद्धां एक लढाईच आहे असें मीं वर म्हटलें आहे. Waterloo was won on the cricket field of Eton and Harrow हें वचन सुप्रसिद्धच आहे. रणांगणावरच्या लढाया जिंकण्याच्या कामीं क्रीडांगणावरील क्रिकेटचा किती उपयोग होतो, याचें मूर्तिमंत उदाहरण म्हणून या वचनाकडे केव्हांही बोट दाखवितां येईल. आपलें आयुष्य ही एक मोठी लढाई आहे असें म्हणतात.

## जीवन है संग्राम

हें खरें आहे; पण हा संग्राम रणांगणांवरील नसून क्रीडांगणावरील आहे. आणि आयुष्यभर निरनिराळ्या छोट्या छोट्या लढाया जिंकण्याची ज्याला हिंमत आहे, त्याला रणांगणावरील लढाईचें भय वाटण्याचें कारण नाहीं. डॉन ब्रॅडमनसारखे क्रिकेटर पटापट लष्करी दलांत सामील होण्यासाठीं पुढें सरसावले याचें कारण तरी हेंच असावें.

युद्धाप्रमाणें क्रिकेटची वार्ता नेहमीं ऐकावयाला रम्य असते. तुम्ही स्वतः क्रिकेट खेळलेले असा अगर नसा, पण तिकडे मेजर नायडू किंवा अमरनाथ खेळायला गेले कीं, इकडे तुमचे हात आपोआपच शिवशिवूं लागतात हा अनुभव तुमच्यांपैकीं पुष्कळांना असेल. निरनिराळ्या क्रिकेटरांच्या गोष्टी कितीदांही ऐकल्या तरी कंटाळा येत नाहीं. तुम्ही

कसल्याही उद्योगांत असा, त्या वेळीं चाललेल्या महत्त्वाच्या क्रिकेट सामन्याचा ताजा स्कोअर करून घेण्याची तळमळ तुम्हांला लागली असते. आज लढाईच्या अगदीं ताज्या बातमीवरही अशाच उड्या पडत नाहींत काय ?

क्रिकेटची ताजी बातमी जाणण्यासाठीं मंडळी किती उत्सुक असतात याचें उत्तम उदाहरण म्हणून पूर्वीं कोठें तरी वाचलेली एक गोष्ट मी येथें देतों. इंग्लंडमध्यें ऑस्ट्रेलियन क्रिकेट टीमचा दौरा चालू असतां टेस्ट मॅचच्या वेळीं एका गृहस्थाचा चर्चमध्यें लग्नविधि सुरू होता. पाद्र्यापुढें वधूवर उभे राहून मंत्रदीक्षा घेत असतां, वराच्या एका मित्रानें एक कसलासा कागद त्याच्या हातीं दिला. त्यानें तो वाचून पाहून तसाच आपल्या वधूच्या हातीं दिला. लग्नविधीसारख्या महत्त्वाच्या व गंभीर समारंभांत चाललेला पोरखेळ पाहून पाद्रीसाहेबांना घुस्सा आला व त्यांनीं ती चिठी हिसकावून घेऊन वाचली. चिठींत इंग्लंड विरुद्ध ऑस्ट्रेलियामधील टेस्ट मॅचचा ताजा स्कोअर लिहिलेला वाचून पाद्रीसाहेबांनीं नवरदेवांना विचारलें—

"मग काय करणार ! लग्नविधि पुरा करायचा कीं मॅचकडे धावणार?"

विद्यार्थ्यांच्या मनाला तर क्रिकेटची ओढ जबरदस्त असते. कु. कमल दीक्षित यांनीं 'निष्कलंक' ही कादंबरी ज्यांच्या मूळ पुस्तकावरून भाषांतरली त्या जेम्स हिल्टन यांनीं लिहिलेल्या 'To you Mr. Chips' या कादंबरींतील एक गोष्ट मला आठवते. एका शाळेंतील एका मास्तराला अशी सवय होती कीं, वर्गांत कोणी एखादी खोडी केली तर ज्यानें खोडी केली त्यानें उठून उभें राहावें असें ते वर्गांत फर्मान सोडीत व या युक्तीनें गुन्हेगार विनासायास शोधून काढीत. त्या वर्गांतील एका द्वाणगट मुलाला वाटे कीं, गुन्हेगार 'शोधून' काढणें हें मास्तरचें काम असतां, केवळ आळशीपणामुळें तें न करतां वरच्या सोप्या उपायानें गुन्हेगाराचा शोध लावायची त्यांची ही युक्ति आहे. तेव्हां मास्तरला 'धडा' शिकवण्यासाठीं म्हणून त्या आडदांडानें स्वतःच एके दिवशीं खोडी केली, व सर्व मुलांना बजावून ठेवलें कीं,

कोणीही मास्तरकडे चहाडी करतां कामा नये. वर्गातील दांडगेश्वराचें ऐकणें इतर विद्यार्थ्यांना कसें भाग पडतें हें वाचकांना अनुभवानें माहीतच असेल.

मास्तरनें वर्गात नेहमींचा, गुन्हेगारानें स्वतः होऊन उभें राहाण्याचा, प्रश्न काढला. तेव्हां हा दांडगोबा बसूनच राहिला. तेव्हां संबंध वर्गाला शिक्षा म्हणून मास्तरनें, खरा गुन्हेगार उघडकीस येईपर्यंत तो वर्ग रोज शाळा सुटल्यावर अर्धा तास जास्त वेळ थोपवून ठेवण्याचा तोडगा काढला. चारसहा दिवस साऱ्या विद्यार्थ्यांनीं ही शिक्षा निमूटपणें सोसली; पण नंतर त्यांच्यांत चलबिचल सुरू झाली, आणि तिचें कारण क्रिकेट ! वर्ग रोज अर्धा तास जास्त चालू राहिल्यानें वर्गातील मुलांचा क्रिकेटचा खेळ बुडूं लागला. एक चांगली मॅच बुडाली व दुसरी बुडण्याचा वेळ समीप येतांच विद्यार्थ्यांनीं त्या दांडगेश्वराविरुद्ध ंड पुकारून मास्तरला खरा प्रकार सांगणें त्याला भाग पडलें !

प्रत्येक गोष्टीपासून कांहीं तरी बोध मिळाला पाहिजे असा ज्यांचा कटाक्ष असेल, त्यांच्यासाठीं मी वरील गोष्टीचें तात्पर्य म्हणून, क्रिकेटमुळें माणसाला प्रामाणिकपणानें वागण्याची कशी इच्छा होते तें पाहा असें म्हणूं शकेन. हें खरें असलें तरी प्रामाणिकपणें खरें बोलायचें तर, तें खरें नाहीं असेंच म्हणावें लागेल ! क्रिकेटच्या मोसमांत प्रामाणिक माणूसही अप्रामाणिक होतो असा माझा अनुभव आहे. ऑफिसांत सरळ सिकनोट पाठवून पंचरंगी सामने बघायला जाणारे लोक थोडेथोडके नाहींत आणि मित्राकडे अभ्यासाला जातों म्हणून घरीं थाप ठेवून देऊन क्रीडांगणाकडे धाव घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या तर मोठी आहे.

या वृत्तीच्या मुळाशीं आपल्या रक्तांत भिनलेली लढाऊ वृत्ति आहे असें मला वाटतें. लढाई, मग ती रणांगणावरील असो, कीं क्रीडांगणावरील असो, माणसाला सारखीच रोमांचकारी वाटते. विशेषतः स्वतःकडे केवळ बघ्याचीच भूमिका असेल, तर माणसाचा उत्साह विचारायला नको !

हरेक प्रकारच्या चळवळीला 'लढा' हें नांव देण्याची पद्धत पडण्याचें कारण देखील माणसाची ही युद्धप्रियताच. साहित्यिकांना वाग्वीर संबोधून त्यांच्यातर्फे माजविल्या जाणाऱ्या वितंडवादाला 'वाग्युद्ध' म्हटलें जातें ! मानवी युद्धप्रियतेच्या अतिशयोक्तीचें हें एक प्रकारचें विडंबनच नव्हे का ?

कुस्ती ही मानवी लढाईची प्राथमिक पायरी मानली, तर अद्यावत् शस्त्रास्त्रांसह अत्यंत व्यापक प्रमाणावर व विस्तृत क्षेत्रांवर चालणाऱ्या आजच्या लढाया ही शेवटची पायरी मानावी लागेल. दोन माणसांतील लढाईपासून आज जागतिक लढाईपर्यंत मानवी प्रगतीची मजल गेली आहे, आणि या वाढत्या व्यापकतेबरोबरच लढाईच्या संहारकत्वाचाही परिघ विस्तीर्ण होत चालला आहे. पूर्वीच्या बलाढ्य सेनानींचा लढाईचा हेतु प्रदेश जिंकणें हा असे. आतांच्या लढाया लढाईचा शेवट करण्यासाठीं ( War to end war ) होत आहेत म्हणे. कलेसाठीं कला म्हणतात तें असल्याच प्रकारांना ! !

लढाईनें लढाईचा शेवट होईल कीं नाहीं हें सांगणें कठीण असलें, तरी क्रिकेटच्या क्षेत्रावरील प्रेक्षणीय लढ्याला मात्र तिनें तूर्त खीळ घातली आहे एवढें खरें. क्रीडांगणावरील आघाडीचे वीर रणांगणावरील पिछाडीस साधे सैनिक म्हणून आज उभे आहेत. आजच्या स्थितींत ब्रॅडमननें लेन हटनचें रेकॉर्ड मोडलें असल्या बातमीपेक्षां तो हवाई दलांत दाखल झाला या बातमीचें महत्त्व जास्त आहे.

लढाईचा शेवट करायचा असेल तर अशा पद्धतीनें रणक्षेत्रावरील सैनिक क्रिकेटच्या क्षेत्रांत उतरायला हवेत. हिटलर-मुसोलिनीसारखे हुकूमशहा 'लोण्यापेक्षां बंदुकीच्या गोळीचें महत्त्व जास्त आहे' ( Bullet is more important than butter ) असें मानण्याऐवजीं 'क्रिकेटची बॅट ही

बंदुकीपेक्षां जास्त सरस आहे' असें मानायला शिकतील तर जागतिक लढायांनीं क्रिकेटला टाळें लागण्याऐवजीं क्रिकेटमुळें जागतिक लढाईला पायबंद पडण्याचा जास्त संभव आहे. क्रिकेट खेळून वॉटर्लूची लढाई जिंकणारे वीर नेपोलियनप्रमाणेंच हिटलरलाही चालू लढाईंत तो धडा शिकवतील अशी मला खात्री वाटते.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय-ठाणे
५८१८

# लाल फीत

लाल फीत हें रेड टेप या इंग्रजी शब्दाचें सरळ भाषांतर आहे. कार्याचें महत्त्व ओळखण्यापेक्षां कार्यपद्धतीच्या आंखीव नियमांना चिकटून राहण्याची नोकरशाहीची पद्धत रेड टेप या नांवानें ओळखली जाते. रेड टेप याचा शब्दकोशांत मिळणारा अर्थ असा कीं, " सार्वजनिक कामांत औप-चारिकतेच्या नियमांना अवास्तव चिकटून राहण्याची पद्धत." सरकारी कामकाजांत पूर्वापार चालत आलेल्या चाकोरीबाहेर जाण्याची नोकरशाहीची सहसा तयारी नसते व पूर्वापार चाकोरी कोणती आहे हें ठरविण्यासाठीं वारंवार कामाच्या पुराण्या फाइलींचा आधार घेण्याची वहिवाट आहे. यामुळें या फाइलींनाही रूढार्थानें 'रेड टेप' म्हणून संबोधण्याची वहिवाट पडली आहे. ठराविक चाकोरीचा बडेजाव राखणें म्हणजेच लाल फितीची गुलामगिरी होय.

या लाल फितीच्या जेरबंदांनीं जखडल्यामुळें कित्येकदां कशी विचित्र परिस्थिति निर्माण होते, याचें गेल्या आठवड्यांत एक नामी उदाहरण घडून आलें. ती कथा अशी—

" मुंबईचें एक उपनगर, व माजी मुख्य प्रधान श्री. बाळासाहेब खेर यांचें नमुनेदार खेडें जें खार तेथें मंगळवारीं ता. ९ रोजीं भल्या पहाटेला एका बंगल्याला आग लागली. ती विझविण्यासाठीं वांद्रा फायर ब्रिगेडला बोलाविण्यांत आलें. परंतु त्याकरवीं आग आटो-क्यांत येण्याचें चिन्ह दिसेना म्हणून, मुंबईच्या फायर ब्रिगेडला टेलिफोन करून आमंत्रण केलें. खार हें गांव मुंबई म्युनिसिपालिटी-च्या क्षेत्राबाहेर असल्यानें म्युनिसिपल कमिशनरच्या परवानगीवांचून

मुंबईच्या फायर ब्रिगेडला आपली हद्द सोडतां येत नाहीं असें कळविण्यांत आलें. तेव्हां मुंबईचे माजी मुख्य प्रधान श्री. बाळासाहेब खेर यांनीं भल्या पहाटेस म्युनिसिपल कमिशनरना फोन करून 'जीवित व वित्त यांची हानि होत असतांना लाल फितीला ( रेड टेपिझम ) इतकें महत्त्व न देण्याची' विनंति केली. हा सारा सोहळा होऊन कमिशनरची परवानगी मिळून मुंबई फायर ब्रिगेड आगीच्या जागीं येऊन पोंचेपर्यंत सुमारें दोन तासांचा वेळ गेला व तेवढ्या वेळांत त्या इमारतीचा वरचा माळा जळून खाक झाला ! ''

लाल फितीचा हा प्रभाव पुष्कळांच्या परिचयाचा असेल. कार्यापक्षां चाकोरीला महत्त्व मिळतें तेथें कार्यनाश किंवा कार्यहानि थोडीशी तरी होणें क्रमप्राप्त आहे. फार वर्षांपूर्वी एके ठिकाणीं वाचलेली एक गोष्ट मला आठवते. एका संस्थानांत संस्थानिकाच्या जुन्या राजवाड्यास आग लागली. आग असली तरी ती राजेसाहेबांच्या राजवाड्यास लागलेली असल्यानें ती विझविण्याबाबत पूर्वापार चालत आलेल्या वहिवाटीचा मान ठेवण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. राजवाड्यास आग लागली असतां ती विझविण्याबाबत काय वहिवाट आहे, हें मागील पांच वर्षांच्या कामकाजाच्या फायली चाळून, शोधून काढण्याचे हुकूम सुटले. बिचाऱ्या कारकुनांनीं रात्रंदिवस राबून राजवाड्यासंबंधींचें पांच वर्षांचें दप्तर चाळून पाहिलें, परंतु त्या पांच वर्षांत राजवाड्याला आगच लागली नव्हती, तर ती विझविण्याच्या 'वहिवाटीचा दाखला' सापडणार कसा ? तेव्हां आणखी मागच्या पांच वर्षांचें दप्तर पाहण्याचा हुकूम सुटला. अशा रीतीनें राजवाड्याला लागलेल्या आगीबाबत जुना वहिवाटीचा दाखला मिळेपर्यंत मागील दप्तरांची उलथापालथ चालू राहिली व तोंपर्यंत आगही चालू राहिली; अर्थात् दरबारी अधिकाऱ्यांना वहिवाटीचा दाखला मिळण्यापूर्वीं राजवाडा जळून भस्मसात् झाला व सरकारी कागदोपत्रीं एक नवाच दाखला रुजू झाला ! ! !

या गोष्टींत शंभर टक्के सत्य असेल असें जरी मी हमखास म्हणूं शकत नाहीं, तरी वरील खार-प्रकरणाची हकीकत वाचल्यावर, ही कथा केवळ कपोलकल्पितच असेल असें मात्र म्हणवत नाहीं. थोडा अतिशयोक्तीचा रंग त्यांत मिसळला असेल फार तर. परंतु रेड टेपिझमच्या अनर्थावर ती एक मार्मिक व उपरोधिक टीका आहे एवढें मात्र खरें.

औपचारिक वहिवाटीच्या दाखल्याचें स्तोम माजविण्याची सवय झाली कीं माणसाच्या मेंदूंत मंदपणा व कार्यांत दिरंगाई येणें अपरिहार्यच होतें. जुन्या कामकाजाच्या दप्तरांत आपल्या पूर्वींच्या लोकांनीं ज्या रेघोट्या ओढल्या असतील त्याच 'मम' म्हणून पुढें ओढीत राहायला फारशा अकलेची आवश्यकता असेल असें मला वाटत नाहीं. सनातनी लोक ज्याप्रमाणें धार्मिक बाबतींत 'बाबा वाक्यं प्रमाणम्' या धोरणानें वागतात, तसेच असे लाल फीतवाले लोकही जुन्या फाइलींच्या स्मृतींना साक्ष ठेवून आपल्या टेबलावरील कामाची विल्हेवाट अक्षरशः डोळे झांकून करतात.

दरबारी कामकाजांत या रेड टेपचें अथवा वहिवाटीच्या दाखल्याचें केवढें प्रस्थ असतें याची एकच नमुनेदार गोष्ट सांगतों. एका संस्थानांतील एका खेडेगांवीं रोज रात्रौ कांहीं लोक चावडीवर गप्पागोष्टींसाठीं जमत असत. चावडीवर दिवाबत्तीची कांहीं सोय नसल्यानें होणारी गैरसोय दूर करण्यासाठीं म्हणून त्यांनीं शक्कल काढून, चावडीवर सरकारी खर्चानें बत्ती मिळावी अशा आशयाचा एक अर्ज गांवकऱ्यांच्या सह्यांनीं गांवकामगारांकडे पाठविला. गांवकामगारांकडून वरच्या अधिकाऱ्यांकडे, तेथून पुन्हा वरच्या अधिकाऱ्यांकडे असा मजल-दरमजल करीत तो अर्ज संस्थानच्या दिवाणां-कडे मंजुरीसाठीं आला. दिवाणांनीं तें काम अर्थमंत्र्यांकडे पाठवून चावडीवर बत्तीची सोय केल्यास सरकारी तिजोरीवर वार्षिक केवढ्या रकमेचा 'बोजा' पडेल याचें 'अंदाजपत्रक' सादर करण्याचा हुकूम सोडला. सगळ्या गांवांतील तेल्यांचे व कुंभारांचे ( कारण चावडीला ठावकीची बत्ती द्यावयाची

होती ) अंदाज अथमंऱ्यांनीं मागविले! शेवटीं अशी बत्ती दिल्यास सरकारला दरवर्षीं जास्तींत जास्त एक रुपया खर्च येईल असें अंदाजपत्रक सादर केलें गेलें !

त्यानंतर रेड टेपची दुसरी पायरी आली. ज्या गांवानें बत्ती मागितली होती, त्या गांवीं पूर्वीं सरकारी खर्चानें तशी बत्ती होती काय? असल्यास ती कां व केव्हां बंद झाली, याची चौकशी सुरू झाली. त्या गांवीं पूर्वीं तशी बत्ती नव्हती व नव्यानेंच गांवकऱ्यांनीं मागणी केली आहे असें कळल्यावर पुन्हा दरबारी चौकशीची एक पायरी आली, त्या गांवीं नसल्यास आसपासच्या पंचक्रोशींत किंवा निदान आपल्या संस्थानांत तरी कोणत्या एखाद्या गांवीं सरकारी खर्चानें अशी बत्ती दिल्याचा दाखला मिळतो कीं काय याची चौकशी साऱ्या संस्थानभर सुरू झाली !

परंतु सदर संस्थानांत तसा वहिवाटीचा दाखला कोठें सापडला नाहीं. तेव्हां निदान आसपासच्या दुसऱ्या कोणत्या संस्थानांत अशी वहिवाट आहे कीं काय, याची खास कामगार पाठवून चौकशी करण्यांत आली. परंतु तेथेंही कोठें तसा दाखला मिळाला नाहीं. दरम्यान हें बत्तीमागणीचें काम गांवकामगार ते दिवाण व फिरून दिवाण ते गांवकामगार असें 'गड-सासवड' करीत फिरत होतें. अखेर प्रदीर्घ काळ वहिवाटीच्या दाखल्यापायीं अशी पायपिटी केल्यावर त्या चिमकुल्या कामाचा दरबारनें निकाल दिला कीं,

> " सध्यांच्या आर्थिक तंगीच्या काळांत सरकारी तिजोरीवर जादा बोजा लादणें युक्त नसल्यानें गांवकरी मागतात तशी बत्तीची सोय दरबारांतून करतां येत नाहीं ! "

या प्रकरणीं विशेष लक्षांत घेण्यासारखी गोष्ट अशी कीं, बत्ती दिली असती तर तिजोरीवर वर्षाला एक रुपयाचा 'बोजा' पडला असता; परंतु तेवढाही बोजा आर्थिक तंगीच्या कारणास्तव नाकारणाऱ्या दरबारनें 'वहिवाटीच्या दाखल्या'पायीं याच कामावर दोनशें रुपये खर्चिले होते ! !

रेड टेप हा घोटाळा संस्थानांतच असतो असें नाहीं. ब्रिटिश राजवटीचा तर रेड टेप हा एक मोठाच आधारस्तंभ आहे. डोळ्याला झापणें लावलेल्या गाडीच्या घोड्याप्रमाणें नोकरशाही वहिवाटीच्या चाकोरींतून डोळ्यांसमोर फाइली ठेवून चालत असते. फार कशाला, पण खार येथील आगीच्या संबंधांत म्युनिसिपल कमिशनरांना 'रेड टेपिझम' बाजूला ठेवण्याचा उपदेश करणारे श्री. बाळासाहेब खेर स्वतः मुख्य प्रधान असतांना काय करीत होते? श्री. खेर व श्री. मुनशी यांनाच उद्देशून गांधींनीं 'रेड टेप' बाजूला ठेवण्याची जाहीर सूचना केली नव्हती काय?

सूर्याच्या किरणांप्रमाणें क्षणाक्षणाला आपले अंश बदलणाऱ्या इसमाला लाल फीत ही बैलाला दाखविलेल्या लाल चिंधीप्रमाणेंच वाटावी यांत नवल नाहीं. पण रेड टेपचा अजीबात मुलाहिजा न ठेवतां दरबारीच काय, पण आपलीं खाजगी व्यवहारांतील कामेंही सुरळीत चालूं शकणार नाहींत असें मला वाटतें. लाल फीत म्हणजे कांहीं 'लाल बावटा' नव्हे! लाल फितीचा जरूर तेवढा मर्यादित उपयोग करून घेतला, तर सुकेशिनीच्या पाठीवरील वेणीला लाल फितीनें येणाऱ्या आकर्षकतेप्रमाणें, त्या कामालाही रुबाब येईल हें मला मान्य आहे. परंतु लाल फीत आणि काम यांचें संबंध नोकर व मालकाचे राहावेत, धनको आणि ऋणकोचे राहूं नयेत एवढेंच.

रेड टेपला फाजील महत्त्व देण्याच्या सवयीमुळें कसा मजेदार प्रसंग उद्भवतो याची एक जुनी हकीकत येथें देण्यासारखी आहे. एका संस्थानांत एकदां असें घडलें कीं, एक गोरा पाद्री रस्त्यानें जात असतां शेजारच्या एका कुरणांत एक गाढव त्याच्या नजरेस पडलें. त्या गाढवाला कोणी तरी बेदम मार दिला असल्यामुळें त्याच्या अंगावर जखमा दिसत होत्या. पाद्र्याला त्याची कींव आली व त्या मुक्या प्राण्यावर दया करण्या-

च्या दृष्टीनें त्यानें आसपास पाहिलें तों शेजारींच रहदारीचें नियंत्रण करण्याकरितां पोलिस उभा असल्याचें त्याच्या दृष्टीस पडलें. त्याला इंग्रजी येत नव्हतें व पाद्र्याला त्याची भाषा अवगत नव्हती; त्यामुळें फार कांहीं न बोलतां पाद्र्यानें त्याचें लक्ष गाढवाकडे वेधविलें व तो निघून गेला.

गोरा साहेब म्हणजे संस्थानांत प्रतिईश्वरच मानला जातो. त्यांतून गफलतीनें तो पाद्री म्हणजे खुद्द रेसिडेंटसाहेबच असल्याचा पोलिसानें गैरसमज करून घेतला! एवढ्या मोठ्या साहेबाची आज्ञा म्हणजे काय गोष्ट आहे! पोलिसानें तावडतोब तें गाढव पकडून ठाण्यावर आणलें व नाइकाकडे झाल्या गोष्टीचा 'रपोट' केला. या कामीं काय करावें अशी 'साहेबां'ची इच्छा आहे तें स्पष्ट न झाल्याकारणानें 'कामा'चा निकाल स्वतःच्या जबाबदारीवर लावून साहेबाचा रोष ओढवून घेण्यास कोणाचीच तयारी नसल्यामुळें तें 'काम' व 'कामासोबत तें गाढव' 'मेहेरबानांच्या अभिप्रायासाठीं' म्हणून नाईककाडून हवालदाराकडे, हवालदाराकडून फौजदाराकडे, अशा पायऱ्या-पायऱ्यांनीं चढत चढत दिवाणापर्यंत गेलें. दिवाणही संस्थानीच पडल्यामुळें त्यांनीं कामाचा निकाल न लावतां 'कामासोबतच्या गाढवासह' काम खुद्द रेसिडेंटसाहेबांकडे 'अभिप्रायार्थ' धाडून दिलें. साहेबांनीं सर्व काम लक्षपूर्वक वाचून पाहिलें व मूळ पोलिसाला बोलावून सर्व हकीकत समजून घेतली, तेव्हां त्यांच्या ध्यानीं सारा प्रकार आला. कामाच्या या आवकजावक बारनिशींत गाढवही सामील झाल्यानें सरकारी खर्चानें इतके दिवस तें पोसलें जात होतें. त्यावेळपावेतों तें चांगलेंच धष्टपुष्ट झालें होतें! तेव्हां साहेबांनीं कामाचा निकाल केला कीं, 'सोबतचें गाढव सोडून दिलें आहे आणि कामांतलीं गाढवें कामांतच आहेत!'

वरिष्ठांच्या हुकमाची तामिली करण्यापलीकडे स्वतःची अक्कल न चालवितां कामें करण्याची एकदां वहिवाट पडली कीं, परिणाम याहून दुसरा कोणता होणार?

याच्या उलट स्वतंत्र बुद्धीनें काम करूं पाहणाऱ्या एखाद्या व्यक्तीस वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून 'वरच्या अभिप्राया'वांचून कांहीं न करण्याबद्दल तंबी मिळणें ही गोष्टही लाल फितीला प्राधान्य असलेल्या राजवटींत विरळा नसते. आफ्रिकेंतील एका रेल्वे कंपनीबाबतचा एक चुटका मीं मागें वाचला होता. त्या कंपनीच्या हेड ऑफिसची एका छोट्याशा स्टेशनमास्तर-विरुद्ध अशी तक्रार असे कीं, हा इसम 'वरती' न विचारतां-सवरतां आपल्याच अधिकारांत पुष्कळशा गोष्टी करीत असतो; त्यामुळें वरून 'रीतसर' अनुज्ञा घेतल्यावांचून कांहीं न करण्याबद्दल मास्तरमजकुराला हुकूम आला.

त्याची त्यानें इतक्या कसोशीनें अमलबजावणी केली कीं, हेड ऑफिसकडे एके दिवशीं त्याच्याकडून आलेल्या तारेंत म्हटलें होतें—

"शेजारच्या जंगलांतून एक वाघ स्टेशनवर येऊन तो तिकिट कलेक्टरला फाडून खात आहे. तरी अशा प्रसंगीं काय करावें तें 'प्रोसिजर' तारेनें कळवा."

रेड टेप म्हणजे रीतसर वहिवाटीचा जुलूम वाटतो. अशा प्रसंगीं कोर्ट-कचेऱ्यांतून तर रेड टेपचा गोंधळ विचारायला नको. तुम्ही मूर्तिमंत हयात असलांत व जातीनें कोर्टांत हजर राहिलांत तरी कागदोपत्रीं पुराव्यानें तुम्हीच ते गोमाजी तिमाजी असल्याबद्दल 'सिद्ध' करावें लागतें म्हणे! कांहीं वेळा पेन्शनची रक्कम पदरांत पडण्यासाठींही स्वतःच्या हयातीचा दाखला हजर करण्याची पाळी येते!

वास्तविक लोकांचें कामकाज मव्यवस्थित व्हावें म्हणून रेड टेप अस्तित्वांत आला असतां आजकाल त्यामुळेंच लोकांना जास्त गैरसोय सोसण्याची पाळी आली आहे! पण त्यांत मला नवल वाटत नाहीं. कारण जनतेची 'नोकरी' करण्यासाठीं अस्तित्वांत आलेली नोकरशाही जेथें जनतेवर स्वामित्व गाजवूं लागली, तेथें नोकरशाही राजवटीचेंच अपत्य असलेल्या रेड टेपिझममध्यें आपल्या जनकाचा तो गुण उतरला असल्यास तें स्वाभाविकच नव्हे का?

# सेफ्टी रेझर

कलियुग हें संघशक्तीचें युग आहे. व्यक्तिवाचक चळवळी आतां संघवाचक झाल्यानें त्यांना साहजिकच व्यापकता येते. साऱ्याच चळवळी कांहीं वास्तविक अर्थानें व्यापक असूं शकत नाहींत. परंतु सांघिक चळवळी करावयाच्या तर त्याचें आसन जास्तींत जास्त जितकें व्यापक करतां येईल तितकें करण्याचा चळवळ्ये लोक प्रयत्न करीत असतात. त्यामुळें कैकदां मोठा मासलेवाईक विनोद निर्माण होतो. परवांच मीं दिल्लीच्या एका इंग्रजी दैनिकांत एक मजेदार बातमी वाचली व मनाशीं खूप हसलों. त्या बातमींत, पण तसें कशाला? ती बातमीच येथें अनुवादरूपानें देतों म्हणजे माझ्या हसण्याचीं कारणें वाचकांच्या ध्यानीं येतील आपोआपच.

त्या पत्राच्या बातमीदारानें पाठविलेली बातमी खालीलप्रमाणें आहेः—

"आग्रा, मार्च ३०— अखिल भारतीय न्हावी-ब्राह्मण महासभेचे पाटण्याचे प्रतिनिधि मनोहरलाल आणि शिवबालक हे येथें काल येऊन दाखल झाले व त्यांनीं एका सभेंत भाषणें केलीं. न्हावी-ब्राह्मण महासभेच्या नव्या संघटनेचा उद्देश विशद केल्यानंतर व्याख्यात्यांनीं सेफ्टी रेझर्सवर बहिष्कार पुकारण्याबद्दल जोरदार आवाहन केलें. त्यांनीं सांगितलें कीं, सेफ्टी रेझर बोकाळल्यापासून न्हाव्यांच्या पोटावर पाय येऊं लागले आहेत. सभा संपल्यावर "सेफ्टी रेझरचा निःपात करा", "सेफ्टी रेझरवर बहिष्कार घाला" अशा आरोळ्या बराच वेळ ऐकूं येत होत्या. सेफ्टी रेझरच्या बहिष्काराची सर्व देशव्यापी चळवळ सुरू करण्याचेंही सभेंत ठरलें."

या बातमींत दोन-तीन गोष्टी फार मनोरंजक आहेत. 'अखिल भारतीय न्हावी-ब्राम्हण महासभा' हें लांबलचक नांवच मोठें गमतीचें आहे. सांघिक चळवळ म्हटली कीं, माकडाच्या शेपटीप्रमाणें तिच्यामागें 'अखिल भारतीय' हा व्यापक शब्दप्रयोग जोडण्याची फॅशनच पडली आहे जणूं! परवां पुण्यास चित्तपावन ब्राह्मणांचें संमेलन झालें, त्याच्याहीमागें 'अखिल भारतीय' ही उपाधि चिकटविण्यांत आली होती. हवें त्यानें उठावें व आपल्या लहानमोठ्या सांघिक चळवळीला 'अखिल भारतीय' या मोठ्या नांवाचें कुंकू लावावें असाच हा प्रकार नव्हे काय?

'अ. भा. विलेपार्ले परिषद्', 'अ. भा. सदाशिव पेठ परिषद्,' 'अ. भा. मालवण परिषद्' 'अ. भा. खुंजाबाबोळ परिषद्' अशा आणखीही कांहीं 'अखिल भारतीय' स्वरूपाच्या परिषदा पुढेंमागें भरण्याचा संभव नाहीं असें नाहीं. तसें झालेंच, तर मी देखील एक 'अखिल भारतीय बाबूलाल परिषद्' बोलावण्याच्या विचारांत आहे!

'अखिल भारतीय' या विशेषणाप्रमाणें 'न्हावी-ब्राह्मण' हें वरील बातमींतील महासभेचें दुसरें रूपही गमतीचें आहे. न्हाव्यांमध्यें देखील ब्राह्मण-ब्राह्मणेतर अशा पोटजाति असताल अशी माझी आतांपर्यंत कल्पना नव्हती! 'न्हावी-ब्राह्मणां'प्रमाणेंच 'धेड-ब्राह्मण', 'भंगी-ब्राह्मण', 'चांभार-ब्राह्मण' वगैरेंच्या संघटनाही जाहीर होण्याचा संभव आहे. तसें झाल्यास 'ब्राह्मण हा शब्द विशिष्ट ज्ञातिवाचक न राहतां व्यापक अर्थाचा द्योतक होईल आणि सर्वच जमाती स्वतःला 'ब्राह्मण म्हणवून घेऊं लागल्यामुळें मग 'ब्राह्मण-ब्राह्मणेतर' अशा निराळ्या भांडणाचें कारण उरणार नाहीं, ही एक त्यांतल्या त्यांत समाधानाची जागा आहे खरी.

तें एक असो. वरील बातमींत माझ्या दृष्टीनें जास्त महत्त्वाची आणि थोडी भीतिदायक गोष्ट म्हणजे सेफ्टी रेझरवर पुकारलेला बहिष्कार ही होय. आणि मला वाटतें, अ. भा. न्हावी-ब्राह्मण महासभेकडे अखिल भारताचें

लक्ष जाण्याचा प्रसंग आलाच, तर तो सेफ्टी रेझरवरील बहिष्काराच्या घोषणेनेंच येईल. कारण ही घोषणा बहुतेक सुशिक्षितांच्या अंगावर- किंवा गालावर म्हणा काटा उभा करणारी आहे. सेफ्टी रेझर हा आजकालच्या 'सभ्य' समजल्या जाणाऱ्या समाजाच्या साऱ्या सभ्यतेचा नि सौंदर्याचा प्रमुख आधारस्तंभ आहे. तरुणांचा तर तो दिलजान दोस्त आहे. आंघोळ न करतां घराबाहेरही पडणारे तरुण अनेक आहेत; पण दाढी न करतां स्वतःच्या खोलीबाहेर पाऊल टाकणारा तरुण आजकाल दुर्मिळ झाला आहे. 'अर्धांगी' बोलपटांतील अरुंधतीनें सावित्रीला सुचविलेला "गाडींत गाडी फोर्डची गाडी, सत्यवानराव करतात हातानं दाढी" हा नांव घेण्याचा उखाणा, मला वाटतं, कोणाही तरुणाच्या बाबतींत खरा ठरूं शकेल.

तरुण किंवा तरुणांत मोडूं इच्छिणारे प्रौढ अथवा वृद्ध यांना सेफ्टी रेझरचा आधार नसेल तर ते आहेत त्यापेक्षां वयानें जास्त दिसतील. सेफ्टी रेझरमुळें प्रत्येक पुरुषाला पांच-दहा वर्षांनीं तरी तरुण होण्याची सोय उपलब्ध झालेली आहे. सेफ्टी रेझर म्हणजे रोजचा त्रास आणि रोजची हौस आहे. सकाळीं उठतांच स्वतःच्या चहासाठीं ठेवलेल्या आधणांतील वाटी अर्धी वाटी ऊन पाणी सेफ्टी रेझरच्या तैनातीसाठीं राखून ठेवण्या-इतपत त्याच्याशीं ममत्वानें वागण्याची सवय जडलेल्या विसाव्या शतकां-तील तरुणाला सेफ्टी रेझरवरील बहिष्कार हा हिंदुस्थानांतील रशियाच्या स्वारीहूनही तापदायक वाटण्याचा संभव आहे. पावडरीशिवाय स्त्रीचा मुखचंद्र खुलत नाहीं, तशी सेफ्टी रेझरशिवाय पुरुषाच्या चेहऱ्याची कळी उमलत नाहीं.

तरुणाच्या चेहऱ्यांत सौंदर्यछटा व जीवनांत काव्यमाधुरी ओतणाऱ्या सेफ्टी रेझरविरुद्ध न्हावी-ब्राह्मण महासभेनें असें शस्त्र धरावें हें सर्वथा नामंजूर आहे. सेफ्टी रेझरवरील बहिष्काराच्या चळवळीचा परिणाम

समाजांत जिकडे तिकडे रास तफारीसारख्या भेसूर चेहऱ्यांची लागवड होण्यांत होईल ! मीं नुकतीच एक बातमी वाचली कीं,

सर्वसाधारणपणें माणसाची हनुवटी, गाल आणि वरचा ओठ मिळून १२,५०० दाढीचे खुंट उगवतात, व त्यांपैकीं प्रत्येक खुंटाची वाढ दर चोवीस तासांत एक-पन्नाशांश इंचानें होते. या हिशेबानें दर दिवशीं माणसाच्या दाढीची एकूण वाढ तीस फूट होते.

या बातमींतील आंकडेशास्त्र मला कळत नाहीं; पण तिचा मथितार्थ ध्यानी घेण्यासारखा आहे. रोज तीस फूट दाढीचा गल्ला गालावर जमविण्याची पद्धत पडल्यास आफ्रिकेंतील जंगलांची वाटणारी भीति व कौतुक लवकरच नाहींसें होईल अशी मला भीति वाटते. मुसलमान व शीख यांच्यांत धर्मानेंच दाढी राखण्याची आज्ञा केलेली असल्यानें सेफ्टी रेझरवरील बहिष्काराच्या चळवळीला या दोन धर्मांच्या कडव्या पुढाऱ्यांकडून मनःपूर्वक पाठिंबा मिळण्याचा संभव आहे. आमचे पूज्य व थोर ऋषि यांच्या तपश्चर्येची मुदत त्यांच्या दाढीच्या लांबीवरून मोजली जात असे असें म्हणतात. कोणा एका ऋषीच्या दाढीच्या आयाळांत चिमण्यांनीं आपलीं घरटीं बांधलीं होतीं असेंही कोठें तरी वाचल्याचें मला आठवतें. दाढीनें कांहीं कांहीं व्यक्तींच्या रुबाबांत भर पडते हें मला कबूल आहे. डॉ. रवींद्रनाथ टागोर यांच्या दाढीमुळेंच त्यांना पाहतांच जुन्या काळच्या एखाद्या तपोधनाला पाहत असल्याचा भास होतो. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे किंवा धर्मवीर डॉ. मुंजे यांच्या भव्यतेला त्यांच्या दाढीचा आधार आहे हें नाकारतां येणार नाहीं. शिवाजीसारख्या थोर ऐतिहासिक व्यक्तींच्या विभूतिमत्वांत दाढीनें भरच घातलेली नाहीं काय ?

**प**ण सर्वांनाच दाढी अशी धार्जिणी असत नाहीं. बर्नार्ड शॉ, रास तफारी किंवा शंकरराव देव यांच्या 'सौंदर्यां'त त्यांच्या दाढीनें भर घातली आहे असें कोण म्हणेल ? शिवाय दाढी भरदार, लांब व पांढरीशुभ्र असेल

तरच ती माणसाचा चेहरा खुलविण्यास कारण होईल. फणसाच्या अंगावरील कांट्यांप्रमाणें दाढीचे खुंट माणसाच्या चेहऱ्यावर असतील, तर त्यांची गणना विद्रूपतेंतच करावी लागेल. पुण्यप्रभावांतील कंकण म्हणतो कीं, मर्दाला दाढीमुळें रुबाब येतो. पण तो रुबाब कांहींसा भयोत्पादक असतो असें मला वाटतें. झाडाला लागलेल्या मधमाशांच्या मोहोळाप्रमाणें पुरुषाच्या दाढीचा प्रकार आहे. अजागळाला जसा त्याच्या निसर्गदत्त दाढीचा कांहीं उपयोग नसतो, तद्वत् पुरुषालाही त्याच्या दाढीचा कांहीं फायदा नाहीं असें मला वाटतें. आणि निरुपयोगी संभार छाटून टाकण्याची सुधारणा माणसानें अमलांत आणली असतां सेफ्टी रेझरवरील बहिष्कारा-च्या रूपानें 'फिरून निसर्गाकडे चला' अशी घोषणा करणें म्हणजे पुच्छ-प्रगतीचा उदो उदो करण्यासारखेंच आहे.

आतां सेफ्टी रेझरवर बहिष्कार पुकारणाऱ्या न्हावीलोकांचा उद्देश सर्वांनीं दाढ्या वाढवाव्यात हा नाहीं हें मला समजतें. घरोघरीं पुरुष हातानें दाढी करूं लागल्यामुळें नापितांच्या धंद्यांत खोट बसूं लागली व पोटांत चावूं लागल्यामुळें सेफ्टी रेझरवरील बहिष्काराचा ओवा न्हावी-ब्राह्मण महासभेच्या पुढाऱ्यांनीं मागितला हें उघड आहे. पण सेफ्टी रेझरवर कायदेशीर प्रतिबंध घालण्यांत आलाच, तर रोज सलूनमध्यें जाऊन दिव्य करण्यापेक्षां दाढी वाढविणेंच लोक पसंत करतील हें मी स्वानुभवावरून सांगतों. कोणीही झाला तरी कमी धोक्याची बाजूच स्वीकारणार! सेफ्टी रेझर वापरावयाचाच नाहीं असें ठरल्यावर, समाजांत दाढीवाल्यांची आजच्यासारखी हेटाळणी होण्याचा प्रसंग ओढवणार नाहीं; 'रानटी' म्हणून कोणी त्याची अवहेलना करणार नाहीं; अशा स्थितींत दाढी किती वाढली तरी कोण त्याची पर्वा करणार? समाजांत मात्र आज बाह्योपचारी तरी जी झकपक दिसते, तीही नाहींशी होऊन कांहींसा अनवस्था प्रसंग ओढवण्याचीच भीति जास्त.

सोय, स्वस्तपणा, सुटसुटीतपणा आणि सौंदर्य या चार खांबांवर सेफ्टी रेझरच्या लोकप्रियतेची इमारत उभी आहे, माणसाच्या सुधारणांबाबतच्या कल्पनांत सेफ्टी रेझरनें केवढी तरी क्रांति घडवून आणली आहे. सेफ्टी रेझरचा शोध लागला नव्हता तेव्हां, समाजांत सुखसौंदर्याचे आजच्यासारखे विविध प्रकार प्रचारांत नव्हते. निसर्गतः वाढेल तशी दाढी वाढूं देण्यावांचून इलाज नव्हता. या नैसर्गिक क्रियेलाच माणसानें आपल्या त्या वेळच्या अज्ञ समजुतीप्रमाणें गोंडस रूप दिलें व दाढी राखणें मोठ्या मान्यतेचें लक्षण ठरविलें असावें. हिंदुस्थानांतील ऋषिमुनींप्रमाणेंच ग्रीक देवतांनाही दाढी आहे, ग्रीक थोर पुरुषांच्या दाढ्या त्यांच्याइतक्याच प्रसिद्ध आहेत. चीनमध्यें न्यायाधीशांना दाढी वाढविणें भागच असे व सर्वांत लांब दाढी ज्याची असेल, त्यालाच सरन्यायाधीश नेमण्याचा प्रघात चीनमध्यें होता असें मीं नुकतेंच एका ठिकाणीं वाचलें.

दाढीच्या लांबीरुंदीवर शहाणपणाचें मोजमाप करणाऱ्या त्या काळच्या लोकांचें आज आपणांस हसूं येतें तो सेफ्टी रेझरचा प्रभाव आहे. विनोद-महदाख्यायिकेंतील दाढीवाल्या काजीची गोष्ट दाढीचा व शहाणपणाचा छत्तिसाचा आंकडाच सिद्ध करीत नाहीं काय? एक वितीपेक्षां लांब दाढी असलेला माणूस मूर्ख असतो असें पुस्तकांत वाचल्यावर काजीमहाशयांनीं मूर्खपणाच्या आरोपांतून सुटण्यासाठीं फाजील लांब दाढी दिव्यावर धरून जाळण्याचा प्रयत्न केला व त्यांत चेहरा मात्र होरपळून घेतला! सेफ्टी रेझरच्या आजच्या जमान्यांत असला प्रसंग कोणावर कोसळण्याची धास्ती नको. सेफ्टी रेझर हा आपल्या अंगच्या गुणांनीं लहानांपासून थोरापर्यंत सर्वांचा प्रातःस्मरणीय विषय होऊन बसला आहे.

प्रभातीं करीं सेफटी एक घ्यावा

ही सुधारणावादाची पहिली शिकवण अहिनकुलवत् संबंध असलेले भांडवल-वाले आणि भाई यांनाही एकमतानें मंजूर असल्याचें दृश्य पाहिलें कीं

विरोधकांचें ऐक्य जमविण्याचें कसबही सेफ्टी रेझरमध्यें असल्याचें कबूल करावें लागतें.

सेफ्टी रेझरवरील बहिष्काराला शिक्षित समाजाचा जोरदार विरोध होईल; आणि लोकशाही पक्षवाले, मुस्लिम लीगर्स व हिंदु महासभावाले; संस्थानिक आणि रयत, मालक आणि मजूर, नोकरीवाले व बेकार या साऱ्यांचे आवाज एकत्र ऐकूं येतील अशी माझी समजूत आहे. देशांतील विविध व विरोधी पक्षांत अशा प्रकारें ऐक्य करण्यास समर्थ असलेल्या सेफ्टी रेझरवर बहिष्कार घालण्याची कल्पना खुळेपणाची वाटते मला तरी.

---

# गवत खा, गवत !

व्हिटॅमिन्स हा शब्द सुधारलेल्या जगाच्या जिभेवर नाचत आहे आजकाल. किंबहुना सध्यांचें युग हें 'व्हिटॅमिन्स'चें युग आहे असें म्हटलें तरी चालेल. व्हिटॅमिन्स म्हणजे जीवनसत्त्वें. खाण्याच्या कोणत्या पदार्थांत कोणतीं व्हिटॅमिन्स असतात याचें आतांशा शास्त्रीय तक्ते डॉक्टर लोकांच्या दवाखान्यांत टांगलेले आढळतात; व रोग्याला रोग बरा होण्यास आजकाल औषधाइतकीच व्हिटॅमिन्सची गरज भासूं लागली आहे. पृथ्वी, आप, तेज वगैरे पंचमहाभूतांइतकेंच मानवी जीवनाला अनिवार्य होऊन बसलेलें व्हिटॅमिन हें सध्यांचें शास्त्रीय सहावें महाभूत आहे.

व्हिटॅमिन्स कोणत्या पदार्थांत कोणतीं व किती प्रमाणांत असतात याचे शास्त्रीय ठोकताळे प्रसिद्ध झाल्यापासून मनुष्याच्या खाण्यापिण्याच्या आवडीनावडीवर नवें नियंत्रण पडूं लागलें आहे. तुम्हांला कोणता जिन्नस आवडतो या प्रश्नापेक्षां तुमच्या प्रकृतीला कोणत्या व्हिटॅमिन्सची गरज आहे या प्रश्नावर तुमचें खाणेपिणें अलीकडे अवलंबून राहूं लागलें आहे. घरांत जिलब्या खाण्याची तुमची कितीही इच्छा असली, तरी डॉक्टर सांगेल त्या व्हिटॅमिन्सचा जिन्नस वाटीभर खाणेंच तुम्हांला भाग पडतें.

हें व्हिटॅमिन्सचें खूळ पेशवाईंत नव्हतें; म्हणून तेव्हां सव्वा हात केळीच्या पानावरील पंगती उठत. कोणी त्यांच्या अज्ञानाची कींव करोत हवे तर; पण एवढें मात्र खरें कीं, व्हिटॅमिन्सची कल्पनाही नसलेले आपले पूर्वज जितके निरोगी व सत्त्वपूर्ण होते, तितके 'ए' पासून 'एच्' पर्यंतचीं व्हिटॅमिन्स भक्षण करूनही आजच्या लोकांना राहतां येत नाहीं. बकासुरानें आपल्या आहारांत व्हिटॅमिन्सचा मुलाहिजा कितपत ठेवला होता कोण जाणे!

विराटाच्या घरीं पाकसिद्धि करणाऱ्या भीमवल्लवाचें व्हिटॅमिनबद्दलचें ज्ञान हल्लींच्या खानावळींतील आचाऱ्यापेक्षां जास्त असेल असें वाटत नाहीं.

मात्र तें कसेंही असलें, तरी व्हिटॅमिन्सच्या शोधानें सुधारलेल्या जगाला भारून टाकलें आहे हें खोटें नव्हे. पूर्वी श्रीकृष्णाच्या मुरलीनें जग वेडें होई म्हणतात. आज व्हिटॅमिन्समुळें तोच प्रकार होत आहे. 'ए' पासून 'एच्'पर्यंत व्हिटॅमिन्सचा शोध लागलाच आहे. लवकरच तो झेडपर्यंत जाऊन पोंचेल व नंतर कदाचित् जिंकायला जगच उरलें नाहीं म्हणून रडणाऱ्या शिकंदराप्रमाणें त्याला इंग्रजी भाषेंतील परिमित अक्षरसंख्येबद्दल अश्रुपात करण्याची पाळी येईल ! ही आपत्ति टाळण्यासाठीं माझ्या एका व्हिटॅमिन्स-प्रेमी शिक्षकमित्राची अशी सूचना आहे कीं, व्हिटॅमिन्सचा शोध इंग्रजी वर्णमालेप्रमाणें न लावतां मराठी वर्णमालेप्रमाणें लावण्याची पद्धत पाडावी, म्हणजे त्यांची संख्या अठ्ठेचाळीस पर्यंत वाढवितां येईल ! !

व्हिटॅमिन्स कोणत्या पदार्थांत असावींत यालाही धरबंध नसावा असें अमेरिकेंतील कांहीं शास्त्रज्ञांनीं हल्लींच लावलेल्या एका शोधावरून मला वाटूं लागलें आहे. तिघां अमेरिकन शास्त्रज्ञांनीं नुकतेंच अमेरिकन केमिकल सोसा-यटीपुढें असें सिद्ध केलें कीं, गवतामध्यें 'डी' खेरीजकरून बाकीचीं सर्व व्हिटॅमिन्स असतात. सतत चार वर्षांच्या प्रयोगानंतर त्यांनीं हा शोध केला असल्यानें त्याविषयीं संशयास जागा उरत नाहीं.

केवळ हा शोध लावूनच या शास्त्रज्ञांचें समाधान झालेलें नाहीं. गवत हें मानवी खाद्य व्हावें एतदर्थ त्यांनीं प्रयोग चालू केले व गहूं, जव, ओट वगैरे गवती धान्यांचीं गवती पानें घेऊन, तीं वाळवून, पांढरीखड करून, आणि दळून त्यांपासून एक प्रकारची पिठी तयार केली. तिला मंद सुगंधाचीही जोड दिली आहे. या तिघां शास्त्रज्ञांचें आत्मविश्वासपूर्वक असें म्हणणें आहे कीं, अशा प्रकारें तयार करण्यांत आलेली गवती पिठी भोज्य पदार्थांपैकीं अनेक पदार्थांत वापरून ते पदार्थ चविष्ट, रुचकर व पौष्टिक करतां येतात.

इतकेंच काय, पण त्यांचें असें साग्रह प्रतिपादन आहे कीं, फळ फळावळाच्या व भाजीपाल्याच्या ३४० पौंडांमध्यें जितकीं व्हिटॅमिन्स असूं शकतात, तितकींच व्हिटॅमिन्स अशा प्रकारच्या गवती पिठीच्या फक्त बारा पौंडांत असतात !

नव्या ट्रमचें हिरीरीनें स्वागत करण्यांत अमेरिका सर्वांत पुढें असते. या गवती अन्नाची तेथें अलीकडे फॅशन बोकाळली आहे. वरील तीन शास्त्रज्ञांनीं गेला हिंवाळा संबंध या गवती अन्नावर काढला; या अन्नाचे कोणतेच दुष्परिणाम होत नाहींत असा त्यांना अनुभव आला. उलटपक्षीं त्यांची प्रकृति फार चांगली झाली म्हणे. या गवती अन्नाचें बारा रत्तल पीठ वर्षभर एका कुटुंबाला भरपूर व्हिटॅमिन्स पुरवूं शकतें असें या त्रिमूर्तींचें म्हणणें आहे. या शोधानंतर तीन अमेरिकन कारखाने आणि एक कॅनडामधील कारखाना, अशी गवती पिठी तयार करण्यास लागले असून, दर पौंडाला साडेतीन आणे या भावानें माल बाजारांत धाडण्याची त्यांची तयारी आहे.

या अक्षरशः अपूर्व शोधानें तुमच्या-आमच्या खाण्यापिण्याच्या पदार्थांत एकदम क्रांति होण्याचा योग समीप आला आहे. व्हिटॅमिन्सप्रधान आहारपद्धतींत तर या गवती पिठीला सम्राट्पद प्राप्त होणें असंभवनीय नाहीं. गवत खाणें ही कल्पना सकृद्दर्शनीं तरी कशीशीच वाटते खरी. गवत हें जनावरांचें अन्न आहे, माणसाचें नव्हे, अशी पिढ्यान् पिढ्या उराशीं बाळगलेली समजूत दूर फेकतांना आपल्याला चमत्कारिक वाटणें साहजिक आहे. मात्र गवतखाऊ जनावरांच्या अंगीं असलेल्या सामर्थ्याचें कारण या शोधामुळें आकलन करणें सोपें झालें आहे. 'डी'व्यतिरिक्त सर्व उपलब्ध व्हिटॅमिन्स असलेलें अन्न 'नैसर्गिक' अवस्थेंत एकसारखें खायला मिळाल्यावर जनावरांच्या अंगीं 'रेड्या'ची ताकद यावी यांत नवल कसलें ?

हें खरें असलें तरी गवती अन्न खातांना आपल्या चिरपरिचित पूर्वग्रहामुळें मन थोडेंफार अप्रसन्न राहणें स्वाभाविक आहे. गवती अन्नाचा

आग्रह आजकाल अमेरिकेप्रमाणेंच इंग्लंडमध्यें सुरू झाल्याचें दिसतें. लंडन टॉइम्समध्यें हल्लींच एका गृहस्थांनीं पत्र लिहून गवती हिरवळ खाण्याचा जनतेला सल्ला दिला आहे. गेलीं तीन वर्षें हे गृहस्थ स्वतः गवती अन्नावर राहत आहेत.

गवती अन्नांतील जीवनतत्त्वांच्या समुच्चयामुळें लवकरच त्याला जगभर महत्त्व येईल हें सांगणें नकोच. लहान मुलानें तोंडानें गवतकाडी कुरतडण्याचा प्रयत्न केल्यास आपण त्याला दटावतों; पण या नव्या शोधामुळें स्वतःच गवतकाडी कुरतडण्याचा प्रसंग यायचा एखाद वेळ ! गवती अन्नाचा स्वीकार करणें आपणांस प्रथम कठीण जाईल हें खरें; परंतु एकदां गवतानें गोठा सोडून स्वयंपाकगृहांत प्रवेश केला कीं, आमच्या सुग्रण अन्नपूर्णा त्याचे अनेक स्वादिष्ट व खमंग पदार्थ बनविण्यास चुकणार नाहींत अशी माझी खात्री आहे.

भाजीपाला आपण खातोंच; वास्तविक गवताची आणि भाजीपाल्याची जात तात्त्विक दृष्ट्या एकच नाहीं काय ? मग निरनिराळ्या शाकभाज्यांचे नाना पदार्थ करण्यांत कसलेले गृहिणींचे हात गवताला खाद्यस्वरूप देण्याच्या कामीं नालायक ठरतील असें मानण्याचें कांहीं कारण नाहीं. गवती पिठी सर्रास बाजारांत येऊं लागल्यावर साखरभाताचा भाऊ शोभणाऱ्या गवतीभाताची आधींच विपुल असलेल्या आमच्या पक्वान्नांत भर पडेल. दिवाळीसाठीं गवती करंज्या, कडबोळीं घरोघरीं तयार होतील. रायतीं, कोशिंबिरीं यांमध्यें नवी भर पडेल. विश्रांतिभुवनांतून 'आजच्या शिफारशीं'त खमंग कांकडीच्या शेजारीं 'खमंग गवती' हा तोंडाला पाणी आणणारा पदार्थ विलसूं लागेल आणि एखादा गवती मसाल्याचा ठेकेदार वर्तमानपत्राच्या संपादकाच्या तोंडावर अभिप्रायासाठीं गवताच्या चार काड्या फेकील !

तांदळाप्रमाणें गवतांतही अनेक प्रकार असतात. आज आपणाला गवतांतील जातिभेदाची जाणीव फार थोडी आहे. परंतु व्हिटॅमिन्सच्या शस्त्रास्त्रासह त्यानें एकदां आमच्या ताटावर आक्रमण केलें कीं. गवता-गवतांतील फरक आपल्या जिभेला कळूं लागेल. उष्ण कटिबंधांतील गवताळ जमिनींतील ( Savannas ) गवतांची चव आणि मध्यकटिबंधांतील गवताळ जमिनींतील ( Steppes ) गवताची चव यांमधील फरक सांगण्याइतकी आपली जीभ तरबेज झाली कीं ती गवताला चटावली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

गवती अन्नाचा एक फायदा होईल. आपल्या जेवणांतील ठराविक तोच तोपणा या नव्या शोधानें कांहीं अंशीं तरी दूर होणार आहे. आमटींत कोथिंबीर घालून तिला एक मधुर लज्जत आणण्याची अन्नपूर्णामाईंची चाल आहे, तींत गवती पिठीमुळें नावीन्यपूर्ण भर पडण्याचा संभव आहे.

निरनिराळीं गवती पेयेंही पण निघणें अपरिहार्य आहे. अमेरिकेंत एका कोणीं तरी असें एक गवती पेय तयारही केलें आहे म्हणे ! हें पेय उंदरांना प्रयोगादाखल पाजण्यांत आलें; तों त्याचा अनुभव असा आला कीं, नेहमीं-पेक्षां दुपटीनें ते उंदीर तट्ट फुगले. गवती पेयांत अंशी शरीरवर्धनशक्ति असल्यानें लहान मुलांना बालामृताऐवजीं गवती पेयेंच पुढील पिढींत दिलीं जातील हें उघड आहे.

ही परिस्थिति पांचसहा वर्षांत येऊं शकेल. गवती अन्नाला शास्त्रीय रीत्या सर्वांची संमति मिळाली कीं, तुमचे-आमचे डॉक्टरलोक टॉनिक म्हणून गवती अन्न आमच्या घशाखालीं उतरविण्यास सुरुवात करतील आणि तुमच्या-माझ्या नातवंडांच्या वेळेपर्यंत गवती अन्न इतकें सार्वत्रिक व सर्वमान्य होऊन जाईल कीं, १९४० सालपर्यंत गवती अन्न आपणांस ठाऊकही नव्हतें असें १९७० सालीं जर आपण तेव्हांच्या गृहरत्नांना सांगूं लागलों, तर गवती अन्नाला लालचावलेलीं तीं मुलें तुमची-आमची तमोयुगांतील मानवांत गणना करण्याचा संभव आहे !

गवती अन्नाच्या त्या भरभराटलेल्या काळांत पुण्याच्या सुप्रसिद्ध 'गवत्या' मारुतीचा भाग्योदय होईल असा माझा 'आंतला आवाज' मला सांगतो ! गणपतीचा आणि मोदकांचा अविभाज्य संबंध जोडून देणारी आपली आस्तिक्य बुद्धि, गवती अन्नाचा धागा 'गवत्या' मारुतीशीं जोडल्यावांचून कशी स्वस्थ राहील ? आमचे कट्टर सनातनी सांगूं लागतील, "पाहा, आमच्या दूरदृष्टि पूर्वजांनीं गवताचें हें महत्त्व पूर्वीच परिपूर्ण ओळखलेलें होतें. म्हणूनच त्यांनीं दुर्वा आणि दर्भ या गवताच्या दोन जातींना धार्मिक विधींत एवढें मानाचें स्थान दिलें." स्वामी लवणानंदा-प्रमाणें एखादा स्वामी गवतानंद गवत हेंच पूर्णान्न असल्याच्या प्रचार-कार्याला आपलें आयुष्य वाहून घेईल असाही संभव आहे.

गवती अन्नावर माणसांचे देह पुष्ट होऊं लागल्यावर गवताचा हेटाळणीनें उल्लेख करणाऱ्या वाक्प्रचारांना आजच्याहून वेगळे अर्थ यावे लागतील हें क्रमप्राप्तच आहे. 'दातीं तृण धरून' यांतील आजचा अपमानास्पद अर्थ लोप पावून त्याला वैभवाचा गौरवास्पद अर्थ येऊं लागेल.

> तृणं ब्रह्मविदः स्वर्गस्तृणं शूरस्य जीवनम् ।
> जिताक्षस्य तृणं नारी निःस्पृहस्य तृणं जगत् ॥

या श्लोकाचा अर्थ अजीबात बदलून घ्यावा लागेल. 'सिंह म्हातारा झाला तरी तो गवत खाणार नाहीं' अशा अर्थाचा प्रचलित श्लोक जास्त काळ गौरवास्पद न राहतां 'डी'खेरीज सर्व व्हिटॅमिन्स असलेलें गवत न खाणाऱ्या सिंहाच्या मूर्खपणाची भावी पिढ्या कींवच करतील !

> तृणं चाहं वरं मन्ये नरादनुपकारिणः
> घासो भूत्वा पशून्पाति भीरून्पाति रणांगणे ॥

या श्लोकांत मनुष्यापेक्षांही गवताला जें वरचें स्थान दिलें आहे, तें अमेरिकेंतील तीन रसायनशास्त्रज्ञांच्या वरील शोधानें, योग्यच ठरणार आहे. कारण घास होऊन केवळ पशूंचेंच नव्हे, तर यापुढें तें मानवांचें देखील पालन करण्यास समर्थ ठरणार आहे.

तात्पर्य काय कीं, आतां गवत खायची सवय करायला लागावी हें बरें !

# परक्यांची भाषा

अंधेरी येथील प्रकाश पिक्चर्सच्या स्टुडिओंत सर्वांनीं हिंदी भाषेचाच सरसहा उपयोग केला पाहिजे असें फर्मान कांहीं दिवसांपूर्वी स्टुडिओ-च्या मालकांनीं काढल्याचें मीं वाचलें तेव्हां मला थोडीशी गंमत वाटली. मुंबई प्रांताची भाषा हिंदी नसतांना या शहरांतील एका स्टुडिओंत हिंदीचा हा जुलुमाचा रामराम सुरू करण्याचें कारण, आपल्या बोलपटाची हिंदुस्थानी भाषा जास्त सुधरावी हें असेल कदाचित्; परंतु जी भाषा प्रकाश पिक्चर्सच्या मालकांनीं आपल्या नोकरांवर सक्तीनें लादण्याचा प्रयत्न चालविला आहे, तिच्या स्वरूपाबाबत संयुक्त प्रांतांतील प्रमुख वर्तमानपत्रांत सध्या चालू असलेल्या वादाची वार्ता प्रकाश-चालकांच्या कानावर गेली असेल काय याचा मला संभ्रम पडला आहे.

हिंदुस्थानी भाषा हिंदुस्थानची राष्ट्रभाषा म्हणून बकवा माजविण्यास पद्धतशीरपणें सुरुवात झाल्यापासून हिंदुस्थानी म्हणजे हिंदी कीं उर्दू याबाबत चांगलीच रस्सीखेंच चालल्याचें दिसतें. हिंदुस्थानी म्हणजेच उर्दू भाषा होय असा कांहींचा आग्रह असून उर्दू भाषेंत शेंकडा पंचाहत्तर शब्द हिंदी आहेत असें कांहीं– विशेषतः मुसलमान लेखकांचें म्हणणें आहे. उलट, युक्तप्रांतीय हिंदी भाषाभिमान्यांचें मत हिंदुस्थानी म्हणजे बोली (colloquial) हिंदी होय. या दोन मतांचें भांडण सध्या जोरांत चालू असून ऑल इंडिया रेडियोवरील भाषेलाही या वादांत वेठीला धरण्यांत आल्याचें मीं पाहिलें आहे.

हिंदी व उर्दू या दोन्ही भाषा मराठीला परक्याच; त्यांतल्या त्यांत संस्कृतच्या घरोब्यानें हिंदीशीं मराठीचें सूत लौकर जमूं शकेल; पण उर्दू

या घेडगुजरी भाषेशीं मराठीची सोयरीक जमण्याचा संभव नाहीं. कांहीं मुसलमानी भाषांतलि शब्द मराठीनें पचवून आत्मसात् केले असले, तरी संस्कृतीच्या दृष्टीनें हिंदी हीच मराठीला केव्हांही जवळची ठरेल. मुसलमानी भाषांचा उलटा जमाना आपल्या अंगवळणीं पडण्याचा संभव मला तरी वाटत नाहीं.

प्रकाश पिक्चर्सनें सक्तीनें बोलायला लावलेली भाषा या दोहींपैकीं कोणत्या भाषेशीं आपुलकी दाखवीत असेल याची मला माहिती नसली, तरी मातृभाषा किंवा प्रांतभाषा सोडून परकीयांची भाषा वापरण्याची सक्ती केल्यास त्याचे परिणाम फारसे चांगले होत असतील असें मला वाटत नाहीं; शिवाय अनुभवही तसा नाहीं. कॉँग्रेसनें हिंदुस्थानी भाषा राष्ट्रभाषा म्हणून मान्य केली आहे व कॉँग्रेसचे कांहीं पुढारी त्या भाषेंत वक्तव्य करतांना ऐकू येतात. कॉँग्रेस पुढाऱ्यांपैकीं कांहींचीं राष्ट्रभाषेंतील व्याख्यानें ऐकण्याचें 'सौभाग्य' (?) मला लाभलें आहे आणि तीं व्याख्यानें ऐकूनच राष्ट्रभाषेबद्दलच्या माझ्या आदराला गळती लागली हें मी प्रांजलपणें कबूल करतों. ए. आय्. सी. सी.चे एक प्रमुख सदस्य राष्ट्रभाषेंतील व्याख्यानांत एकदां म्हणाल्याचें मला अद्याप आठवतें कीं—

"कॉँग्रेसका यह रेझोल्यूशनपर मेरी अमेंडमेंड पास होने के लिये टू-थर्ड मेजॉरिटी चाहिये."

कैक व्याख्यात्यांच्या राष्ट्रभाषेंत इंग्रजी शब्दांची 'टू-थर्ड मेजॉरिटी' असते, हा अनुभव पुष्कळांना आला असेल.

परक्यांची भाषा बोलण्याचा सराव नसल्याचा तो परिणाम असतो. हिंदीचें तर सोडाच, पण इंग्रजी भाषा तर विद्यालयीन शिक्षण घेऊन आपण कमावलेली असते, पण ती बोलतां-लिहितांना कित्येक पदवीधरांचीही काय त्रेधातिरपिट उडते याची मला कल्पना आहे. पुणेरी इंग्रजीची कीर्ति सर्व हिंदुस्थानभर दुमदुमत आहे. परक्यांची भाषा बोलतांना नकळत

कशा गमती होतात याचे कांहीं मासले मला आठवतात ते येथें देण्यासारखे आहेत.

एकदां दक्षिण महाराष्ट्रांतील एक धार्मिक वृत्तीचे संस्थानिक गव्हर्नर-साहेबांच्या प्रायव्हेट सेक्रेटरीच्या मुलाखतीस गेले असतांना लौकर परत जाण्याची परवानगी मागतांना म्हणाले—

" To-day is my Monday. I must go early."

त्या दिवशीं श्रावणी सोमवार असल्यानें राजेसाहेबांना 'सोमवार' सोडण्याची घाई होती. परंतु त्यांच्या " To-day is *my* Monday " या वाक्याचा 'साहेबाच्या डोक्यांत कांहींच प्रकाश पडेना! गांधींच्या उदयापूर्वीची ही गोष्ट असल्यानें 'सोमवार'चा 'तो' अर्थहि तेव्हां सर्वश्रुत झाला नव्हता !

याहीपेक्षां अधिक गमतीची एक सत्यकथा दिल्लीच्या एका इंग्रजी दैनिकांत मागें मीं वाचल्याचें आठवतें. संयुक्त प्रांतांतील एका जमीनदारांना, स्थानिक कलेक्टरकडे वशिले वगैरे लावून, बऱ्याच दिवसांच्या खटपटी-नंतर एकदाची 'रायबहादुर' ही पदवी सरकारांतून मिळाली. तेव्हां जमीन-दारसाहेबांनीं आनन्दाप्रीत्यर्थ आपल्या इष्टमित्रांना एक जंगी पार्टी दिली. पार्टीला त्या कलेक्टरसाहेबांना अर्थातच आमंत्रण होतें व साहेब पत्नीसह येऊन दाखल झाल्यापासून जमीनदारमजकूर त्या जोडप्याभोंवतींच गोंडा घोळूं लागले ! त्या लाचारीच्या वर्तनामुळें साहेबांना कसेंसेंच होऊं लागलें, म्हणून त्यांनीं सौम्य शब्दांत तसें न करण्याबद्दल त्यांना सुचविलें. तेव्हां उसळून जमीनदारमजकूर ओरडले—

" No, no Sir, you are my master, Sir, your wife is my *mistress*, Sir."

जमीनदाराच्या इंग्रजीच्या अकटोविकट ज्ञानानें बिचाऱ्या कलेक्टरीण-बाईला 'कोठून आपण पार्टीला आलों' असें करून सोडलें !

एका गांवच्या पाटलाची अशी एक गोष्ट सांगतात कीं, त्याचें आणि तालुक्याच्या नव्या मामलेदाराचें पूर्वीपासून ठीक नव्हतें. एकदा मामलेदाराची फिरती पाटलाच्या गांवीं पडली, तेव्हां वरिष्ठ अधिकारी म्हणून त्याची सरबराई करणें पाटलाला भागच होतें. ती व्यवस्था पाहून मामलेदार सहज पाटलाला 'थँक्स' म्हणाला; परंतु ती त्यानें आपणास शिवीच दिली असा समज करून घेऊन पाटिलबुवा खेंकसले, "मी कसला थेंक! तूं थेंक! तुझा-बाप थेंक, तुझा आजा थेंक!!"

या पाटलाच्या समजुतीप्रमाणेंच माझ्या एका मित्राच्या आईची अशी विचित्र समजूत होऊन बसली आहे कीं, तिचीं मुलें परस्परांत कांहीं इंग्रजी बोलूं-चालूं लागली कीं, ती आपलीच कुचाळकी करीत आहेत असें समजून ती चिडते–संतापते! या तिच्या स्वभावामुळें माझा मित्र थट्टेनें म्हणतो, "आमच्या आईच्या निंदेशिवाय इंग्रजींत बोलायला दुसरे शब्दच नाहींत!"

परक्याची भाषा बोलण्याचा प्रयत्न करतांना एखाद् वेळ कशी बत्तिशी फोडून घेण्याचा प्रसंग येतो, याची एक मासलेवाईक कथा सांगण्यासारखी आहे. एका कचेरींतील जादा हुशार कारकुनाला अशी खोड होती कीं, त्याचा नवा ऑफिसर प्रथम कामाचा 'चार्ज' घेण्यास आला, कीं त्याच्या मातृभाषेंत त्याला पहिला सलाम ठोकायचा. एकदां त्याचा बदलून आलेला ऑफिसर कानडाप्पा निघाला. तेव्हां कानडी जाणणाऱ्या आपल्या दोस्त कारकुनांकडून त्यानें कानडी भाषेंत सुस्वागतम्च्या वाक्याची संथा घेतली व ऑफिसरला दारांतच सलामी ठोकली. परंतु त्याच्या अपेक्षेप्रमाणें ऑफिसरनें उलट सलाम न करतां त्याच्या थोबाडांत दोन-चार सणसणीत ठेवून दिल्या व त्याचा अस्सल शब्दांनीं उद्धार करण्यास सुरुवात केली. तेव्हां बाकीची मंडळी मध्यें पडली व त्या चलाख कारकुनाची सुटका झाली. नंतर त्याला कळलें कीं, पढविलेलें वाक्य सुस्वागतम्चें नसून अगदींच घाणेरड्या अर्थाचें असल्यामुळें हा प्रसंग ओढवला! तेव्हांपासून त्यानें परक्याची भाषा बोलण्याचा नाद सोडून दिला.

हीं केवळ आपल्याच लोकांची अवस्था होते असें नाहीं; तर आमच्या 'पुणेरी' इंग्रजीला हसणाऱ्या युरोपियन लोकांचीही स्थिति याहून वेगळी नाहीं. ते जेव्हां आमच्या भाषा बोलण्याचा आव आणतात, तेव्हां अशाच हास्यास्पद चुका करतात. माझ्या माहितीचीं चार-दोन उदाहरणें सांगून साहेबांच्या 'विलायती मराठी'चा मासला तुम्हांला चाखविणें अप्रस्तुत ठरणार नाहीं.

मराठीचा चांगला अभ्यास केलेल्या एका युरोपियन सन्-जज्जाची गोष्ट मासलेवाईक आहे. कै. हरिभाऊ आपटे यांच्या कादंबऱ्या जज्जसाहेबांनीं वाचल्या, तेव्हां त्यांत वारंवार आलेल्या 'इश्श मेलं!" या शब्दप्रयोगाजवळ साहेबांच्या मराठी भाषेच्या ज्ञानाचें तट्टू अडलें. त्यांनीं आपल्या कचेरींतील शिरस्तेदारास 'इश्य मेलं'चा अर्थ विचारला. ती एक नकारार्थी शब्दजोड असून तिचा वापर बायका करतात असा खुलासा शिरस्तेदारानें केला खरा; परंतु जज्जसाहेबांना बायकांची भाषा व पुरुषांची भाषा यांतील मराठीबाबतचा भेद ध्यानीं येऊं शकला नाहीं. आणि पुढें कांहीं दिवसांनीं आपल्या खटल्याची तारिख पुढें ढकलण्याबाबत एका पक्षकारानें गुदरलेल्या अर्जावर त्यांनीं "इश्श मेलं" असा शेरा मारून खालीं सही ठोकल्याचें सांगतात!!

श्री. नरसोपंत केळकरांनीं एका व्याख्यानांत सांगितलेली एक मजेदार गोष्ट मला आठवते. खानदेशांतील एका युरोपियन कलेक्टरचा पगार हातीं पडतांच ताबडतोब घरीं पोंचविण्यास त्याला बायकोनें बजावून ठेवलें असल्यामुळें, ऑफिसांत पगार मिळतांच आपल्या पट्टेवाल्यास बोलावून त्यानें 'मराठीं'त प्रश्न केला कीं—

'एवढा पगार घेऊन तूं घरीं पळून जाशील काय?' साहेबांचा हा विचित्र प्रश्न ऐकून पट्टेवाल्यानें साहजिकच साफ नकार भरला. पण त्यामुळें साहेबांचें पित्त खवळलें! आपला हुकूम पट्टेवाला ऐकत नाहीं म्हणजे काय गोष्ट आहे! त्यानें पट्टेवाल्याचा उद्धार करण्यास सुरुवात केली. पट्टे-

वाल्याला कळेना आपलें काय चुकलें तें ! शेवटीं साहेबांचा ओरडा ऐकून जमलेल्या मंडळींनीं मध्यस्ती करून सर्व प्रकरण समजून घेतलें. तेव्हां त्यांना कळलें, कीं साहेबमजकुराला 'पळत जाणें' आणि 'पळून जाणें' या मराठी शब्दांच्या सादृश्यानें चांगलेंच बनविल्याचें ! त्याला म्हणायचें होतें, 'पगार घेऊन तूं घरीं पळत जाशील काय !' पण तो म्हणाला मात्र, "पळून जाशील काय ?" मराठी भाषेंत परक्याला चकविण्याचें सामर्थ्य केवढ्या मोठ्या प्रमाणांत आहे हेही जातां जातां या कथेवरून कळून येईल.

सर जॉन सायमन ( आतां लॉर्ड सायमन ) हे सायमन कमिशनच्या वेळीं हिंदुस्थानांत आल्या वेळीं त्यांच्या पत्नी लेडी सायमन याही इकडे आल्या होत्या. त्यांच्या पतीला कमिशनचें काम होतें, तसें त्यांना कसलेंच काम नसल्यामुळें त्यांनीं हिंदुस्थानची भाषा शिकण्यास आरंभ केला. या भाषेंत चपाती आणि चपराशी या दोन शब्दांत अक्षर व उच्चारसाम्य फार असल्यामुळें सायमनबाई एकदां कशा हास्यविषय झाल्या, ती मनोरंजक हकीकत पूर्वीं एका इंग्रजी पत्रांत वाचली होती. एका मोठ्या पार्टीच्या वेळीं विलायती जेवण व हिंदुस्थानी जेवण यांची चर्चा चालली असतां लेडी सायमन म्हणाल्या—

"Everything is good here, in India. But these chaprasis are not so good. They lie heavy on stomach."

'चपाती'ऐवजीं 'चपराशी' शब्द वापरल्यानें अर्थात् भलताच फरक पडून अनर्थ ओढवला ! ! !

सिमल्याच्या एका बड्या साहेबाच्या हिंदी भाषेंतील वक्तव्याचीही अशीच एक गंमत मागें मीं ऐकली होती. सिमला हें गांव टेकाडावर असल्यामुळें तेथील वस्ती पायऱ्या-पायऱ्याप्रमाणें उंचसखल आहे हें सर्वश्रुतच आहे. हे साहेबमजकूर सर्वांत उंच टेकाडावर बंगल्यांत राहत व त्यांच्या

परिचयाचे आणखी कांहीं साहेब खालच्या थरावर राहत असत; परंतु त्या सर्वांचा धोबी एकच होता. तो साहेब लोकांचे कपडे एका गाढवाच्या पाठीवर लादून परत करीत असे. सर्वांत वरच्या टेकाडापर्यंत चढण्याची गाढवाला तसदी न देतां साहेबमजकुरांचे कपडे धोबी स्वतःच आणीत असे. या प्रकाराचें साहेबाला वैषम्य वाटून त्यानें एक दिवस धोब्याला रागानें विचारलें.—

"क्यों बे, जॉन्सनसाब गद्धा है, रॉबर्टसाब गद्धा है, विलियमसाब गद्धा है, लेकिन हम क्यों नहीं गद्धा ?"

साहेबाला म्हणायचें होतें इतर साहेब लोकांप्रमाणें आपलेही कपडे गाढवावरूनच आले पाहिजेत; परंतु त्यानें हिंदींत प्रगट केलेली मनीषा ऐकून बिचारा धोबी आ वासून पाहतच राहिला असेल !

आपल्या बोलण्यांत परक्याच्या भाषेच्या अज्ञानामुळें जशा हास्यास्पद चुका होतात, तशाच चुका साहेब लोकही आमच्या भाषा बोलतांना करतात एवढेंच सुचविण्यासाठीं एवढा प्रपंच केला. माझ्या एका मित्राच्या चुलत्याला साहेबांच्या भाषेंतील (अर्थात् इंग्रजी) बिनचूकपणाचें मोठें कौतुक वाटे. एकदां ते या विषयावर बोलतां बोलतां पूर्ण गंभीरपणें माझ्या मित्राला म्हणाले—

"अरे, तुला माहात नाहीं. साहेबांचीं मुलं फार हुशार असतात. अगदीं लहानपणापासून तीं इंग्रजींत बोलतात ! !"

साहेब लोकांच्या भाषापटुत्वाविषयीं माझ्या वाचकांपैकीं कोणाला असा अजागळ अभिमान असेल तर त्यानें मीं वर दिलेले सत्य चुटके फिरून एकदां वाचावेत अशी माझी शिफारस आहे.

परंतु यावर कोणी म्हणतील कीं, हिंदुस्थानांतील प्रांतभाषा साहेबांना अजीबात परक्या असल्यामुळें हा प्रकार होत असेल, तर तसें नाहीं. खुद्द युरोपखंडांतील परक्या भाषा बोलतांना कैक वेळा गोऱ्या लोकांची

अशीच हास्यास्पद त्रेधा उडते. एका रशियन सेनापतीचा याबाबत एक चुटका देण्यासारखा आहे. या सेनापतीच्या सन्मानार्थ इंग्लंडमध्यें झालेल्या पार्टीच्या समारंभांत अभीष्टचिंतनाच्या टोस्टच्या वेळीं इंग्रजींत बोलण्याचा 'प्रसंग' त्या रशियन सेनापतीवर आला. काय बोलावें हें त्याला समजेना. त्याच्यापूर्वी बोललेल्या दोन वक्त्यांनीं पूर्व व पश्चिम गोलार्धांतील स्त्रियांना उद्देशून टोस्ट सुचविला, तेव्हां रशियन सेनापतीला कानांत सूचना मिळाली कीं त्यांनीं 'दोन्ही गोलार्धांवरील स्त्रिया' (To the ladies of both the hemispheres) असे शब्द बोलून काम भागवावें. परंतु इंग्रजीसारख्या परक्या भाषेंत बोलण्याचा बांका वख्त गुदरल्यामुळें रशियन सेनापतीनें वक्तव्य केलें—

'To both the hemispheres of the ladies !'

असे कैक चुटके इंग्रजी पत्रांतून हमेश वाचावयास मिळतात व परक्यांची भाषा बोलतांना जगभर साऱ्याच लोकांची कशी चमत्कारिक अवस्था होते याची कल्पना येते. परंतु जेव्हां एखादी व्यक्ति परक्याच्या भाषेवरील आपल्या प्रभुत्वाचें प्रदर्शन खुद्द ती मातृभाषा असलेल्या लोकांच्या पुढेंच करण्याची हिंमत बाळगते तेव्हां किती गमतीचा प्रसंग उद्भवतो याची एकच नमुनेदार सत्यकथा सांगण्यासारखी आहे. पारशी लोकांपैकीं बरेचजण स्वतःला मराठी भाषेचे मोठे तज्ज्ञ समजतात; याचा अनुभव मुंबईकरांना तरी आहेच. असेच मराठी पंडित मानणारे कांहीं पारशी गृहस्थ एका शाळेंत गेले व दुसरीच्या वर्गांतील मुलांना उद्देशून त्यांनीं Very good या शब्दांचें सुरेख मराठी भाषांतर करण्यास सांगितलें. मुलांपैकीं कोणी चांगलें, सुरेख, उत्कृष्ट वगैरे भाषांतरें सांगितलीं. परंतु या महाराष्ट्रभाषाभूषणानें तीं सर्व चुकीचीं ठरवून स्वतः त्या शब्दाचें उत्तम मराठी भाषांतर म्हणून "लई व्येस" हें सांगितलें ! तेव्हां वर्गांतील पोरें कशीं खिदळलीं असतील याची वाचकांनींच कल्पना करावी !

परक्यांचें दास्य जसें माणसाला कधीं मनापासून मानवत नाहीं, तद्वत् परक्यांची भाषाही मातृभाषेसारखी कोणाला प्रिय होत नाहीं. १८७० मध्यें जर्मनीनें फ्रान्सचे अल्सास-लॉरेन प्रांत घशांत घालून तेथून फ्रेंच भाषा हुसकून लावून तीऐवजीं जर्मन ही परकी भाषा सक्तीची केली, तेव्हां फ्रेंच मातृभाषेंतील 'शेवटचा धडा' घेतांना एका शाळेंतील शिक्षक व विद्यार्थी यांच्या मनःस्थितीचें दिग्दर्शन करणारी अल्फान्सो दोदे या फ्रेंच लेखकाची गोष्ट याच कारणानें जगाच्या वाङ्मयांत आजतागायत गाजत आहे. फार कशाला, रियासतकार रा. ब. सरदेसाई यांचे जर्मनींत गतप्राण झालेले चिरंजीव श्यामकांत यांचें मृत्युशय्येवरील पत्र मराठी भाषेंत जें एवढें चिरस्मरणीय झालें आहे तें इंग्रजींत लिहिलें असतें तर आजच्याइतकें हृदयस्पर्शी खास झालें नसतें.

शिंप्यानें अर्धवट शिवलेला कोट बेतशीर झाला आहे किंवा नाहीं हें पाहण्यासाठीं अंगावर चढविला असतांना आपणांस होतें, तसें परक्यांची भाषा बोलतांना अवघडल्यासारखें वाटतें, हा अनुभव सर्वांना केव्हां ना केव्हां तरी येतो; म्हणूनच मला वाटतें, कीं, आमच्या परमपूज्य दूरदर्शी पूर्वजांनीं

मा वदेत् यावनी भाषां प्राणः कंठगतैरपि।

अशी इशारत दिली असावी !!

मराठी ग्रं. क्र. ५८८८ शाखा

# मनोहर ग्रंथमालेचीं
## आगामी प्रकाशनें

(१) बोकिलांच्या गोष्टी ( कथासंग्रह )

(२) गुप्त प्रायश्चित्त ( कादंबरी )

लेखक : प्रो. ना. सी. फडके

(३) संस्कृतिसंगम ( समाजशास्त्रविषयक प्रबंध )

लेखक : प्रो. द. के. केळकर

---

'प्रभात'चे प्रथितयश पद्य-रचनाकार,

'एकलें बीज' व 'बीजांकुर' या कवितासंग्रहांचे लेखक

श्री. शान्ताराम आठवले

आणि

'फुलपांखरें', 'उषा', 'हवेंतील मनोरे' या पुस्तकांचे लेखक

श्री. ग. खं. पवार

यांचा एकत्रित लघुकथासंग्रह

'जुना बाजार'

लवकरच प्रसिद्ध होईल